सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | शुक्रवार, १३ मार्च २०२६ | वर्ष ४ थे अंक ५ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



स्वामी विवेकानंदांचे विचार, तत्त्वज्ञान हे पूर्णपणे रा. स्व. संघाचा विचार आणि तत्त्वज्ञान यात प्रतिबिंबित झाले आहेत. स्वामी विवेकानंदांनी मद्रास आणि लाहोर येथे जी भाषणे दिली, त्या भाषणांमध्ये स्पष्टपणे संपूर्ण हिंदू समाजाला संघटित करण्याची अतीव आवश्यकता प्रतिपादन केली आहे. इतकेच नव्हे तर त्यासाठी आवश्यक इतरही बीजभूत कल्पना मांडल्या आहेत. त्या सर्व गोष्टींचा प्रत्यक्ष आविष्कार म्हणजे रा. स्व. संघच आहे.

**- कृ. सूर्यनारायण राव**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. सेवा प्रमुख

## महत्त्वाचे

### फेब्रुवारीत किरकोळ महागाईचा दर वाढून ३.२१ टक्के

**नवी दिल्ली :** गुरुवारी जाहीर झालेल्या ग्राहक किंमत निर्देशांकानुसार, फेब्रुवारीत देशातील किरकोळ महागाईचा दर वाढून ३.२१ टक्क्यांवर पोहोचला. मागील वर्षी फेब्रुवारीत हा दर २.७४ टक्के होता. चलनवाढीचा डेटा २०२४ या पायाभूत वर्षासह नवीन ग्राहक किंमत निर्देशांक मालिकेवर आधारित आहे. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, फेब्रुवारीत अन्नधान्य महागाई जानेवारीतील २.१३ टक्क्यांवरून वाढून ३.४७ टक्क्यांवर पोहोचली. चांदी, सोने, हिरे, प्लॅटिनमचे दागिने, नारळ-खोबरे, टोमॅटो आणि फुलकोबी या प्रमुख वस्तूंच्या किमतीत वाढ झाली.

# सिलेंडरवरून संसदेत ‘भडका’

## सरकारला घेरण्याचे विरोधकांचे प्रयत्न निष्फळ

◆ **नवी दिल्ली, १२ मार्च**

इराण युद्धानंतर जगभरात ऊर्जा संकट निर्माण झाले असले तरी देशात घरगुती वापराचा गॅस आणि पेट्रोल, डिझेलचा पुरेसा साठा असल्याचे स्पष्टीकरण केंद्र सरकारने दिले आहे. तथापि, अफवांमुळे आणि नफेखोरीसाठी देशात काही ठिकाणी नागरिकांमध्ये गोंधळ निर्माण झाला. याचाच फायदा घेत काँग्रेससह विरोधी पक्षांनी संसदेत सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला. पण, विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे उत्तर देत सरकारने विरोधकांचे प्रयत्न निष्फळ ठरविले. सभागृहबरोबरच संसद परिसरातही विरोधकांनी जोरदार आंदोलन केले.

### स्वयंपाकाच्या गॅसची टंचाई नाही

**» अफवांमुळे देशात अचानक एलपीजीच्या मागणीत वाढ झाली आहे, स्वयंपाकाच्या गॅसला घेऊन प्राधान्यक्रम ठरवण्यात आला आहे, असे स्पष्ट करत पुरी म्हणाले की, होर्मुज खाडीमुळे २० टक्के पुरवठा प्रभावित झाला असला तरी देशात स्वयंपाकाच्या गॅसची कुठेही टंचाई नाही, देशात पुरेशा प्रमाणात गॅस उपलब्ध आहे, त्यामुळे लोकांनी घाबरुन जाण्याचे कारण नाही, असे पुरी यांनी सांगितले.** ■

### देशात गॅस सिलेंडरचा तुटवडा नाही : हरदीपसिंग पुरी



आमच्याजवळ कच्च्या तेलाचा पुरेसा साठा आहे. पेट्रोल, डिझेल आणि स्वयंपाकाच्या गॅसचा कोणताही तुटवडा नाही, असे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी आज लोकसभेत स्पष्ट केले.

विरोधी पक्षांचे सदस्य विरोधात घोषणाबाजी करत असतांना एलपीजी गॅसच्या देशभरातील टंचाईवर लोकसभेत निवेदन करतांना हरदीपसिंग पुरी म्हणाले की, एलपीजी गॅसची जहाजे रोज येत आहेत, अन्य मार्गानेही त्याचा साठा देशात पोहोचत आहे. कॅनडा, रशिया आणि नार्वेतून आपण इंधन बोलावत आहे, एलपीजी गॅसचा पुरवठा सुरळीत होत आहे.

एलपीजी उत्पादनात २८ टक्क्यांनी वाढ झाली आहे. पर्यायी इंधनाबाबतही विचार सुरु आहे, याकडे लक्ष वेधत पुरी म्हणाले की, केरोसिनचा पुरवठा देशभरात सुरळीत व्हावा म्हणूनही प्रयत्न केले जात आहे. परिस्थितीवर देखरेख ठेवण्यासाठी तीन मंत्र्यांची समिती गठित करण्यात आली आहे. अशा परिस्थितीचा दीर्घकाळ सामना करण्यास देश तयार आहे. ■

### लोकसभेत विरोधकांचा थाळीनाद

स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडरच्या देशव्यापी टंचाईचा मुद्दा आज लोकसभेत गाजला. या मुद्यावरुन विरोधी पक्षांनी सरकारवर हल्ला चढवला. तृणमूल काँग्रेसच्या सदस्यांनी सभागृहात थाळी वाजवून या टंचाईकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

तृणमूल काँग्रेसच्या सयानी घोष, प्रतिभा मंडल, महुआ मोईत्रा, माला रॉय आणि अन्य महिला सदस्य सभाृहात ताट , चमचा आणि अन्य भांडी घेऊन आल्या आणि अध्यक्षांसमोरील मोकळ्या जागेत येऊन वाजवू लागल्या. हा प्रकार योग्य नाही, सदस्यांनी आपल्या जागेवर जावे, अशी समज पिठासीन अध्यक्ष संध्या राय यांनी सदस्यांना दिली.

होर्मुज खाडी बंद आहे. देशात एलपीजी गॅसचे संकट निर्माण झाले असून याचा फटका फुटपाथवरच्या दुकानदारांना बसत असल्याचा आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला. आम्ही तेल कुणाकडून विकत घ्यावे, गॅस कोणाकडून घ्यावा हे सांगणारी अमेरिका कोण आहे, असा प्रश्न उपस्थित करत गांधी यांनी सभागृहात एक मंत्री बसले आहे, ते एपस्टीनचे दोस्त आहे, असा उल्लेख करताच भाजपा सदस्यांनी त्यावर आक्षेप घेतला. त्यामुळे सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. स्वयंपाकाच्या गॅसच्या टंचाईवर सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे यांनी केली.

◂ *(तभा वृत्तसेवा)*





संसदेच्या पायऱ्यांवर निदर्शने करताना लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी व इतर विरोधी पक्षांचे नेते

# बाहेरची औषधे लिहून दिल्यास कठोर कारवाई

## हसन मुश्रीफ यांची परिषदेत घोषणा

### शासकीय रुग्णालयांवर अंकुश





◆ **मुंबई, १२ मार्च**



शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांमध्ये रुग्णांसाठी आवश्यक औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध असून कोणत्याही रुग्णाला बाहेरून औषधे घेण्यास सांगितल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी विधान परिषदेत सांगितले.

अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात रुग्णांना औषधे उपलब्ध करून देण्याबाबत सदस्य अमोल मिटकरी यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना मंत्री मुश्रीफ बोलत होते.

मंत्री मुश्रीफ म्हणाले की, शासकीय रुग्णालयांमध्ये उपचारासाठी मोठ्या प्रमाणावर रुग्ण येत असतात. या सर्व रुग्णांना आवश्यक औषधे उपलब्ध व्हावीत यासाठी रुग्णालयात पुरेसा औषधसाठा ठेवण्यात येतो. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये औषध खरेदीची निश्चित प्रक्रिया असून त्यानुसार निधी खर्च केला जातो.

औषध खरेदीसाठी मिळणाऱ्या निधीपैकी सुमारे सत्तर टक्के खरेदी वस्तू प्राधिकरणामार्फत केली जाते, तर उर्वरित तीस टक्के रक्कम संबंधित संस्थांकडून खर्च करण्यात येते. याशिवाय जिल्हा नियोजन समितीकडून मिळणाऱ्या निधीतूनही आवश्यक औषधांची खरेदी केली जाते.

◂ *(तभा वृत्तसेवा)*

### वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून करणार तपासणी

**» अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासंदर्भात सदस्यांनी मांडलेल्या मुद्द्यांची दखल घेण्यात येईल. या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तपासणी करून अहवाल मागविण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या रुग्णालयात चुंबकीय प्रतिमांकन तसेच संगणकीय छायाचित्रण तपासण्या केल्या जात असल्याची माहिती देत, शासकीय रुग्णालयांमध्ये सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर आधुनिक वैद्यकीय यंत्रणा उभारण्याचा निर्णय शासनाने घेतल्याचेही मंत्री मुश्रीफ यांनी सांगितले.** ■




CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# आदिला नदी परिसरातील रेड लाईन, ब्ल्यू लाईन विरोधात नागरिक आक्रमक

## महापालिका आयुक्तांविरोधात नागरिकांची घोषणाबाजी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

शहरातील वसंत विहार आणि बाळे परिसरातून जाणाऱ्या आदीला नाल्याच्या मुद्द्यावरून सोलापूर महानगरपालिका आणि स्थानिक नागरिकांमध्ये मोठा वाद निर्माण झाला आहे. नाल्याला अचानक नदीचा दर्जा देण्याच्या हालचाली सुरू झाल्याचा आरोप करत संतप्त नागरिकांनी नदी परिसरात महापालिका आयुक्तांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. नदीला परिसरातील रेड लाईट आणि ब्ल्यू लाईनला येथील नागरिकांनी विरोध दर्शविला आहे.



नागरिकांच्या मते, सोलापूर महानगरपालिकेने यापूर्वी या प्रवाहाची नोंद नाला म्हणून केली होती. त्याच आधारे परिसरातील अनेक नागरिकांना बांधकाम परवाने देण्यात आले तसेच नियमितपणे मालमत्ता करही वसूल करण्यात आला. मात्र आता अचानक हा नाला नसून ''आदीला नदी'' असल्याचे सांगत महापालिकेकडून दोन्ही बाजूंना १०० मीटरची मर्यादा रेषा आखण्याची तयारी सुरू असल्याचा आरोप करण्यात आहे.

नागरिकांनी प्रश्न उपस्थित केला की, जर हा प्रवाह सुरुवातीपासून नदी होता तर मग महापालिकेने आम्हाला बांधकाम परवाने का दिले? तसेच अनेक वर्षे आमच्याकडून कर वसूल का केला? महापालिकेच्या या निर्णयामुळे नाल्यालगत असलेल्या जवळपास ८०० गटांना कोणत्याही प्रकारचे नवीन बांधकाम किंवा विकास परवाने देणे थांबविण्यात आल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांमध्ये मोठी चिंता आणि नाराजी निर्माण झाली आहे. अनेक घरे व प्लॉट्स नो कन्स्ट्रक्शन झोन मध्ये येण्याची शक्यता आहे. बँक कर्ज घेऊन घर बांधलेल्या नागरिकांवर अर्थ



आर्थिक संकट येऊ शकते. शहरातील सुमारे ८०० गट या निर्णयामुळे प्रभावित होण्याची शक्यता वर्तवण्यात आली.

प्रत्यक्षात या नाल्याचे योग्य प्रकारे खोलीकरण आणि देखभाल करणे आवश्यक होते. ते न केल्यामुळे पावसाळ्यात पाणी परिसरात पसरत होते. मात्र त्या समस्येचे निराकरण करण्याऐवजी अचानक नाल्याला नदीचा दर्जा देऊन नागरिकांना बेघर करण्याचा डाव आखला जात असल्याचा संशय व्यक्त केला आहे.

या पार्श्वभूमीवर संतप्त नागरिकांनी महापालिका प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत आपला निषेध व्यक्त केला. या प्रकरणावर प्रशासन काय भूमिका घेणार आणि नागरिकांना दिलासा मिळणार का, याकडे आता शहराचे लक्ष लागले आहे.आदीला पत्राचे खोलीकरण सुमारे पाच मीटर व रुंदीकरण १८ मीटर करावे. आदीला पात्राच्या दोन्ही बाजूला योग्य खोली उंचीची सिमेंट भिंत बांधावी. हिप्परगा तलावातील गाळ काढून साठवून क्षमता वाढवावी. रेड व ब्लू लाईन संदर्भातील सर्व तांत्रिक अहवाल व नकाशे सार्वजनिक करावेत. पूर्वी मंजूर बांधकामांना कायदेशीर संरक्षण देण्यात यावे. फायनल लेआउट मंजूर असलेल्या ठिकाणी बांधकाम परवाने सुरू करावेत. संपूर्ण शहरासाठी समग्र जल नियोजन आराखडा तयार करावा बांधकाम व वापर परवाना देण्यात यावा. ब्ल्यू लाईन व रेड लाईन हा विषयच रद्द करावा आदी मागण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. यावेळी रविकिरण चव्हाण, प्रसाद गोडसे, रविकांत गेजगे, जयवंत सलगर , अनिल तेल्लू , धीरज नरोटे , सोमनाथ शिंदे, अंबादास सुरवसे, संतोष घोडके आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.दरम्यान, महापौर विनायक कोंड्याल यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यासाठी बाळे , वसंत विहार परिसरातील नागरिक प्रतिनिधी आले होते.

## महत्वाचे...



### 'इफ्तार संवाद'च्या माध्यमातून विसंवादावर मात करण्याचा निर्धार

**सोलापूर, दि. १२ मार्च-**

भारतीय समाजाची बहुसांस्कृतिक वीण अधिक मजबूत करण्यासाठी सांस्कृतिक पातळीवरचा संवाद महत्वाचा आहे. या अनुषंगाने एशिअन सेंटर फॉर सोशल स्टडीज आणि सावित्री महिला संघटनेच्यावतीने आयोजित 'इफ्तार संवाद'च्या माध्यमातून सर्वधर्मिय महिलांनी विसंवादावर मात करण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी डॉ.अस्मिता बालगांवकर, निशा भोसले, सुनिता गायकवाड, मोनिका सरकार, ॲड.पिरजादे, अफसाना बेग आदिंनी विचार व्यक्त केले. संस्थेचे प्रमुख आसिफ इकबाल आणि सावित्री संघटनेच्या सरिता मोकाशी यांनी प्रास्ताविक केले. सुमित्रा देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शशिकला देशमुख, मोईज सिराज अहमद, अल्ताफ कुडले, वाईज सय्यद, आकिद शेख, कुदसिया मनियार, गौसिया याकूब अली, समिना मनियार, निकहत परवीन, शबाना काझी, रेहाना शेख, विकारुन्नीसा बंदुकवाले आदींनी परिश्रम घेतले.



### मनपा शिक्षकांचे वेतन रमजान सणापूर्वी करण्याची शिक्षक संघटनेची मागणी

**सोलापूर, दि.१२ मार्च-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षक अंतर्गत कार्यरत असणाऱ्या सर्व शिक्षकांचे वेतन रमजान सणापूर्वी करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटना व उर्दू टीचर्स फेडरेशन यांनी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांच्या कडे निवेदनाद्वारे करण्यात आली. या संघटनेच्या शिष्टमंडळामध्ये महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे अध्यक्ष नागेश गोसावी, राज्य प्रतिनिधी स्वप्नील चाबुकस्वार, संतोष सुतार, विशाल मनाळे, किरण शेळगे, उर्दू टीचर्स फेडरेशनचे अध्यक्ष फझल शेख, उपाध्यक्ष इमरान पठाण उपस्थित होते.



### दक्षिण आफ्रिकेचे शास्त्रज्ञ बोथमा यांनी केली द्राक्ष बागांची पाहणी

**सोलापूर, दि. १२ मार्च-**

महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायदार संघ सोलापूर विभागाच्या वतीने दक्षिण आफ्रिकेचे शास्त्रज्ञ डॉ. कोबस बोथमा यांनी वडगाव (ता. तुळजापूर) येथील प्रगतशील द्राक्ष बागायतदार हणमंत गवळी यांच्यासह इतर काही द्राक्ष बागांची पाहणी केली. यावेळी डॉ. बोथमा यांनी द्राक्षबाग लावडीपूर्वीची मशागत कशी करावी, बागेसाठी कोणत्या प्रतीची जमीन निवडावी, पाण्याचे नियोजन कसे करावे, फवारण्या, आंतर मशागती आदींसह घडाचे नियोजन आणि मार्केट कसे निवडावे आदींबाबत द्राक्ष उत्पादकांना मार्गदर्शन केले. विविध प्लॉटची पाहणी करतानाही बागांमध्ये असलेल्या त्रुटींबाबत, व्यवस्थापनांबाबत मार्गदर्शक सुचना केल्या. थॉमसन, तास गणेश,२ क्लोण, माणिकचमन, प्लेन सिडलेस आदी जातींच्या द्राक्ष बागांची पाहणी करून त्यांनी समाधान व्यक्त केले. डॉ. बोथमा यांनी सकाळच्या सत्रात हणमंत गवळी, महादेव वडणे, राहुल सुरवसे, भागवत सुरवसे (मळेगाव, ता. बार्शी) येथील बागांचा भेटी दिल्या. तर दुपारच्या सत्रात डॉ. बोथमा यांनी मळेगाव-हिंगणी रोडवरील रूक्मिणी मंगल कार्यालयात शेतकरी बांधवांना मार्गदर्शन केले. यावेळी महाराष्ट्र बागायदार संघाचे माजी अध्यक्ष तथा खजिनदार शिवाजीराव पवार, संचालक हणमंत गवळी, महादेव वडणे, राहुल सुरवसे, संघाचे सोलापूर विभाग अध्यक्ष राजेंद्र देशमुख, शंकर येणगुरे, नागेश मोरे आदी शेतकरीउपस्थित होते.

### विशाल व छोट्या २ वर्षाकरीता सोलापूर जिल्ह्यातून तडीपार

**सोलापूर, दि. १२ मार्च-**

विशाल राजु गोखले आणि आदित्य उर्फ छोट्या आद्या शिवाजी भोसले याला सोलापूर शहर व उर्वरीत सोलापूर जिल्हयातून ०२ वर्षाकरीता तडीपार करण्यात आले आहे. तसे आदेश पोलीस आयुक्तालयाकडून काढण्यात आले आहेत. विशाल राजु गोखले, वय-२३ वर्षे, रा. घर नं. २२, मद्दा झोपडपट्टी, अशोक चौक, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर याचेविरुध्द सन २०२१, २०२३ व २०२५ या कालावधीमध्ये गैरकायद्याची मंडळी जमा करुन दंगा व मारामारी करणे, सामान्य नागरीकांना साथीदारांसह मारहाण करुन दहशत निर्माण करणे, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे यासारखे गुन्हे दाखल आहेत.आदित्य उर्फ छोट्या आद्या शिवाजी भोसले, वय-२६ वर्षे, रा. ०६, शिवमंदिर जवळ, गडदर्शन, औसे वस्ती, लक्ष्मी पेठ, दमाणी नगर, सोलापूर याचेविरुध्द सन २०१८, २०२३ व २०२५ या कालावधीमध्ये गैरकायद्याची मंडळी जमा करुन दंगा व मारामारी करणे, सामान्य नागरीकांना साथीदारांसह मारहाण करुन दहशत निर्माण करणे यासारखे गुन्हे दाखल असल्याने त्याचेविरुध्द त्याचे विरुध्द अनुक्रमे जेलरोड पोलीस ठाणे व फौजदार चावडी पोलीस ठाणेकडून तडीपार प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांना सादर करण्यात आला होता.







## 'मराठी असे आमुची मायबोली' हा सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त स्टेट बँक वर्कर्स ऑर्गनायझेशन आयोजित आणि वसंत वलय निर्मित '' मराठी असे आमुची मायबोली '' हा निवेदनासह सांगितीक शिवछत्रपती रंगभवन येथे उत्साहात पार पडला. याचे उद्घाटन महापौर विनायक कोंड्याल, मनोरमा बँकेचे चेअरमन श्रीकांत मोरे व मनोरमा मल्टीस्टेटच्या चेअरमन शोभाताई मोरे, भारतीय जनता पक्षाचे युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष महेश बिराजदार, भारतीय मजदूर संघाचे नंदू भोसले व सुधांशू रानडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. अभिनेते विघ्नेश जोशी यांच्या दिलखुलास व बहारदार निवेदनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली आणि ओघवत्या शैलीतल्या निवेदनासह गायक ओंकार प्रभूघाटे, गायिका कल्याणी जोशी यांनी एकाहुन एक सरस अशी अभिजात गाणी सादर केली. तबल्यावर गंधार जोग आणि निवेदनामध्ये कवितांची जोड देत यश जोशी यांनी बहार आणली. यावेळी जनरल सेक्रेटरी राजेश मुळे, पुणे यांनी मान्यवरांचा व कलावंतांचा सत्कार केला. वर्धराज मिर्जी यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.

## डॉ. उम्मे यशफिन शिलेदार यांचे फिजिओथेरपी पदवीत उज्वल यश



**सोलापूर, दि. १२ मार्च -**

डॉ.उम्मे यशफिन सलीम शिलेदार यांनी फिजिओथेरपी ही वैद्यकीय पदवी उत्कृष्ट गुणांसह यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. त्यांनी आपले शिक्षण श्री सिद्धेश्वर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, सोलापूर येथून पूर्ण केले असून हे महाविद्यालय महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सेस, नाशिक अंतर्गत कार्यरत आहे. या यशामुळे कुटुंबीय, शिक्षक आणि मित्रपरिवारामध्ये आनंदाचे वातावरण असून अनेक विद्यार्थ्यांसाठी त्यांचे यश प्रेरणादायी ठरत आहे. मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर कोणतेही स्वप्न पूर्ण करता येते, हे डॉ. उम्मे यशफिन शिलेदार यांनी दाखवून दिले आहे.

## बांधकाम कामगार शिष्यवृत्ती घोटाळ्याची सीबीआय चौकशी करा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

सोलापुरातील बांधकाम कामगारांच्या पाल्यांच्या शिष्यवृत्ती योजनेत महाघोटाळा झाला आहे. त्याची सखोल चौकशी करा व बांधकाम कामगारांच्या विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार न्याय व हक्क संघर्ष समितीच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर संघर्ष समितीचे अध्यक्ष विष्णू कारमपुरी, सेक्रेटरी सोहेल शेख, सल्लागार सायबण्णा तेगेळ्ळी यांच्या नेतृत्वाखाली भव्य निदर्शने करण्यात आली.

संघर्ष समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हलगीने नाद व निदर्शने करण्यात आली. यावेळी महायुती सरकार मुर्दाबाद शिष्यवृत्ती घोटाळ्याची सीबीआय चौकशी करा, खाजगी दलालांना अटक करा, प्रत्येक तालुक्यात भांडे वाटप स्वतंत्र केंद्र सुरू करा, बांधकाम कामगारांची नूतनीकरण दर तीन वर्षांनी करा, खऱ्या बांधकाम कामगारांना न्याय द्या, बांधकाम कामगार रक्त तपासणी सुविधा केंद्रावरच करा, आमच्या मागण्या मान्य करा नाहीतर खुर्च्या खाली करा अशा घोषणा दिल्या निदर्शने आंदोलनानंतर १६ मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना शिष्टमंडळाद्वारे देण्यात आले. विष्णू कारमपुरी यांच्या नेतृत्वाखाली निदर्शने आंदोलनात सोहेल शेख, सायबण्णा तेग्गेळी, रेखा आडखी, पप्पू शेख, श्रीनिवास बोगा, गुरुनाथ कोळी, सविता दासरी, पद्मा मॅकल, लक्ष्मी गुंठला, महालक्ष्मी शेरला, लक्ष्मी कुंटला, नागमणी रच्चा, नरसय्या मालपुरी, खताब शेख, एजाज विजापूरे, मुर्तुज आउचकर, सुहाना नदाफ, मेहरूना नदाफ, शकीला शेख, लक्ष्मी येमुल, गौरी इंजामुरे यासह बांधकाम कामगार सेना कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फरार आंतरराष्ट्रीय सुत्रधार आरोपी १ वर्षाने पकडला

### सोलापूर शहर सायबर पोलिस स्टेशनची मोठी कामगीरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

शहर सायबर पोलीस स्टेशनकडील दाखल गुन्हयातील फरार आरोपी हे नेपाळ येथे राहुन तेथील त्याचे चायनीज व नेपाळी साथीदार याचे सोबत संगणमत करुन, लाखो रुपयाची ऑनलाईन आर्थीक फसवणूक करणाऱ्या व १ वर्षापासून फरार असलेला सराईत आरोपीता विरुध्द लुक आऊट नोटीसच्या मध्यमातुन दिल्ली येथील इंदिरा गांधी अंतरराष्ट्रीय विमानतळ येथून अटक करण्यात आली आहे.

फिर्यादीशी आरोपीने ऑनलाईन संपर्क साधून CRYPTO CURRENCY TRADING मध्ये १० ते ३०० टक्के फायदा करून देण्याचे अमिष देऊन फिर्यादीस ऑनलाईन सुमारे ७२ लाख ६४ हजार रूपये इतकी रक्कम भरण्यास भाग पाडून फिर्यादीची आर्थिक फसवणूक केली. या गुन्हयात सोलापूर शहर सायबर पोलीसांनी आत्तापर्यंत एकूण ४ आरोपी निष्पन्न केले असून यातील सुत्रधार आरोपी रोज मगर थापा (वय २३, रा. बोसन, दक्षिणखली-१ काटमांडू, नेपाळ) व त्याचे सहकारी आरोपी दोरजे तमांग यांनी फिर्यादी यांच्या फसवणुक रकमेपैकी काही रक्कम सारस्वत बँक मध्ये असलेल्या M ENGINEERING नावाच्या मध्ये वर्ग करून घेतल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

आरोपी रोज मगर थापा हा नेपाळ येथील नागरिक आहे. नेपाळ येथे संपर्कात आलेल्या चीनी नागरिकांच्या सांगण्यावरून तो भारतात आपल्या अन्य साथीदारां सोबत येऊन भारतीय नागरिकांना कमीशनचे आमिष दाखवून त्यांचे बँक खाते गुन्ह्यात वापरण्यास घेऊन खात्यातून फसवणुकीचे रक्कम स्वीकारून पुढे वर्ग करत असे. हा आरोपीने दिल्ली, महाराष्ट्र, पश्चिमबंगाल, मध्य प्रदेश व मणिपूर येथे राहून फसवणुकीचे काम करत होता.



आरोपी हा नेपाळचा नागरिक असल्याने तपासादरम्यान त्याचे ची माहिती मिळवून त्याचे विरुद्ध सन २०२५ मध्ये लुक आऊट नोटीस जारी केली होती.

गुन्हा दाखल झालेपासुन आरोपी बाहेरच्या देशात असल्याने, IMMIGRATION विभाग यांच्या संपर्कात राहून आरोपीचा मागोवा घेवून, त्यास दि. ८ मार्च २०२६ रोजी इंदिरा गांधी अंतरराष्ट्रीय विमानतळ, दिल्ली येथुन ताब्यात घेवून ना. न्यायालया समक्ष हजर केले असता ६ दिवसाची पोलीस कोठडी (रिमांड) मिळाली आहे. तरी आरोपीताकडे तपास चालु असुन, इतर साथीदाराबाबत माहिती घेवून त्यांचे नाव निष्पन्न करून त्यांचेवर अटकेची कारवाई करण्याची तजवीज ठेवून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

सदरची कामगीरी पोलीस आयुक्त एम राजकुमार, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) डॉ. अश्विनी पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) राजन माने यांचे मार्गदर्शनाखाली सोलापूर शहर सायबर पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीशैल गजा, पोसई प्रविण भोपळे, पोसई नागेश इंगळे, पोह मच्छिंद्र राठोड, पोह प्रकाश गायकवाड, पोको रतिकांत राजमाने या तपास पथकाने पार पाडली.

### नागरिकांना आवाहन

काही लोक आपले नाव वापरून बँक खाते उघडण्यास सांगतात व त्यासाठी पासबुक, एटीएम कार्ड, चेकबुक, मोबाईल सिमकार्ड, ओटीपी इत्यादी कागदपत्रे किंवा माहिती मागतात. ते लोक ''तुम्हाला कमिशन मिळेल'' किंवा ''जास्त नफा मिळेल'' असे सांगून लोकांना फसवतात. अशा लोकांना बँकेची किंवा वैयक्तिक माहिती देऊ नये. अन्यथा तुमच्या बँक खात्याचा वापर करून इतर राज्यांतील लोकांची ऑनलाइन आर्थिक फसवणूक केली जाऊ शकते. त्या फसवणुकीचे पैसे तुमच्या खात्यात जमा करून नंतर काढले जातात आणि त्यामुळे तुम्ही नकळत गुन्ह्यात आरोपी ठरू शकता. म्हणून सर्व नागरिकांनी सतर्क राहावे. कोणालाही लालच देऊन बँक खाते उघडण्यास किंवा माहिती देण्यास तयार होऊ नये. तसेच सोशल मीडियावर जास्त नफा मिळवून देण्याच्या जाहिरातींवर विश्वास ठेवू नये. आरोपी आणि नमूद बँक खाते या विषयी कोणाचे तक्रार असल्यास व माहिती असल्यास सोलापूर शहर सायबर पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधावा, अशा प्रकारची घटना घडल्यास तात्काळ सायबर पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, हे आवाहन सोलापूर शहर पोलीसांकडून सर्व नागरिकांना करण्यात येत आहे.

## पोलिस शिपाई रिक्त पदाची लेखी परीक्षा रविवारी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहरच्या वतीने ७३ पोलीस शिपाई रिक्त पदांसाठी पोलीस मुख्यालय येथे ८८६ (६५५ पुरुष व २३१ महिला) उमेदवार लेखी परीक्षेसाठी पात्र झाले. या सर्वांची लेखी परीक्षा ही दि.१५ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ ते १२.३० या कालावधीत एस.व्ही. सी.एस. हायस्कुल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज, एमआयडीसी, अक्कलकोट रोड, सोलापूर येथे घेण्यात येणार आहे.

लेखी परिक्षेचे हॉलतिकिट महाआयटी कडून उमेदवारांच्या ईमेल वर पाठविण्यात आलेले आहेत. तरी उमेदवारांनी परीक्षेसाठी येताना या कार्यालयाकडून मैदानी चाचणीच्या वेळी देण्यात आलेले ओळखपत्र, महाआयडीकडून लेखी परिक्षेसाठी दिलेले हॉलतिकीट, ०२ पासपोर्ट साईज फोटो सोबत घेवून यावेत. उमेदवारांना या कार्यालयाकडून पॅड व काळे पेन देण्यात येणार असून याव्यतिरिक्त उमेदवारांनी त्यांचेसोबत इतर कोणत्याही वस्तू उदा. पेन, पेन्सिल, खोडरबर, मोबाईल, डिजीटल डायरी, मायक्रोफोन, मायक्रो कॅमेरा डिव्हाईस, कॅलक्युलेटर, डिजीटल नोटपॅड, नोटस पुस्तके, ईअरफोन, हिअरिंग ॲन्ड डिव्हाईस, स्मार्ट वॉचेस, स्मार्ट आय ग्लासेस, चिप इत्यादी वस्तू आणू नयेत.

उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी दि.१५ मार्च २०२६ रोजी परिक्षा केंद्रावर सकाळी ८.०० वाजता उपस्थित रहावे. उशिरा आलेल्या उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी बसु दिले जाणार नाही, तरी उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी वेळेत उपस्थित रहावे. तसेच उमेदवारांनी परिक्षेदरम्यान कोणत्याही प्रकारचे कॉपी करण्याचा प्रयत्न करु नये. जर उमेदवार कॉपी करताना आढळून आल्यास त्यांचेविरुध्द महाराष्ट्र स्पर्धा परिक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम २०२४ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

## डॉ.सतीश वळसंगकर यांचे निधन



**सोलापूर, दि. १२ मार्च-**

येथील डॉ. सतीश वळसंगकर (वय ७२) यांचे गुरुवार, दि. १२ मार्च २०२६ रोजी पुणे येथे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पुण्यातच अंत्यसंस्कार होणार आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ते सक्रीय स्वयंसेवक होते. हरिभाई देवकरण प्रशाला, सोलापूर जनता बँक यासह अनेक संस्थावर त्यांनी संचालक म्हणून कार्य केले आहे. काही दिवसांपासून ते पुण्यात मुलाकडे राहत होते.



तुम्ही खाली काय करता, या गोष्टी माझ्यापर्यंत येतात. मी आता सगळ्या गोष्टींची शहानिशा करणार आहे. सगळ्या गोष्टींचा मजाक बनवला आहे. जर नवीन काही करायचे नसेल तर पक्षाच्या नवनिर्माण नावाला काय अर्थ आहे.

**-राज ठाकरे**, मनसे अध्यक्ष


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

शुक्रवार, १३ मार्च २०२६ **३**




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात मुंबई आणि महाराष्ट्र सुरक्षित आहे. संजय राऊत तुमचे सरकार असताना मुंबईसह महाराष्ट्रात काय अवस्था होती याचा विचार करा. विधानभवनात जो अफवा पसरवतो त्यांच्यावर कारवाई करा.

**-नवनाथ बन**, प्रवक्ते

## महत्त्वाचे

### आर. एन. रवी बंगालचे २२ वे राज्यपाल

**कोलकाता** : लोकभवनात गुरुवारी सकाळी झालेल्या एका समारंभात माजी आयपीएस अधिकारी आर.एन. रवी यांनी पश्चिम बंगालचे २२ वे राज्यपाल म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, विधानसभा अध्यक्ष बिमन बॅनर्जी, वरिष्ठ मंत्री आणि कोलकात्याचे महापौर फिरहाद हकीम आणि डाव्या आघाडीचे अध्यक्ष बिमन बोस यांच्या उपस्थितीत त्यांना कोलकाता उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश सुजॉय पॉल यांनी शपथ दिली. तथापि, विरोधी भाजप गटातील कोणताही नेता या कार्यक्रमाला उपस्थित नव्हता. मुख्य सचिव नंदिनी चक्रवर्ती आणि वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसह अनेक वरिष्ठ नोकरशहा देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते. ५ मार्च रोजी त्यांचे पूर्वसुरी सी.व्ही. आनंद बोस यांच्या राजीनाम्यानंतर रवी यांची पश्चिम बंगालचे राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. रवी यांनी यापूर्वी नागालँड, मेघालय आणि तामिळनाडूचे राज्यपाल म्हणून काम पाहिले होते. ■

### मुस्लिम समुदायाने एकत्र यावे : एर्दोगन

**अंकारा** : जगातील मुस्लिम समुदायाने एकत्र यावे, शिया-सुन्नी हा कुठलाही धर्म नाही तर आमचा केवळ इस्लाम हा एकच धर्म असल्याचे स्पष्ट करत



तुर्कीचे राष्ट्राध्यक्ष तैय्यप एर्दोगन यांनी इराणविरोधातील संघर्षाच्या काळात मुस्लिम अजेंडा रेटण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. तुर्कीच्या राष्ट्रगीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाला एर्दोगन संबोधित करीत होते. संघर्षाच्या काळात इस्लामिक एकता दाखवण्याची वेळ आली आहे. शिया, सुन्नी, तुर्क आणि कुर्द असा भेदभाव करणे चुकीचे आहे. आम्ही त्या प्रत्येक व्यक्तीसोबत उभे आहोत ज्याच्यासोबत चुकीचे घडले आहे. आम्ही वंश, पंथ, धर्म, भाषा किंवा मूळ यावर आधारित भेदभाव नाकारतो. ही लढाई केवळ दोन देशांमधील नाही तर संपूर्ण जग याची किंमत चुकवण्याची तयारी करीत आहे, असे ते म्हणाले.

### राजेंद्र आलेकरांनी घेतली राज्यपालपदाची शपथ

**चेन्नई** : राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर यांनी गुरुवारी लोकभवन येथे झालेल्या एका साध्या समारंभात तामिळनाडूचे राज्यपाल म्हणून शपथ घेतली. आर्लेकर यांचे आगमन झाल्यावर मुख्यमंत्री एम के स्टॅलिन आणि मद्रास उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश सुश्रुत अरविंद धर्माधिकारी यांनी त्यांचे स्वागत केले. मुख्य सचिव एन मुरुगनंदम यांनी नियुक्तीपत्र वाचून दाखवले आणि न्यायमूर्ती धर्माधिकारी यांनी त्यांना पदाची शपथ दिली. तामिळनाडू विधानसभेचे अध्यक्ष एम अप्पावू, के एन नेहरू, ईव्ही वेलू, पीके शेखर बाबू आणि एस रेगुपती यांच्यासह राज्यमंत्री, केंद्रीय राज्यमंत्री एल मुरुगन आणि उच्च अधिकारी उपस्थित होते. केरळचे सध्याचे राज्यपाल असलेले आर्लेकर हे तामिळनाडूचे २७ वे राज्यपाल आहेत.

# एसटीच्या मोकळ्या जागांचा विकास करणार : सरनाईक

## प्रवाशांना आधुनिक सुविधा, स्थानिकांना रोजगार मिळेल

◆ **मुंबई, १२ मार्च**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताब्यातील मोकळ्या व अतिरिक्त जमिनींचा अधिक परिणामकारक वापर करून महसूलवाढ करणे, प्रवाशांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे आणि स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती साध्य करणे या उद्देशाने राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. याबाबतची माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानपरिषदेत दिली.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मालकीची राज्यभरातील विविध आगार आणि बसस्थानक परिसरात सुमारे १५०० हेक्टरहून अधिक जमीन उपलब्ध आहे. या जमिनींचा नियोजनबद्ध विकास करून महसूलवाढ साधण्यासाठी त्या सार्वजनिक-खाजगी सहभाग (पीपीपी) तत्त्वावर खासगी विकासकांना देण्याचा प्रस्ताव शासनाने मंजूर केला आहे.



या अंतर्गत संबंधित जागांचा ९८ वर्षांच्या भाडेकरारावर पुनर्विकास करण्याची योजना आहे.राज्यात सध्या एस. टी. महामंडळाचे २५१ डेपो आणि ५८१ बसस्थानके कार्यरत आहेत. त्यापैकी सुमारे ४८२ ठिकाणी जवळपास २ हजार ३६० हेक्टर जमीन विकासासाठी उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले आहे. या जागांच्या विकासासाठी २०१७ मध्ये निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. मात्र, अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने ती पुढे जाऊ शकली नव्हती. त्यानंतर नेमलेल्या उच्चाधिकार समितीच्या शिफारशींनुसार सुधारित धोरण तयार करण्यात आले असून आता नव्याने निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.पहिल्या टप्प्यात मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि पुणे यांसारख्या प्रमुख शहरांमधील एस. टी.च्या जागांचा विकास करण्यात येणार आहे. या ठिकाणी बसस्थानकांचे आधुनिकीकरण, व्यापारी संकुले, कार्यालयीन इमारती तसेच प्रवाशांसाठी विविध आधुनिक सुविधा उभारण्याचा प्रस्ताव आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

### भाडेकरार ३० ऐवजी ६० वर्षांपर्यंत वाढविणार

शासनाने सुधारित धोरणानुसार भाडेकराराचा कालावधी ३० वर्षांऐवजी ६० वर्षांपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला असून व्यावसायिक विकास प्रकल्पांसाठी ४९ आणि ४९ वर्षे म्हणजे एकूण ९८ वर्षांचा करार करण्याची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे गुंतवणूकदारांना प्रकल्प राबविण्यास प्रोत्साहन मिळेल, तसेच एस. टी. महामंडळालाही दीर्घकालीन आर्थिक लाभ होईल. आर्थिक व्यवहार्यतेनुसार 'अ', 'ब' आणि 'क' श्रेणीतील जागांचा समावेश करून पहिल्या टप्प्यात ७२ प्रकल्पांतून २१६ ठिकाणांचा विकास पीपीपी तत्त्वावर करण्याचा प्रस्ताव आहे. ■



अर्थसंकल्पीय अधिवेशन

# पेसा भरती प्रक्रियेचा दर तीन महिन्यांनी आढावा

◆ **मुंबई, १२ मार्च**

पेसा क्षेत्रातील पदभरती प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्यासाठी शासनाकडून नियमित आढावा घेतला जाणार असून दर तीन महिन्यांनी या प्रक्रियेचा आढावा घेण्यात येईल, अशी माहिती सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत दिली.

विधानसभेत सदस्य राजू तोडसाम यांनी पेसा क्षेत्रातील १३ जिल्ह्यांमधील १७ संवर्गांच्या पदभरतीचा मुद्दा लक्षवेधी सूचनेद्वारे उपस्थित केला होता. या चर्चेत सदस्य सुधीर मुनगंटीवार, नितीन राऊत आणि किरण लहामटे यांनीही सहभाग घेतला. यावेळी उत्तर देताना मंत्री शेलार म्हणाले की, पेसा क्षेत्रातील पदभरती गुणवत्तेच्या आधारे केली जात असून उमेदवारांच्या सेवा जेष्ठतेवर कोणताही अन्याय होणार नाही. संबंधित उमेदवारांना कायमस्वरूपी नियुक्ती देण्याची प्रक्रिया सुरू असून ती शक्य तितक्या लवकर पूर्ण केली जाईल. ◀(तभा वृत्तसेवा)

# कर्जमाफीतील अटींमुळे शेतकरी संभ्रमात: वडेट्टीवार

◆ **मुंबई, १२ मार्च**



राज्य सरकारने अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या दोन लाख रुपयांपर्यंतच्या शेतकरी कर्जमाफी योजनेबाबत अद्याप स्पष्ट निकष जाहीर केलेले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. त्यामुळे या कर्जमाफीच्या अटी-शर्ती तातडीने स्पष्ट कराव्यात, अशी मागणी काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवाड यांनी विधानसभेत केली. अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेत बोलताना वडेट्टीवार म्हणाले की, सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीसाठी ३० सप्टेंबर २०२५ ही अट घालण्यात आली आहे. मात्र प्रत्यक्षात कर्जमाफीची अंमलबजावणी कशी होणार, याबाबत सरकारने स्पष्ट भूमिका मांडलेली नाही. एखाद्या शेतकऱ्याचे कर्ज दोन लाखांपेक्षा जास्त असल्यास त्या कर्जातून थेट दोन लाखांची माफी दिली जाणार की उर्वरित रक्कम आधी भरावी लागणार, याबाबतही शंका उपस्थित होत असल्याचे त्यांनी सांगितले. निवडणुकीदरम्यान शेतकऱ्यांचे 'सातबारा कोरा' करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र आता विविध अटी घालून कर्जमाफी जाहीर केल्याने शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. कर्जमाफीची अपेक्षा ठेवून अनेक शेतकऱ्यांनी कर्जफेड थांबवली असून त्यामुळे त्यांचे कर्ज व्याजासह वाढत असल्याची बाब त्यांनी निदर्शनास आणून दिली. ◀(तभा वृत्तसेवा)

# धान उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात १५८८.७६ कोटी जमा

◆ **मुंबई, १२ मार्च**

राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत करण्यात आली असून



आतापर्यंत १५८८.७६ कोटी रुपयांची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे, अशी माहिती अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी विधान परिषदेत दिली.



भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत सदस्य परिणय फुके यांनी उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेला उत्तर देताना मंत्री भुजबळ बोलत होते.

मंत्री भुजबळ म्हणाले की, धान खरेदी ही केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत केली जाते. दरवर्षी जाहीर होणाऱ्या हमीभावानुसार राज्यात धान खरेदी केली जाते. राज्यात सहकारी पणन महासंघ आणि महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ यांच्या माध्यमातून खरेदी केंद्रे सुरू करून मोठ्या प्रमाणावर धान संकलन करण्यात येत आहे.

शेतकरी नोंदणीसाठी दिलेल्या वाढीव मुदतीत राज्यातील ७ लाख १६ हजार ३३१ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. सध्या धानाला प्रतिक्विंटल २३६९ रुपये हमीभाव देण्यात येत असून राज्य शासनाकडून दोन हेक्टरपर्यंतच्या क्षेत्रासाठी प्रति हेक्टर २० हजार रुपये प्रोत्साहन भत्ता दिला जात आहे. या योजनेअंतर्गत एकूण १६३५.७८ कोटी रुपयांपैकी १५८८.७६ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले असून उर्वरित रक्कम संबंधित संस्थांमार्फत वितरित करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

धान साठवणुकीसाठी गोदामांची कमतरता भासू नये यासाठी ३३१.४९ कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. धान खरेदी प्रक्रियेत गैरप्रकार आढळल्यास कठोर कारवाई केली जात असून निकृष्ट तांदूळ पुरविणाऱ्या १५ ते १६ गिरण्यांना काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. गडचिरोली जिल्ह्यात ३९ गिरण्यांवर दंडात्मक कारवाई तसेच गुन्हे नोंदविण्याची प्रक्रिया राबविण्यात आल्याचेही भुजबळ यांनी स्पष्ट केले. ◀(तभा वृत्तसेवा)

**वरोरा दूषित पाणी बालक मृत्यू प्रकरण**

# विदर्भ मल्टी सर्व्हिसेस कंपनीला काळ्या यादीत टाकणार : मिसाळ

◆ **मुंबई, १२ मार्च**

वरोरा शहरातील दूषित पाणीप्रकरणी देखभाल करणाऱ्या विदर्भ मल्टी सर्व्हिसेस कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात येईल, अशी घोषणा नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत केली. या प्रकरणी वरोरा मतदारसंघाचे आमदार करण देवतळे यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे प्रश्न उपस्थित केला होता.

वरोरा शहरातील पाणीपुरवठा योजना सन १९७२ मध्ये सुरू झाली. या योजनेला आता पन्नास वर्षांहून अधिक काळ लोटला असून शहरातील बहुतांश पाण्याच्या नळजाळ्यांची अवस्था मोडकळीस आली आहे. त्यामुळे नागरिकांना दूषित पाणी मिळत असल्याचे प्रशासनाने मान्य केले आहे. जुलै २०२४ मध्ये दूषित पाणी पिल्यामुळे चार वर्षांच्या मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली होती. त्यानंतर पाण्याचे नमुने तपासण्यात आले असता पाणी दूषित असल्याचे स्पष्ट झाले. नगरपालिकेकडे आवश्यक मनुष्यबळ नसल्यामुळे २०२४-२५ या कालावधीत पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी विदर्भ मल्टी सर्व्हिसेस या कंपनीकडे देण्यात आली होती. या घटनेची चौकशी करण्यासाठी स्वतंत्र चौकशी समिती नेमण्यात आली होती. मात्र, घटनेला दोन वर्षे उलटूनही संबंधित कंपनीवर कोणतीही कारवाई झालेली नसल्याबाबत आमदार देवतळे यांनी सभागृहात प्रश्न उपस्थित केला.

मंत्री मिसाळ यांनी सांगितले की, त्या काळातील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या अहवालात पाणी दूषित नसल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र पोलिसांच्या तपासात पाणी दूषित असल्याचे निष्पन्न झाले. शवविच्छेदन अहवालातही मुलाचा मृत्यू अतिसार व उलट्यांमुळे झाल्याचे स्पष्ट झाले आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

# आई-वडिलांच्या देखभालीसाठीचे विधेयक अडकल्याने सभागृहात खळबळ

◆ **मुंबई, १२ मार्च**

राज्यातील शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपल्या आई-वडिलांची जबाबदारी पार पाडावी यासाठी आणलेले खासगी सदस्यांचे विधेयक अनुवादाच्या कारणावरून चर्चेसाठी न घेतल्याने विधानसभेत वाद निर्माण झाला. ज्येष्ठ सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी यावर तीव्र आक्षेप घेतला.

राज्यातील अधिकारी किंवा कर्मचारी आपल्या आई-वडिलांची देखभाल करत नसतील तर त्यांच्या पगारातील २० टक्के रक्कम थेट आई-वडिलांच्या खात्यात जमा करण्याची तरतूद या विधेयकात आहे. समाजहिताचा आणि हजारो पालकांना आधार देणारा हा महत्त्वाचा निर्णय असूनही केवळ अनुवाद उपलब्ध नसल्याच्या कारणावरून ते विधेयक चर्चेसाठी घेतले जात नसल्याची खंत मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

डिसेंबर महिन्यातच हे विधेयक सादर केले होते. मात्र त्यानंतर ते मतपत्रिकेतून वगळण्यात आले. याबाबत चौकशी केली असता विधेयकाचा अनुवाद दिला नसल्याचे कारण सांगण्यात आल्याचे त्यांनी सभागृहात नमूद केले. आपण मराठीतच विधेयक सादर करणार असून त्यासाठी अडथळे निर्माण करू नयेत, अशी मागणीही त्यांनी केली.

यावर स्पष्टीकरण देताना विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर म्हणाले की, ही तरतूद कोणत्याही विभागाने किंवा राज्यपालांनी केलेली नसून देशाच्या राज्यघटनेत स्पष्टपणे नमूद आहे. राज्यघटनेतील अनुच्छेद ३४८ नुसार कोणतेही विधेयक सादर करताना त्याचा अनुवाद देणे आवश्यक आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

# सुरक्षित बचावलो ही देवाचीच कृपा : फारूक अब्दुल्ला

जम्मू : जम्मू आणि काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांच्यावर एका लग्न समारंभात बुधवारी गोळीबाराचा प्रयत्न झाला. यात त्यांना कुठलीही दुखापत झाली नाही, मात्र या घटनेनंतर जम्मू आणि काश्मीरमधील सुरक्षा परिस्थितीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हल्ल्यानंतर माध्यमांशी बोलताना अब्दुल्ला म्हणाले, देवाच्या कृपेमुळेच मी बचावलो. शहराच्या बाहेरील ग्रेटर कैलाश येथे एका लग्न समारंभात ही घटना घडली. फारुख अब्दुल्ला कार्यक्रमातून बाहेर पडत असताना, कमल सिंग जामवाल नावाच्या व्यक्तीने त्यांच्यावर गोळीबार करण्याचा प्रयत्न केला. तथापि, अब्दुल्ला यांना कोणतीही इजा झाली नाही. हल्लेखोराला अटक करण्यात पोलिसांना यश आले. नॅशनल कॉन्फरन्सच्या नेत्यांनी या घटनेचा तीव्र निषेध केला आहे आणि हल्लेखोरावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी त्यांचे वडील आणि नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष फारुख अब्दुल्ला यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्यावर चिंता व्यक्त केली आहे.

# इराणच्या हल्ल्यात अमेरिकी तेल टँकर उद्ध्वस्त

**इराकच्या सागरी हद्दीत केले लक्ष्य** | **एका भारतीयाचा मृत्यू** | **२७ चालक दलाचे सदस्य बचावले**

◆ **बगदाद, १२ मार्च**

इराकच्या खोर अल-जुबैर बंदराजवळ इराणी आत्मघातकी नौकेने अमेरिकन तेल टँकरवर हल्ला केला. या घटनेत एका भारतीय नागरिकाचा मृत्यू झाला, तर २७ चालक दलाचे सदस्यांना वाचवण्यात यश आले.

हल्ला झालेल्या जहाजाचे नाव 'सफेसी विष्णू' आहे, जे मार्शल बेटांचा ध्वज फडकवणारे एक अमेरिकन जहाज आहे. हल्ल्याच्या वेळी त्यात एकूण २८ लोक होते. एका भारतीयाचा मृत्यू झाला, तर उर्वरित २७ जणांना सुरक्षितपणे वाचवण्यात आले. सुटका केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना इराकमधील बसरा येथे नेण्यात आले, अशी माहिती अमेरिकेच्या नौदलाने दिली आहे.

सफेसी विष्णू हा २००७ मध्ये बांधलेला एक मोठा कच्च्या तेलाचा टँकर आहे. तो अंदाजे २२८ मीटर लांब आणि ३२ मीटर रुंद आहे. या हल्ल्यामुळे या प्रदेशातील सुरक्षेबाबत चिंता निर्माण झाल्याचे भारताने म्हटले आहे. दुसरीकडे ओमानच्या सलालाह बंदरावर इराणने ड्रोन हल्ला केला. यात तेल साठवणूक टाक्यांना लक्ष्य करण्यात आले. ब्रिटिश सागरी सुरक्षा कंपनी एम्ब्रेअरनेही हल्ल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला. ड्रोनच्या माऱ्यात पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाल्याची माहिती ओमानच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे. ओमानचे सुलतान हैथम बिन तारिक अल-सईद यांनी हल्ल्याचा तीव्र निषेध केला.



### अटी मान्य करा, युद्ध थांबवतो : पेझेश्किन

आमच्या तीन मागण्या मान्य झाल्या तर संघर्ष थांबवू शकतो, असे इराणचे राष्ट्रपती मसूद पेझिश्किन यांनी म्हटले आहे. समाज माध्यमावरील पोस्टमध्ये त्यांनी म्हटले की, अमेरिकेने इराणचे कायदेशीर हक्क मान्य करावे. आम्हाला नुकसान भरपाई द्यावी आणि यापुढे असा हल्ला करणार नाही याची आंतरराष्ट्रीय स्तरावर ठोस शाश्वती मिळाली तरच युद्ध थांबू शकते. ■

### ब्रिटनच्या जहाजांवर हल्ले

होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ ब्रिटनच्या तीन व्यापारी जहाजांवर ड्रोनचा मारा करण्यात आला. ब्रिटनच्या मेरीटाईम ट्रेड ऑपरेशन्स सेंटरने हल्ल्याच्या माहितीला दुजोरा दिला. सातत्याने होणाऱ्या हल्ल्यांमुळे आंतरराष्ट्रीय व्यापार आणि सागरी सुरक्षेला मोठा धोका निर्माण झाल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

### इराणच्या ५८ नौका नष्ट : ट्रम्प

अमेरिकन सैन्याने होर्मुझच्या सामुद्रधुनीत इराणी नौदलाच्या ५८ नौका नष्ट केल्या. ही कारवाई जागतिक सागरी व्यापार आणि तेल पुरवठ्याचे रक्षणासाठी करण्यात आली. सागरी सुरक्षेसाठी अमेरिकन नौदल प्रयत्नरत असून, इराणच्या कोणत्याही कृतीला ताकदीने प्रत्युत्तर देणार असल्याचे ट्रम्प यांनी म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)

# शिवसेना पक्ष, चिन्हावर पुन्हा 'तारीख पे तारीख'

## पुढील सुनावणीबाबत अनिश्चितता



◆ **मुंबई, १२ मार्च**

शिवसेना पक्ष आणि चिन्हावरील वादावर सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी पुन्हा लांबणीवर पडली आहे. न्यायालयाने पुढील सुनावणीसाठी पुढील तारीख निश्चित केलेली नाही. दोन्ही बाजूंचा लेखी युक्तिवाद अभ्यासल्यानंतर न्यायालय पुढील तारीख निश्चित करणार आहे.

गुरुवारच्या सुनावणीदरम्यान उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी बाजू मांडली. दोन्ही गटांनी (ठाकरे आणि शिंदे) अंतिम युक्तिवादासाठी तयारी दर्शवली आहे. या प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याने दोन्ही बाजूंचे लेखी मसुदे आधी अभ्यासले जातील आणि त्यानंतरच अंतिम सुनावणीसाठी तारीख निश्चित केली जाईल, असे न्यायालयाने स्पष्ट केल. पुढील तारीख न्यायालयाकडून नंतर कळवण्यात येणार आहे.

२०२२ मध्ये शिवसेनेत पडलेल्या उभ्या फुटीनंतर हा वाद सर्वोच्च न्यायालयात पोहोचला होता. निवडणूक आयोगाने फेब्रुवारी २०२३ मध्ये धनुष्यबाण चिन्ह आणि शिवसेना नाव एकनाथ शिंदे गटाला दिले. या निर्णयाला उद्धव ठाकरे यांनी आव्हान दिले आहे. ही याचिका गेल्या तीन वर्षांपासून प्रलंबित असल्याने शिवसैनिकांमध्ये आणि राजकीय वर्तुळात निकालाबाबत मोठी उत्सुकता आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

# होर्मुझमधील २० टँकर्सला सुरक्षित मार्ग द्या

## भारताच्या इराणसोबत वाटाघाटी

**नवी दिल्ली, १२ मार्च**

होर्मुझच्या सामुद्रीधुनीत भारताच्या तेल आणि वायूच्या २० टँकर्सला सुरक्षित मार्ग मिळावा यासाठी भारत इराणसोबत वाटाघाटी करीत आहे. या वाटाघाटी परराष्ट्र मंत्रालय करीत आहे.

इराण युद्धामुळे पर्शियन आखाताला ओमानच्या आखाताशी जोडणारा अरुंद जलमार्ग सध्या बंद आहे. जगातील कच्च्या तेलाचा एक पंचमांश भाग सामान्यतः होर्मुझच्या सामुद्रीधुनीतून जातो.



अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांमुळे द्रवीभूत पेट्रोलियम वायू, द्रवीभूत नैसर्गिक वायू आणि कच्चे तेल असलेले हे टँकर्स होर्मुझच्या सामुद्रधुनीत अडकले आहेत.

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि इराणचे मंत्री अब्बार अरघाची यांच्यात चर्चा झाल्यानंतर इराणने भारतीय तेल टँकर्सला धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या जलमार्गावरून जाण्याची परवानगी दिली आहे, अशी माहिती यापूर्वी सूत्रांनी दिली होती. नंतर परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनीही दोन्ही नेत्यांमधील चर्चेचा उल्लेख केला. पण, अधिक माहिती देण्यास नकार दिला. अरघाची यांच्यासोबत एस. जयशंकर यांची चर्चा झाली. दोन्ही बाजूंनी संपर्कात राहण्याचे मान्य केले, असे जयस्वाल यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले होते. मात्र, यात त्यांनी जहाजांचा उल्लेख केला नव्हता. वाटाघाटी यशस्वी झाल्या तर भारतातील ऊर्जासंकट संपुष्टात येईल. ◀(वृत्तसंस्था)

### दोन भारतीय जहाजांना परवानगी

» २८ फेब्रुवारीपासून सुरू असलेल्या युद्धात अडकण्याच्या भीतीन बहुतांश जहाजे अडकून पडली असली, तरी इराण-अमेरिका युद्धादरम्यान दोन भारतीय ध्वज असलेल्या जहाजांना होर्मुझच्या सामुद्रीधुनीतून जाण्याची परवानगी देण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

भारतीय जहाजे बुधवारी रात्री ते गुरुवारी सकाळच्या दरम्यान सामुद्रीधुनीतून सुरक्षितपणे प्रवास करू लागली. या प्रकरणातील अधिकृत निवेदनाची प्रतीक्षा आहे. बुधवारी सौदी अरबमधील कच्च्या तेलाची वाहतूक करणाऱ्या लायबेरियाच्या ध्वजांकित टँकरने होर्मुझची सामुद्रधुनी पार करून मुंबई बंदरात आल्यानंतर ही घडामोड घडली आहे. अमेरिका आणि इस्रायलने इराणवर हल्ल केल्यापासून सागरी वाहतूक जवळपास थांबली आहे. या जलमार्गावरून सुरक्षितपणे प्रवास करणारे हे भारताचे पहिले जहाज ठरले आहे. ■

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## अग्रलेख...

# जगणे आणि जिवंत असणे...

जन्माला आलेल्या प्रत्येक सजीवाचा श्वास सुरू असतो तोवर तो जिवंत असतो. ज्या क्षणी श्वास बंद होतो, त्या क्षणी त्याचा जिवंतपणा संपतो. म्हणजे, जिवंत असणे हे केवळ दोन श्वासांमधील अंतर असते. त्यालाच जीवन असे म्हटले जाते. जिवंत असणे आणि जगणे यांमध्ये फार मोठे अंतर असते. जन्माला आलेला प्रत्येक जण मरण येईपर्यंत जिवंत राहत असला, तरी केवळ श्वास सुरू असल्यामुळे पुढे सरकत राहिलेल्या या जिवंतपणाच्या काळात तो कसा जगला, यावर जगण्याचे सार्थक झाले किंवा नाही ते ठरविले जाते. आयुष्य ही अपघाताने मिळालेली देणगी असते. जन्म ही आपल्या इच्छेनुसार करता येणारी निवड नसते. ते स्वीकारायचे की नाही, हे आपण ठरवू शकत नसलो, तरी आपल्या वाट्याला आलेले जीवन कसे जगायचे, त्याला कोणता अर्थ आणि आकार द्यायचा हे मात्र आपण ठरवू शकतो. जीवनाची लांबी किती होती, यावर जगण्याचा अर्थ ठरत नसून निसर्गाने दिलेल्या जन्माचे जगणे झाले किंवा नाही, यावर तो ठरत असतो. जीवन जगण्याची ताकद गमावली की जगणे म्हणजे केवळ श्वास घेणे असते. असा जन्म मिळणे, असे आयुष्य वाट्याला येणे हेदेखील अनेकदा आपल्या हातात नसते, त्यामुळेच असे आयुष्य जगत राहायचे किंवा नाही, हे ठरविणे तरी आपल्या हातात असले पाहिजे, या मागणीसाठी दीर्घकाळापासून सुरू असलेल्या संघर्षाला आता काहीशी दिशा मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. जीवन जगण्याची हीच स्वातंत्र्यपूर्ण निवड माणसाला, त्याच्या अस्तित्वाला अर्थ देण्याची ताकद प्रदान करते, या विचारांना मान्यता मिळण्याचे संकेत आता मिळू लागले आहेत.

सर्वोच्च न्यायालयासमोरील एका मानवतावादी खटल्याच्या निकालात न्यायालयानेही हाच विचार केल्याने, जिवंत राहणे आणि जगणे यांच्यातील फरक आता स्पष्ट होणार आहे. श्वास घेणारा प्रत्येक सजीव काळासोबत जिवंत राहत असतो, पण त्याचे जिवंत असणे निर्जीव वस्तूसारखेच असेल, त्याला सन्मानाने जगण्याचा हक्क बजावता येत नसेल, तर त्याला सन्मानपूर्वक मृत्यूला सामोरे जाण्याचा हक्क तरी मिळावयास हवा, यावर गेल्या अनेक दशकांपासून सुरू असलेल्या सामाजिक विचारमंथनातून काही ठोस निष्पन्न होण्याची चिन्हे आता दिसू लागली आहेत. पंजाब विद्यापीठात शिक्षण घेत असताना एका इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून पडून अंतर्बाह्य शारीरिक दुखापतींमुळे गेल्या १३ वर्षांपासून मरणासन्न बेशुद्धावस्थेत असलेल्या हरीश राणा या तरुणास कृत्रिमरीत्या जिवंत ठेवण्यासाठी लावलेली जीवरक्षक उपचार प्रणाली काढून त्याला सन्मानपूर्व नैसर्गिक मृत्यू पत्करण्यास परवानगी मिळाली. या मागणीसाठी त्याच्या जन्मदात्यांनी केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या सकारात्मक भूमिकेतून एका प्रदीर्घ चळवळीला बळ मिळाले आहे. वैद्यकीय भाषेत ज्याला निष्क्रिय इच्छामरण म्हटले जाते; त्यास न्यायालयीन परवानगी देणारा हा निकाल ऐतिहासिक ठरला आहे. जन्माला येणाऱ्या प्रत्येकास सन्मानाने जगण्याचा मूलभूत हक्क आहे, असा निकाल सन २०१८ मध्येच देऊन सर्वोच्च न्यायालयाने एक प्रकारे निष्क्रिय इच्छामरणाच्या पाठपुराव्याच्या प्रयत्नांना आशेचा किरण दाखविला होता. आता हरीश राणा याच्या प्रकृतीची संपूर्ण तपासणी करून घेतल्यानंतर व त्याच्या प्रकृतीत पूर्ववत सुधारणा होण्याची व तो पूर्णपणे ठणठणीत होण्याची सूतराम शक्यता नसल्याची खात्री करून घेतल्यानंतर त्याच्या निष्क्रिय इच्छामरणाच्या हक्कावर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले. जीवरक्षक उपचार प्रणालीद्वारे केवळ जिवंत राहण्यापेक्षा ती प्रणाली बंद करणे हा त्याच्या सन्मानाने जगण्याच्या व सन्मानपूर्वक मरण्याच्याही हक्काचा सन्मान ठरेल, असाच विचार कदाचित न्यायालयाने केला असावा. कारण, निकालपत्राच्या प्रारंभीच न्यायालयाने जगणे आणि जिवंत असणे यांतील फरकाचा परामर्ष घेतलेला दिसतो. तुला जन्म हवा आहे किंवा नाही, असे ईश्वर कोणाही व्यक्तीस विचारत नसतो. त्यामुळेच जन्माला येणे ही कोणाच्या पसंतीची किंवा नापसंतीची बाब नसते. ते स्वीकारावेच लागते आणि म्हणून जन्माला आल्यानंतर आयुष्य कसे जगायचे हे ठरविण्याचा अधिकार त्याला असतो, हे हेन्री वॉर्ड बीचर या अमेरिकन धर्मोपदेशकाचे वाक्य निकालपत्रात उद्धृत करून न्यायालयाने हरीश राणा यास सन्मानाने मरण देण्याच्या मागणीस सकारात्मक प्रतिसाद दिला असावा.

सुमारे १० वर्षांपूर्वी, १८ मे २०१६ या दिवशी, मुंबईतील अरुणा शानबाग नावाच्या एका परिचारिकेच्या तब्बल चार दशकांच्या जीवनमरणाच्या संघर्षाचा शेवट झाला, तेव्हाच सन्मानपूर्वक मृत्यूच्या मागणीची दीर्घकाळापासून प्रतीक्षा पुन्हा एकदा प्रबळ झाली होती. जिवंतपणी मरणयातना भोगल्याने माणूसपण हरवलेली अरुणा शानबाग नावाची ही महिला जवळपास ४० वर्षे मुंबईच्या केईएम इस्पितळाच्या बिछान्यात संवेदनाहीन अवस्थेत पडून राहिलेली होती. अशा मरणप्राय जिवंतपणातून तिला मुक्ती द्यावी, यासाठी दयामरणाचा किंवा इच्छामरणाचा लढा तिच्या संवेदनाहीन जिवंतपणीच सुरू झाला होता. सजीवपणाचे लक्षण सांगणाऱ्या सर्व संवेदना हरवलेल्या अवस्थेत किंवा जगण्यामरण्याच्या जाणिवा संपलेल्या अवस्थेत केवळ श्वास घेत जगत राहण्यापेक्षा, समाधानाने मृत्यूला सामोरे जाण्याची किंवा मरण देण्याची मागणी अनेक दशकांपासून अनेकांकडून सातत्याने सुरू होती. जन्म घेणे आपल्या हाती नाही, पण मरण तरी आपल्या हाती असले पाहिजे, असा दावा करीत इच्छामरणाचे असंख्य पुरस्कर्ते सरकार दरबारी याचना करीत वर्षानुवर्षे कायद्याकडे डोळे लावून बसले होते.

शक्य तितक्या अधिक काळ जगण्याची असोशी प्रत्येकाला असली, तरी 'मृत्यू' हेच जिवंतपणाचे एकमेव लक्षण असते, हे मान्य केले पाहिजे. कारण मृत्यू हा केवळ जिवंतांच्याच वाट्याला येणारे नैसर्गिक घटित असते. असंख्य निर्जीव दगडधोंडे वर्षानुवर्षे त्याच स्थितीत पडून असतात. त्यांच्या जन्माला स्वयंभू कहाण्या नसतात. त्या निरीच्छ धोंड्यांना कसल्याच संवेदना नसतात. सृष्टीतील सुख-दुःखाच्या कोणत्याही घडामोडींचा त्यांच्या अस्तित्वावर कोणताही परिणाम होत नसतो आणि त्यांना मृत्यूची वेदनाही नसते. म्हणून सजीवपण हे वेगळेपण ठरते आणि मृत्यू हा त्याचा शेवटचा क्षण असतो. अत्यंत दुर्धर आजाराने ग्रासलेल्या, केवळ मरण येत नाही एवढेच जिवंतपणाचे कारण असलेल्या व्यक्तीस दयामरण देण्यासंदर्भातील कायदा करण्यापूर्वी जनमत आजमावण्याचा एक निर्णय त्याच काळात केंद्र सरकारने घेतला. इच्छामरण, दयामरण या बहुचर्चित विषयाचे अनेक अंगांनी मंथन सुरू झाले. सन्मानाने जगण्याची कोणतीच लक्षणे उरलेली नसल्याच्या अवस्थेत जगणाऱ्या रुग्णांची संख्याही वाढत असल्याने दयामरण हा सन्मानपूर्वक मृत्यू तरी ठरेल, असा मतप्रवाह चर्चेत आला. आसन्नमरण अवस्थेतील व्यक्तीला उपचाराने जगविणे हे नैसर्गिक जगणे ठरणार नाही; त्याला तशा अवस्थेत जगविणेदेखील उचित नाही, असे वैद्यकीय क्षेत्रातील अनेक जण मान्य करीत असले, तरी जगविणे हीच त्या क्षेत्राची नीती असल्याने दयामरण हे वैद्यकीय व्यवसायाच्या नैतिकतेला धरून नाही, असाही दावा केला गेला होता. अरुणा शानबाग यांना दयामरण देण्याच्या मागणीसाठी दाखल झालेल्या याचिकेवर निर्णय देताना, इच्छामरण हा गुन्हा नाही, असे मत न्यायालयाने नोंदविले होते. त्यामुळे दयामरण आणि इच्छामरणाच्या मुद्यावर सकारात्मक विचार करण्याची मानसिकता तरी सुदृढ होऊ लागली. मृत्यू ही आनंददायी घटना नाही, हे आपण भावनिकदृष्ट्या स्वीकारलेले सत्य असले, तरी मृत्यू टाळता येत नाही, हेदेखील सत्य आहे. सजीवाचे या जगात येणे ज्या क्षणी निश्चित होते, त्याच क्षणी त्याचे जाणेही निश्चित असते. त्यामुळे मृत्यूकडे मानवतेचा किंवा सजीवांचा शत्रू वगैरे दृष्टीने पाहण्यापेक्षा नैसर्गिक अपरिहार्यता म्हणून बघितले पाहिजे. आपला जन्म हे जीवशास्त्रीय घटित असेल तर मृत्यूही जीवशास्त्रीय घटितच असते. काही वेळा हे घटित लांबणीवर पडत असेल आणि एखाद्याला मरण समोर दिसत असूनही त्याला नुसत्या वेदना सोसत दिवस काढावे लागत असेल तर असा कायदेशीर पर्याय उपलब्ध असण्यासाठी व्यवस्था निर्माण केली पाहिजे. शेवटी जगणे आणि जिवंत असणे यात फरक असतोच.

## प्रासंगिक

विजय पांढरीपांडे

# 'युद्धे का होतात' मला माहिती नाही!

युद्धे का होतात हा मला पडलेला प्रश्न आहे. माझे राजकारणाचे ज्ञान मुळातच मर्यादित आहे. आजकाल अवतीभवतीचे राजकारण इतके गलिच्छ झाले आहे की, त्याबद्दल खोलात न शिरलेलेच बरे! युद्धाचा संबंध आंतरराष्ट्रीय राजकारणाशी असतो. तो विषय तर अधिकच किचकट! आपल्याकडे अगदी रामायण-महाभारतापासून युद्धाच्या सुरस चमत्कारिक कथा आपण लहानपणापासून ऐकत आलोय. 'युद्धस्थ कथा रम्या' असे प्रचलित वचन आहे. शाळेत अभ्यासक्रमाचा भाग म्हणून इतिहासातील युद्धाच्या सुरस कथा आपण वाचल्या आहेत. मार्क मिळविण्यासाठी ती सनावली पाठदेखील केली आहे; पण त्यातून काहीच शिकलो नाही. कारण त्या वयात शिकण्यासारखे काही नव्हतेच त्या इतिहासात. पुढे होऊन गेलेल्या दोन महायुद्धाच्या कथा काहींनी अभ्यासल्या असतील, वाचल्या असतील. तरीही नेमकी युद्धे का होतात? एकमेकाच्या सहकार्याने जगू पाहणारा, प्रगती करणारा माणूस एकमेकाच्या अंगावर का धावून जातो? एकमेकांचा संहार करण्याला का प्रवृत्त होतो?



तसे पाहिले तर एकूणच जगाच्या बहुतांश भागात भरपूर प्रगती झाली आहे. माणसाच्या मूलभूत गरजा पूर्ण होण्याइतकी समृद्धी आली आहे. समाजात गरिबी-श्रीमंती असे भेद असले, तरी पूर्वीइतकी हलाखीची परिस्थिती फार कमी भागात आहे पूर्वीच्या तुलनेत. मुख्य म्हणजे जे युद्धासाठी सरसावले आहेत ते सगळे बऱ्यापैकी चांगले जीवन जगताहेत. शांततेत जगले तर ते अधिक पुढे जाऊ शकतात. अवतीभवतीची परिस्थिती आहे त्यापेक्षा अधिक चांगली घडवू शकतात. स्वतःच्या सर्व गरजा पूर्ण करून इतरांना बरेच काही देऊन सुखी करू शकतात. मग या राष्ट्रप्रमुखांना ही युद्धाची अवदसा का आठवते? हा भीषण नरसंहार, हे अमानुष क्रौर्य कशासाठी? समाज कितीही प्रगत झाला तरी त्याची मूलभूत स्वार्थी प्रवृत्ती बदलत नाही. जे काही चांगले ते फक्त मलाच, आम्हालाच मिळाले पाहिजे. इतरांना म्हणजे कधीतरी केव्हातरी ज्यांनी आपल्याला त्रास दिला, ज्यांच्यामुळे आपल्याला अडचणी आल्या, त्यांना आपल्या सुखात आपल्याला सहभागी करून घ्यायचे नसते. याला वर्णभेद, वंशभेद, जातिभेद... काहीही नाव द्या. समाज जसजसा विकसित झाला तशा या भेदाच्या पोलादी भिंती अधिकाधिक उंच होत गेल्या. विषमता वाढतच गेली. द्वेष-मत्सर भावना कमी होण्याऐवजी तीव्र होत गेली. प्रत्येकाचे आपापले धर्मग्रंथ आहेत. पारंपरिक संस्कारातून आलेली चांगली शिकवण आहे. कुठलाही धर्म, कुठलीही संस्कृती इतरांचे वाईट करा, इतरांना तुच्छ लेखा, एकमेकांचा संहार करा,असे मुळीच सांगत नाही. भाषा वेगळी असेल, सांगण्याची पद्धत वेगळी असेल, पण प्रत्येक धर्म, प्रत्येक राष्ट्राची संस्कृती ही प्रेम, दया, सहानुभूतीचीच शिकवण देते. तरीही युद्धे का होतात? लोकशाही मार्गाने निवडून आलेली, स्वतःला लोकप्रतिनिधी म्हणवणारी सुशिक्षित नेते, राज्यकर्ते एकदम थेट युद्धाचे रणशिंग का फुंकतात? हा विनाशी निर्णय घेणाऱ्या नेत्यांच्या मागे त्यांचे लोक असतात का? त्यांनाही हा भीषण नरसंहार, रक्तपात मान्य असतो का? तसे वाटत नाही. कारण सामान्य माणसाला सुखा-समाधानात, शांतीने जगण्यात रस असतो फक्त. देशाच्या सीमा, त्यावरून होणारे वाद, दोन देशातले व्यापारी संबंध, त्यातून निर्माण होणारे ताणतणाव यामुळे त्याच्या आयुष्यावर फारसा काही फरक पडणार नसतो. त्याच्या, कुटुंबाच्या गरजा पूर्ण झाल्या की सामान्य माणूस सुखी-आनंदी असतो. हे राजकारण, हा धार्मिक द्वेष, हा वर्ण-वंश भेद ही मूठभर सत्ताधारी राजकारणी मंडळींची मक्तेदारी असते. ही त्यांची वैयक्तिक मिजास असते. स्वतःचा अहं जोपासण्यासाठी, स्वतःचे राजकीय महत्त्व राखण्यासाठी, खरे म्हणजे स्वतःची सत्ता शाबूत ठेवण्यासाठी ही निवडक मंडळी हा जीवघेणा खेळ खेळत असतात.

सध्या हेच चालू आहे. महाभारतापासून चालत आलेल्या, पहिल्या-दुसऱ्या महायुद्धात पुनरावृत्ती झालेल्या नाटकाचीच ही नवी आवृत्ती आहे. यात निरपराध स्त्रिया-मुलांचे जीव जातील, सीमेवरचे हजारो सैनिक मारले जातील, शहरे उद्ध्वस्त होतील, रोगराई वाढेल, जागतिक अर्थव्यवस्था कोसळून पडेल. खरे तर आपल्यापैकी कुणालाच हे नको आहे. कुठल्याही देशाच्या नागरिकांनी त्यांच्या राष्ट्र प्रमुखांना या सर्वनाशाचे, निरपराध नागरिकांचे, स्त्रिया-मुलांचे जीव घेण्याचे, नागरी संपत्ती नष्ट करण्याचे, झालेला विकास भुईसपाट करण्याचे अधिकार त्यांच्या राज्यकर्त्यांना दिलेले नाहीत. जे कुणी दहशतवादी असतील, जागतिक शांततेच्या आड येत असतील, निरपराध नागरिकांवर अत्याचार करत असतील, अशा मूठभर विद्रोह्यांना जरूर कठोर शिक्षा द्या. त्यांना हवे तर फाशी द्या; पण आपल्या सत्तालोलूप वृत्तीपायी, स्वार्थ जोपासण्याच्या हट्टापायी हे मूठभर शासन करते. जर जगाला वेठीस धरणार असतील तर हे आपण किती खपवून घ्यायचे, हा खरा प्रश्न आहे. मला उत्तर माहिती नाही. कारण मला यातले फारसे काही कळत नाही!

७६५९०८४५५५

## दखल

मोरेश्वर बडगे

# उद्धव ठाकरेंचा टांगा पलटी होणार?

विधानपरिषदेच्या ९ सदस्यांची मुदत १३ मे रोजी संपत आहे. ज्यांची मुदत संपते आहे त्यात माजी मुख्यमंत्री आणि उबाठाचे सुप्रीमो उद्धव ठाकरे हे एक आहेत. या साऱ्या जागा भरण्यासाठी येत्या एप्रिलमध्ये निवडणूक होईल. गेल्या दोन विधान परिषद निवडणुकांचा अनुभव चांगला नाही. येती निवडणूकही धक्कादायक निकाल देऊ शकते. संख्याबळ पाहिले तर महायुतीकडे एकूण २३५ आमदार आहेत. त्यामुळे महायुतीचे सात उमेदवार सहज निवडून येऊ शकतात. महाविकास आघाडीची एक जागा नक्की निवडून येऊ शकते. कोण येणार या जागी? संख्याबळाचा विचार केला तर महाविकास आघाडीकडे अवघे ४६ आमदार आहेत. लहानसहान पक्ष गोळा केले तरी हा आकडा ५५ जागांच्या पुढे जात नाही. उद्धव यांची यावेळी अग्निपरीक्षा आहे. त्यांना पाडण्याची संधी शिंदेसेना सोडणार नाही. नुकत्याच झालेल्या राज्यसभा निवडणुकीत महाविकास आघाडीमधल्या उद्धव ठाकरे यांच्या उबाठाने स्वतःच्या वाट्याची जागा सोडून राष्ट्रवादीच्या एका गटाचे सुप्रीमो शरद पवार यांना पाठवले होते. त्यामुळे यावेळी उबाठा म्हणजे उद्धव ठाकरे हे विधान परिषदेसाठी दावा ठोकणारच. अशा वेळी काँग्रेस काय भूमिका घेते ते पाहणे महत्त्वाचे राहणार आहे. महापालिका निवडणुकीत काँग्रेसने स्वबळाची भूमिका घेतली होती. त्यामुळे उबाठाला तब्बल ३० जागा गमवाव्या लागल्या होत्या. राज्यसभा निवडणुकीतही काँग्रेस अडून बसली होती. आता मामला विधान परिषदेचा आहे. सारं वाटत राहिलो तर आपल्या हातात काय राहील, असा प्रश्न काँग्रेसला पडणे साहजिक आहे. काँग्रेस अडून बसली तर उद्धव ठाकरे यांचे अवघड आहे. उबाठा आणि काँग्रेस यांच्यात एकमत झाले तरच मार्ग मोकळा होऊ शकतो. पण उबाठाला काँग्रेसची साथ मिळेल का? अवघड प्रश्न आहे. मुळात उद्धव यावेळी लढायला उत्सुक आहेत का, हाही प्रश्न आहे. ते उभे राहतील की आपल्या सहकाऱ्याला उभे करतील? एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातले सरकार कोसळले होते. त्यावेळी ठाकरे यांनी पदाचा राजीनामा दिला होता. मात्र आमदारकी सोडली नव्हती. त्यामुळे आताही ते विधान परिषदेला उभे राहतील, असा त्यांच्या चाहत्यांचा अंदाज आहे. खासदारकी नाही आणि आता आमदारकीही नसेल तर आपण बाजूला पडू, अशी भीती ठाकरेंना आहे. आमदार म्हणून भलेही ते सभागृहात फार बसत नसतील, प्रश्नही विचारत नसतील, तरीही विधानपरिषद ते सोडणार नाहीत. कारण त्यांना संदर्भहीन व्हायचे नाही. पण आमदारकीचा त्यांचा महामार्ग नव्या परिस्थितीत अवघड वाटतो. गुप्त मतदान झालं तर मतं फोडण्याची रणनीती



उद्धव यांना खाऊन टाकेल. निवडणूक बिनविरोध होऊ नये असाच सत्ताधाऱ्यांचा आणि खासकरून शिंदेसेनेचा प्रयत्न असेल. त्यात घोडेबाजार होऊन उद्धव यांचा गेम होऊ शकतो. गेल्या दोन्ही विधानपरिषद निवडणुकीत मतं फुटली होती. आता ती फुटणार नाहीत हे कशावरून? उद्धव यांना नक्की ते टेन्शन असणार.

काँग्रेसच्या दबावतंत्राची सध्या एकनाथ शिंदे यांची शिवसेना मजा घेत आहे. शिंदे सेनेचे नेते खासदार नरेश मस्के यांनी उबाठाला जोरदार टोला हाणला आहे. 'गरज असेल तर शिंदे यांच्याशी संपर्क साधा. फोन केला तरी काम होऊन जाईल' असा खोचक टोला मस्के यांनी उबाठाला मारला. मस्के यांनी एक प्रकारे ठाकरेंना डिवचलंच आहे. शरद पवारांच्या उमेदवारीसाठी ठाकरे सेनेचे खासदार संजय राऊत सक्रिय होते. तेच संजय राऊत आता उद्धव ठाकरे यांच्यासाठी पुढाकार घेत आहेत. चार वर्षांपूर्वी एकनाथ शिंदे यांनी बंड करून ठाकरे सरकार पाडले होते. तो हिशोब चुकता करण्याचा उद्धव ठाकरे यांचा प्रयत्न राहील. पण महायुतीचा चाणक्य ते घडू देईल? शरद पवारांना लढवायला उबाठा आणि काँग्रेस दोघेही तयार नव्हते. मात्र 'शरद पवार यांच्यापेक्षा दुसरा उमेदवार देणार असाल तर आम्ही पाडू' असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरुवातीलाच सांगितले होते. त्यामुळे दोघांची गोची झाली. एका अर्थी फडणवीसांनी दिलेला उमेदवार (शरद पवार ) निमूट स्वीकारावा लागला. आता विधानपरिषदेची निवडणूक बिनविरोध होणार की दहावा उमेदवार देऊन एकनाथ शिंदे रंगत आणणार? याकडे सर्वांचे लक्ष आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात येणारी तीन-चार वर्षे अनेकांसाठी जीवनमरणाची राहणार आहेत. उद्धव ठाकरे राज्याच्या राजकारणातून संपल्यात जमा होतील. त्यांचे खासदार-आमदार फुटून भाजपा किंवा शिंदे यांच्या आश्रयाला जातील. एकनाथ शिंदे 'बेडूक' होऊ पाहत आहेत. पण २०२९ च्या निवडणुकीत त्यांना त्यांची जागा कळेल. शिंदे सेना भाजपामध्ये विलीन झाली तर आश्चर्य वाटायला नको. या निवडणुकीअखेर राज्यात दोनच पक्ष राहतील. एक भाजपा आणि काँग्रेस. शरद पवार आणि सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रवादी चटणीला उरतील. उद्धव ठाकरे यांना भवितव्य होते. मात्र अहंकाराने त्यांना गिळले. शरद पवारांच्या नादी लागून त्यांनी स्वतःचे तर नुकसान करून घेतलेच; पण वडिलांनी स्थापलेला पक्षही इतरांनी नेला. राज्यसभेची एक जागा मिळविण्यासाठी ठाकरे किती अगतिक झाले होते, ते पूर्ण महाराष्ट्राने पाहिले. स्वतःचे २० आमदार असताना अवघे १० आमदार असलेल्या शरद पवारांच्या उमेदवारीवर त्यांना शिक्कामोर्तब करावे लागले. ही सारी चाणक्याची जादू.

देवाभाऊच्या नेतृत्वगुणांवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झालं. देवाभाऊ हे प्रचंड रसायन आहे. हा नेता स्वाभिमानी तर आहेच; पण अपमान सहन करण्याचीही त्याच्यात ताकद आहे. फिनिक्स पक्ष्याप्रमाणे तो राखेतून भरारी घेतो. एकनाथ शिंदे यांच्या हाताखाली उपमुख्यमंत्री पद स्वीकारल्यानंतर अनेकांना वाटले की आता देवाभाऊ संपले. पण असे चढउतार आपल्याला विचलित करीत नाहीत, हे देवाभाऊंनी दाखवून दिले. त्यांनी उद्धव ठाकरेंचा पक्ष फोडला, शरद पवारांच्या पक्षाचे तुकडे केले. देवाभाऊ आपल्या अपमानाचा बदला कशा प्रकारे घेतात ते महाराष्ट्राने पाहिले. शरद पवारांसारख्या तेल लावलेल्या पैलवानालाही चितपट केले. अजितदादा नसल्यामुळे अर्थमंत्री पदाची जबाबदारी फडणवीस यांच्यावर आली. महाराष्ट्रासारख्या राज्याचे बजेट सादर करणे गंमत नाही. हरफनमौला देवाभाऊंनी ती लीलया सांभाळली. समतोल बजेट देताना विरोधकांच्या टीकेला चोख उत्तरही दिले. एका एकाला पट्टीत घेतले आणि हिशोबच केला. ठाकरे सेनेचे आमदार सुनील प्रभू यांनी राज्यावरील वाढत्या कर्जाचा मुद्दा मांडला होता. त्यांच्या आरोपांच्या फडणवीसांनी चिंधड्या उडवल्या. त्यांच्यावरील कर्जापेक्षा महाराष्ट्रावरील कर्ज कमी आहे, असे फडणवीस म्हणाले. महाराष्ट्र राज्यावर फक्त १८ टक्के कर्ज आहे आणि ते मर्यादित आहे. इतर राज्ये कशी कर्जबाजारी आहेत याची आकडेवारीच फडणवीसांनी सादर केली. राज्याच्या तब्येतीची ज्याला जाणीव आहे असा डॉक्टर महाराष्ट्राला मिळाला आहे. त्यामुळे महाराष्ट्राने चिंता करायचे काम नाही. महाराष्ट्र योग्य माणसाच्या हातात आहे.

९८५०३०४१२३
(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वेध

प्रफुल्ल क. व्यास

# वैद्यकीय समाजसेवेचा नवा अध्याय; सेवांकुर

शिक्षण आणि वैद्यकीय सेवा या दोन गोष्टींचा समाज पर्यायाने देश उभारणीत मोठा हातभार आहे. परंतु, आज तो 'होता' असे म्हणावे लागते. कारण, ही दोन्ही क्षेत्र सध्या नाराजीच्या सुरात अडकत चालली आहेत. दोन्ही क्षेत्रात अपवाद आहेतच! डॉक्टरांना 'देव' संबोधले जाते. परंतु, डॉक्टरांचे रुग्णांसोबत असलेले व्यवहार, रुग्ण भरती करण्यापूर्वी आगाऊ रकमेची मागणी करणे, अनावश्यक रक्त चाचण्या आदी बाबींविषयी समाज व्यवस्थेत प्रचंड नाराजी आहे. अगदी चार दिवसांपूर्वी वर्धा जिल्ह्यातील तळेगाव (श्या.) येथील शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्याने रुग्णवाहिकेत मरणासन्न असलेल्या रुग्णाला रस्त्यावर सोडून रुग्णवाहिका परत बोलवण्याचा उद्दामपणा केला. परिणामी, त्याच रात्री तो रुग्ण दगावला. अशा या सोकावत जाणाऱ्या भावनांच्या भाऊगर्दीत वैद्यकीय शिक्षणातून समाजसेवेने मंतरलेली चळवळ भारतातील सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनात सेवा देते झाली. डॉक्टर हा केवळ व्यावसायिक नसतो तर समाजाचा विश्वास आणि जीवनाशी जोडलेली जबाबदारी त्याच्यावर असते. अशाच विचारातून आणि राष्ट्रीय प्रेरणेतून सेवांकुर ही चळवळ उदयास आली. १९८९ च्या सुमारास छत्रपती संभाजीनगर येथे सात डॉक्टरांनी एकत्र येत डॉ. हेडगेवार हॉस्पिटलची स्थापना केली. वैद्यकीय सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे आणि सेवेला केंद्रस्थानी ठेवत आरोग्यसेवा उभी केली. १९८९ ते १९९७ या काळात रुग्णालयाची प्रगती वेगाने होत गेली. हॉस्पिटलचा विस्तार झाला. ७०० खाटांच्या मोठ्या रुग्णालयात रूपांतरित झाले. विद्यार्थ्यांना उत्कृष्ट डॉक्टर बनवले जाते. ते संवेदनशील नागरिक बनावेत, समाजातील दुःख समजून घ्यावे आणि सेवा करण्याची प्रेरणा मिळावी, यासाठी काहीतरी वेगळे करणे आवश्यक असल्याची जाणीव निर्माण झाली. यातूनच डॉक्टरांमध्ये आणि वैद्यकीय विद्यार्थ्यांमध्ये समाजभान रुजवण्यासाठी एक नवीन चळवळ सुरू करण्याचा विचार पुढे आला. सुरुवातीला काही डॉक्टर आणि वैद्यकीय विद्यार्थी आठवड्यातून एकदा अनौपचारिकपणे भेटू लागले. चर्चा होत, अनुभवांचे आदानप्रदान होऊ लागले. हळूहळू या उपक्रमाला आकार येऊ लागला. त्या चर्चांतून प्रत्यक्ष काम करण्याची प्रेरणा मिळू लागली. गावाकडे जाऊन आरोग्य शिबिरे घेणे, समाजातील दुर्बल घटकांशी संवाद साधणे, ग्रामीण आणि आदिवासी भागातील लोकांच्या अडचणी समजून घेणे अशी कामे सुरू झाली. याच विचारातून 'सेवांकुर'चा जन्म झाला. सेवांकुर या नावातच त्याचा अर्थ दडलेला आहे. सेवा ही एक वृत्ती आहे आणि ती अंकुरासारखी रुजवावी लागते. योग्य संस्कार मिळाले तर हा अंकुर पुढे मोठ्या वृक्षात रूपांतरित होतो, हे या चळवळीने सिद्ध करून दाखवले. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकातील ज्ञानावर समाधान मानू नये, तर प्रत्यक्ष समाजात जाऊन लोकांचे जीवन समजून घ्यावे, त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात आणि त्या सोडविण्यासाठी आपले ज्ञान वापरावे, हा सेवांकुरचा मूलभूत विचार आहे. द्वितीय सरसंघचालक गुरुजींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त याच चळवळीतून नाशिक येथे ३०० खाटांचे रुग्णालय उभे झाले. सन २०१५-१६ च्या काळात सेवांकुरला एक संघटित स्वरूप प्राप्त झाले. विविध राज्यांमधील वैद्यकीय महाविद्यालये आणि विद्यार्थी या उपक्रमाशी जोडले जाऊ लागले. पश्चिम महाराष्ट्र, कोकण, देवगिरी विभाग, छत्तीसगड, मध्यप्रदेश, झारखंड, तेलंगणा, गोवा या राज्यातील जवळपास २६० वैद्यकीय महाविद्यालयांतील सुमारे १३०० विद्यार्थी या चळवळीशी जोडले गेले आहेत. सेवांकुरचा सर्वात महत्त्वाचा आणि प्रभावी उपक्रम म्हणजे 'वन वीक फॉर नेशन.' या उपक्रमाच्या माध्यमातून वैद्यकीय विद्यार्थ्यांना आदिवासी आणि दुर्गम भागातील समाजजीवन जवळून अनुभवण्याची संधी दिली जाते. या कार्यक्रमांतर्गत दरवर्षी विद्यार्थी एक आठवडा आदिवासी भागात राहतात. ते त्या समाजातील कुटुंबांचे सदस्य होतात. त्यांच्या जीवनशैलीचा अनुभव घेतात आणि त्यांच्या आरोग्याशी संबंधित समस्या समजून घेतात. वैद्यकीय तपासणी शिबिरे, आरोग्य जनजागृती, पथनाट्य, स्वच्छता अभियान, बालक व महिलांसाठी आरोग्य मार्गदर्शन या माध्यमातून आदिवासी समाजाला बाहेरील जगाची ओळख करून दिली जाते. पुढील वर्षी या उपक्रमाला एक तप पूर्ण होणार आहे. 'वन वीक फॉर नेशन' या उपक्रमात आतापर्यंत तीन हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. त्यांनी छत्तीसगड, झारखंड, मध्यप्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, उत्तरप्रदेश येथे सेवा दिली. रुग्णालयात बसून रोगांचा अभ्यास करणे एक गोष्ट, पण समाजात जाऊन लोकांच्या जीवनातील अडचणी समजून घेणे ही वेगळीच गोष्ट आहे. संभाजीनगरातील 'सप्तर्षी' डॉक्टरांनी सुरू केलेला प्रवास आज हजारो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला आहे. सेवांकुरच्या माध्यमातून वैद्यकीय विद्यार्थ्यांमध्ये सेवाभावाचा अंकुर रुजत आहे. तोच भाव समाजातील अन्य घटकांमध्ये रुजावा... डॉक्टरांतील (अपवादात काही डॉक्टर देव आहेत) देव परत यावा...

९८८१९०३७६५

## पाहिजे मनाला शांती!



अशांत मनाला शांत करण्याचे उपाय, समर्थ रामदास स्वामींच्या मनाच्या श्लोकांमध्ये आहेत, दासबोधाचे अभ्यासक, लेखक व व्याख्याते सुनील चिंचोलकर यांनी अभ्यासकांसाठी मोठमोठे ग्रंथ व साहित्य लिहिले आहेत. परमेश्वराने मानवाला विवेकबुद्धी दिली आहे. आपल्या सुखाचे कारण अथवा दुःखाचे कारण आपल्यालाच माहीत असते. पण क्षणिक मोहासाठी मनुष्य जे दुःखाचे आहे तेच निवडतो. समर्थ म्हणतात, 'ज्या कारणे दुःख जाले! तेचि पुन्हा मनी धरिले !! तेणे गुणे प्राप्त झाले! पुन्हा दुःख !!' माणसाला सुख हवे असते, पण सुख देणाऱ्या गोष्टी नको असतात. माणसाला दुःख नको असते, पण दुःख देणाऱ्या गोष्टी हव्या असतात. आरोग्य हवे असते, पण व्यायाम करावासा वाटत नाही. आजार नको असतो, पण व्यसने करावीशी वाटतात. मनःशांती हवी असते, पण जप, ध्यान यांचा कंटाळा येतो. आवड आणि काय घ्यावं, हे न समजणे म्हणजे दुःखाला कारण होण्यासारखे आहे. माणसाला काय आवडते यापेक्षा काय आवडावे, याला जास्त महत्त्व आहे. जे हिताचे आणि सुखाचे आहे तेच आपल्याला आवडले पाहिजे. सुख देणाऱ्या गोष्टींबद्दल मनात आत्मीयता पाहिजे. मनालाच चांगल्या गोष्टीत रमायची सवय झाली की, कल्पनाही चांगल्याच सुचतात. जे सुख प्रत्यक्ष मिळाले नाही ते आपण कल्पनेने मिळविण्याचा प्रयत्न करतो. म्हणून आपले विचार आपल्याला भगवंतापासून दूर तर नेत नाहीत ना, याची सतत जाणीव असावी.

**मधुकर व्यवहारे**/पुणे/ ९४२३१ ३१०४८

●● ●●

## ग्रामीण प्रश्नांना वाचा फोडावी

पुणे जिल्हा केवळ शहरापुरता मर्यादित नाही. ग्रामीण भागात शेती, पाणी, रोजगार आणि आरोग्याचे प्रश्न आहेत. आपल्या पुणे आवृत्तीने ग्रामीण भागातील समस्या आणि यशोगाथा यांना समान स्थान द्यावे. शेतकऱ्यांच्या अडचणी, कृषी तंत्रज्ञान आणि बाजारपेठेतील बदल यावर सखोल लेख असावेत. ग्रामीण-शहरी दुवा मजबूत करण्याचे काम माध्यमांनी करावे, ही अपेक्षा.

**अपेक्षा साने**/पुणे

## वाचक पत्रे

●● ●●

## सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतागृहांची व्यवस्था व्हावी

सर्व नगरपालिका आणि महानगरपालिका यांनी विशिष्ट अंतरावर स्वच्छतागृहांची व्यवस्था करावी. सोबतच जी स्वच्छतागृहे मोडकळीस आली आहेत त्यांची दुरुस्ती करून वापरण्याजोगे करावेत. यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिलांची गैरसोय होणार नाही. स्वच्छतागृहांची व्यवस्था करून त्याची स्वच्छता राखली जावी, ही अपेक्षा.

**देवीदास पाठक**/पुणे

## कीर्तिस्तंभाचे पावित्र्य राखा

रंगभवनजवळील आचार्य शांतिसागर महाराज चौकातील कीर्तिस्तंभ परिसर हा काही पिकनिक पॉईंट नव्हे. या ठिकाणी वाढदिवस साजरे होतात, संध्याकाळच्या वेळेला बाहेरून खाद्यपदार्थ आणून परिसर अस्वच्छ करतात. लाखो रुपये खर्च करून हा कीर्तिस्तंभ महानगर पालिकेने उभा केला आहे. परिसर स्वच्छता ही काही एकट्या महापालिकेची जबाबदारी नाही. नागरिकांनीही पुढाकार घ्यायला हवा. या कीर्तिस्तंभाजवळ बसून ध्यान करता येईल. शांतपणे बसून सकारात्मक दृष्टिकोन विकसित करता येईल. सोलापूरकरांना विनंती की, त्यांनी कीर्तिस्तंभाचे पावित्र्य राखण्यास महानगर पालिकेला सहकार्य करावे.

**अरुण बा. धुमाळ**/सोलापूर/९८९०९०२९२३

●● ●●

## आपण संवेदना गमावली काय?

८ मार्चला नागपूरला दोन वेगवेगळ्या घटल्या. नागपूरचा सुपुत्र फ्लाईट लेफ्टनंट पूर्वेश दुरुगकर हा २८ वर्षाचा पायलट हुतात्मा झाला. सुखोई या अतिशय वेगवान लढाऊ विमानाचे तो प्रशिक्षण घेत होता. पूर्वेशने ऑपरेशन सिंदूरमध्ये भाग घेतला होता. आपण सुरक्षित राहावे म्हणून तो लढत होता. काल त्याचे पार्थिव घरी आणल्यावर त्याच्या घरी जो टाहो फुटला त्याचा आवाज आपल्यापर्यंत पोहोचला नव्हता तरी जाणवत होता. अशा या हुतात्म्याच्या आईवडिलांना भेटायला धीर द्यायला नितीन गडकरी सोडून अन्य राजकारणी लोकांना वेळ नव्हता. दुसरी घटना भारताच्या विजयाची. तो विजय साजरा करताना मशगूल प्रेक्षकांनी भरपूर फटाके उडवून आनंद साजरा केला. आनंद व्यक्त करताना लोकांनी याचा विचार करायला हवा होता की, एका सुपुत्राने भारतमातेच्या चरणी आपला जीव दिला; याउलट क्रिकेटर फक्त पैशाकरिता खेळले. त्याच वेळी पूर्वेशचे आईवडील आपल्या लेकाचे शव घरी घेऊन गेले. विजय साजरा करावा, पण भान ठेवून! तसेच एका निरपराध स्त्रीचा अपघात झाला; तिला दवाखान्यात नेण्याऐवजी प्रेक्षक व्हिडीओ काढण्यात गर्क होते. अशा घटनांनी मन विषण्ण होते. यावरून लोकांची संवेदना संपली की काय असे वाटते.

**राजेंद्र वाडी**/नागपूर/९४२३६३२२३

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# सोलापूर तापले; मार्चच्या सुरुवातीलाच पारा '४०' पार


## उष्णतेची लाट येण्याची शक्यता : नागरिकांनी घ्यावी विशेष काळजी

**तभा वृत्तसेवा । राजाराम मस्के**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

जिल्ह्यात यंदा उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच तापमानाने ४० अंश सेल्सिअसचा टप्पा पार केला आहे. हवामानातील बदल, कोरडे वातावरण आणि वाढती उष्णता यामुळे येत्या काही दिवसांत उष्णतेची लाट अधिक तीव्र होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घेण्याचे आवाहन तज्ज्ञांकडून करण्यात येत आहे.

८ मार्च रोजी चाळीशी पार केलेल्या तापमानामध्ये ढगाळी वातावरणामुळे दोन दिवस थोडी तफावत आली. मात्र पुन्हा आज (दि.१२) सोलापूर जिल्ह्यात तापमानाचा पारा ३९.१ अंश सेल्सिअस वर पोहोचला आहे. यामुळे नागरिक उन्हाच्या झळांनी अक्षरशः होरपळून निघाले आहेत. दरवर्षी उन्हाळ्यात देशातील काही भागांमध्ये उष्णतेची लाट जाणवते. मात्र कोरड्या हवामानासाठी ओळख असलेल्या सोलापूर जिल्ह्यात तापमान झपाट्याने वाढते. यंदा मार्चच्या सुरुवातीलाच तापमान ४० अंशांच्या पुढे गेल्याने नागरिकांना उन्हाचा तीव्र त्रास सहन करावा लागत आहे. दुपारच्या वेळेत शहरातील अनेक रस्ते तुलनेने ओस पडलेले दिसत असून नागरिक शक्यतो घराबाहेर पडणे टाळत आहेत.

जिल्ह्यात सध्या दहावी व बारावीच्या परीक्षा सुरू असल्याने विद्यार्थ्यांनाही या उष्णतेचा त्रास होत आहे. तसेच शेतकरी, बांधकाम मजूर, छोटे व्यावसायिक, मार्केटिंग क्षेत्रात काम करणारे कर्मचारी आणि रस्त्यावर काम करणाऱ्या कामगारांना कडक उन्हाचा सर्वाधिक फटका बसत आहे.



सोलापूर शहरातील रस्त्यावर काम करणारे कामगार, वाहतूक पोलीस आणि बांधकाम मजूर यांच्यासाठी सावलीची व्यवस्था आणि पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचेही मत व्यक्त होत आहे. सामाजिक संस्था आणि स्थानिक प्रशासनाने यासाठी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे. तापमानातील वाढ लक्षात घेता नागरिकांनी योग्य ती खबरदारी घेतल्यास उष्णतेच्या दुष्परिणामांपासून बचाव करणे शक्य आहे. पुढील काही दिवसांत उन्हाचा कडाका आणखी वाढण्याची शक्यता असल्याने सर्वांनी सतर्क राहून नागरिकांनी स्वतःची आरोग्याची आणि पाळीव प्राण्यांची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.

### दुपारीच्या वेळेत बाहेर जाणे टाळा

आरोग्य विभाग व तज्ज्ञांच्या मते, सतत वाढणाऱ्या तापमानामुळे उष्माघाताचा धोका वाढतो. त्यामुळे दुपारी १२ ते दुपारी ४ या वेळेत शक्यतो बाहेर जाणे टाळावे. अत्यावश्यक काम असल्यास बाहेर जाताना अंगावर सैल आणि हलके व सुती कपडे वापरा, डोक्याला रुमाल, स्कार्फ किंवा टोपी वापरा आणि डोळ्यांच्या रक्षणासाठी सनग्लासेसचा वापर करा.दिवसभरात किमान तीन ते चार लिटर पाणी पिणे गरजेचे असून शरीरातील पाण्याची कमतरता टाळण्यासाठी नियमित अंतराने पाणी घेत राहणे आवश्यक आहे. यासोबतच ताक, लिंबूपाणी, नारळपाणी यांसारखी नैसर्गिक थंड पेये घेतल्यास शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यास मदत होते. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी.

महत्वाचे...



### पोलिस मुख्यालयात महिला दिनानिमित्त आरोग्य शिबिर संपन्न

**सोलापूर, दि. १२ मार्च-**

जागतिक महिला दिनानिमित्त पोलीस रुग्णालय सोलापूर शहर पोलीस मुख्यालय या ठिकाणी आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. आरोग्य शिबिरा करिता इंडियन कॅन्सर सोसायटी सोलापूर, अधिष्ठाता वैश्यपायन मेडिकल कॉलेज सोलापूर, वैद्यकीय अधीक्षक सिविल हॉस्पिटल सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने तज्ञ डॉक्टरांची टीम उपस्थित होती. या आरोग्य शिबिरा करिता पोलीस आयुक्त एम राजकुमार, पोलीस उपायुक्त, गुन्हे डॉ.अश्विनी पाटील, सहायक पोलीस आयुक्त विजयालक्ष्मी कुरी यांचे मार्गदर्शन तसेच पोलीस रुग्णालय येथील डॉ. गायकवाड व सर्व वैद्यकीय स्टाफ आणि महिला शाखा येथील पोलीस अधिकारी कर्मचारी, इतर शाखेचे पोलीस महिला पोलीस निरीक्षक व अधिकारी यांचे सहकार्याने यशस्वीपणे पार पडला.



### राउंड टेबल इंडियाकडून बांधलेल्या ८ वर्गखोल्यांचे उद्घाटन

**सोलापूर, दि. १२ मार्च-**

राउंड टेबल इंडिया अंतर्गत सोलापूर हायफ्लायर्स राउंड टेबल ३०९ व सोलापूर टॉवेल सिटी राउंड टेबल १५० यांच्या संयुक्त विद्यमाने हायटेक इंग्लिश मीडियम स्कूल, येणेगूर (ता. उमरगा, जि. धाराशिव) येथे उभारण्यात आलेल्या ८ वर्गखोल्यांच्या एफटीई ब्लॉकचे उद्घाटन उत्साहात पार पडले. ८ वर्गखोल्यांच्या या इमारतीचा एकूण खर्च सुमारे ८० लाख रुपये असून, या प्रकल्पाचा लाभ सुमारे १०,००० विद्यार्थ्यांना होणार आहे. यावेळी एन. आर. पाटील फायनान्सचे चेअरमन एन. आर. पाटील, डेव्हलपर्स अँड बिल्डर्सचे व्यवस्थापकीय संचालक केशव रेड्डी, वामसी लॅब्स प्रा. लि. आणि पी. पी. पटेल फाउंडेशन जयेशभाई पटेल, राउंड टेबल इंडिया नॅशनल ट्रेझरर ट्र. वीपुल भुतडा, आरटीआय एरिया १५ उपाध्यक्ष रिशभ पाटोदिया, नॅशनल प्रोजेक्ट कन्व्हेनर तरंग शाह, चेअरमन - SHRT ३०९ आशिष तापाडिया, चेअरमन - STCRT १५० भाव्या शाह व मेंटॉर वासुदेव बंग, अभय सुराणा, रमेश राठी, राजन राठी, अभिजीत मलानी, श्रीराज राठी, रोहित राठी, वैभव वोरा, अनिल देवसानी, अनिमेष राठी आदी मान्यवर उपस्थित होते.

### जिल्हा कारागृहात बंदी बांधवासाठी 'तणावमुक्त जीवन' कार्यशाळा

**सोलापूर, दि. १२ मार्च-**

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे सुहास बारके यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विशेष कारागृह महानिरीक्षक (मुख्यालय) योगेश देसाई व कारागृह उपमहानिरीक्षक (पश्चिम विभाग) सुनिल डमाळ यांच्या प्रेरणेने सोलापूर जिल्हा कारागृहात बंदी बांधवांसाठी स्ट्रेस फ्री : तणावमुक्त जीवन या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. दरम्यान, यावेळी सकारात्मक विचारांचे महत्त्व व्हिडिओद्वारे दाखविण्यात आले. ही कार्यशाळा तंत्रज्ञान फाऊंडेशन-हॅप्पी थॉटस्, सोलापूर या सामाजिक सेवाभावी संस्थेमार्फत घेण्यात आली. कार्यशाळेदरम्यान संस्थेचे अध्यक्ष सरश्री यांचा संदेश व सकारात्मक विचारांचे महत्त्व व्हिडिओद्वारे दाखविण्यात आले. अरविंद भांडे यांनी बंदी बांधवांना नकारात्मक विचारांपासून दूर राहण्याचे महत्त्व सांगून सकारात्मक विचारांच्या माध्यमातून जीवन समृद्ध करण्याचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास कारागृह अधीक्षक सुशिल कुंभार, वरिष्ठ तुरुंगाधिकारी बी. एस. खळबुटे, तुरुंगाधिकारी विठ्ठल शिंदे, निलेश गायकवाड तसेच तंत्रज्ञान फाऊंडेशनचे गणेश इरावती, परशुराम राफेली, इरप्पा लातुरे, रघुनाथ उडता व बंदी बांधव उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कारागृह शिक्षक आंगद गव्हाणे यांनी केले.

### ए.जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रोजेक्ट कॉम्पिटिशन व विज्ञान प्रदर्शन उत्साहात




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च -**

येथील ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये सायन्स क्लबच्या वतीने प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रोजेक्ट कॉम्पिटिशन आणि प्रकल्प प्रदर्शनात प्रथम वर्षातील १८० आणि वरिष्ठ वर्गातील ६० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या कल्पकतेचे दर्शन घडवले.

या स्पर्धेसाठी डॉ. सुशीलकुमार बंडगर आणि श्री. कोडम यांनी परीक्षण केले. डॉ. बंडगर म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या विषयावर मनापासून काम केले पाहिजे आणि नेहमी पॅशनेट राहिले पाहिजे,'' श्री. कोडम यांनी ''आजच्या स्पर्धेच्या युगात केवळ पदवी पुरेशी नसून कौशल्य आत्मसात करणे हीच तुमची खरी सोबत असेल,'' असे प्रतिपादन केले.

प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार म्हणाले, ''स्वतःशी संवाद साधा, दररोजचे नियोजन करा आणि आपल्यातील उणिवा ओळखून त्यामध्ये सातत्याने सुधारणा करा,'' असा मोलाचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील,सचिव शिवानंद एस. पाटील आणि कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले यांनी प्रदर्शनाची पाहणी करून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे कौतुक केले व विजेत्यांना बक्षीस, मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. भागानगरे आर. एम., प्रा. वळसंग, प्रा. कटके, प्रा. उपाध्ये, प्रा. डॉ. पाटील पी. एस. आणि प्रा. कोनापुरे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी गोणसगी आणि ऋतुजा दंतकाळे यांनी केले. पाहुण्यांची ओळख जान्हवी कदम आणि धन्वंतरी स्वामी यांनी करून दिली. सायन्स डे आणि संशोधनातील स्त्रियांचा सहभाग या विषयावर श्वेता चौगुले हिने आपले विचार मांडले. झीनत इनामदार हिने आभार मानले.



### सिंहगड स्कूलमध्ये सिनियर केजी विद्यार्थ्यांचा 'ग्रॅज्युएशन डे' उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

येथील सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये सिनियर केजीच्या विद्यार्थ्यांचा ग्रॅज्युएशन डे उत्साहात साजरा करण्यात आला. लहानग्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा असलेल्या या कार्यक्रमाला पालक व शिक्षकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

यावेळी सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव, सिंहगड इन्स्टिट्यूट, केगावचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, पर्यवेक्षिका सारिका चव्हाण आदी उपस्थित होते.

**पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर**

जा.क्र./पंनप/नअ/१२५७/२०२६
पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर
दिनांक- १२/०३/२०२६

बांधकाम विभाग
ई- निविदा सुचना क्र. ३९/२०२५ - २६
Portal : http://mahatenders.gov.in

पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर, सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गात नोंदणीकृत असलेल्या व अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणारे ठेकेदाराकडून वैशिष्ट्यपूर्ण योजना अंतर्गत कामासाठी ई-निविदा मागवित आहेत. ई-निविदा व संच Main Portal : http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१३/ ०३ /२०२६ ते २५/०३/२०२६ पर्यंत उपलब्ध आहेत. (एकूण १ काम)

सही/- नगर अभियंता, नगरपरिषद पंढरपूर
सही/- मुख्याधिकारी, नगरपरिषद पंढरपूर

**CHANG IN NAME**

I HEREBY DECLARE THAT MY OLD NAME **MORE SHITAL DNYANADEO** HAS BEEN CHANGED TO **MORE SHITAL DNYANDEO** MORE AT POST UPALE DUMALA TAL.BARSHI, DIST. SOLAPUR, MAHARASHTRA 413 401 AFFIDAVIT SR. NO. 1264 DATED 12/03/2026

### कलबुर्गी-बेंगळुरू वंदे भारत एक्सप्रेसने ५ लाखांहून अधिक प्रवाशांनी केला प्रवास

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

कलबुर्गी-एसएमव्हीटी बेंगळुरू वंदे भारत एक्सप्रेसने २ वर्षे पूर्ण केली, १०३.५२% प्रवाशांसह ५.७२ लाखांहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला.

कलबुरगि-सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या टर्मिनल (एसएमव्हीटी) बेंगळुरू वंदे भारत एक्सप्रेसने १२ मार्च २०२६ रोजी या भागातील प्रवाशांना समर्पित सेवा देऊन दोन वर्षे यशस्वीरित्या पूर्ण केली आहेत. या सेवेमुळे कलबुरगि, यादगीर आणि रायचूर सारख्या महत्त्वाच्या शहरांसाठी प्रादेशिक कनेक्टिव्हिटी सुधारली आहे, तसेच मंत्रालयम आणि पुट्टपर्ती (श्री सत्य साई प्रशांती निलयम मार्गे) सारख्या ठिकाणी सहज प्रवेश देऊन तीर्थयात्रा आणि पर्यटनाला चालना मिळाली आहे.

कलबुरगि-एसएमव्हीटी बेंगळुरू वंदे भारत एक्सप्रेस ५६१ किमी अंतर फक्त ८ तासात पार करते, तर सध्याच्या सुपरफास्ट सेवा १० ते १२ तासांत पूर्ण करतात, ज्यामुळे प्रवासाचा अंदाजे २ ते ४ तासांचा वेळ वाचतो. सध्या, ही ट्रेन आठवड्यातून सहा दिवस धावते आणि यादगीर, रायचूर, मंत्रालयम रोड, गुंटकलम, अनंतपूर, साई पी निलयम आणि येलहंका येथे थांबते.

८ डब्यांच्या वंदे भारत ट्रेन सेटसह एकूण ४५२ आसन क्षमता असलेली ही ट्रेन ४०० चेअर कार (सीसी) सीट्स आणि ५२ एक्झिक्युटिव्ह चेअर कार (ईसी) सीट्स असलेली आहे. ट्रेनची प्रचंड लोकप्रियता तिच्या उल्लेखनीय कामगिरीतून दिसून येते, फेब्रुवारी २०२६ पर्यंत एकूण ५,७२,५६६ प्रवाशांनी प्रवास केला आणि २०२६ मध्ये १०३.५२% प्रवासी प्रवास करत आहेत.

**मध्य रेल्वे**
सोलापूर विभाग
बहुउद्देशीय स्टॉल्ससाठी ई-लिलाव

निविदा सूचना क्रमांक SUR-CATG-MARCH तारीख: ११.०३.२०२६. सोलापूर विभागातील कलबुर्गी आणि बार्शी टाउन स्टेशनवरील MPS स्टॉलसाठी ई-लिलाव (सामान्य लिलाव-सिंग्नल स्टेज) बाबत ०९.०३.२०२६ च्या निविदा सूचना. लिलाव कॅटलॉग लॉट क्रमांक: (१) MPS-SUR-KLBG-MPS-4-25-1. (२) MPS-SUR-BTW-MPS-6-24-1. लिलाव सुरू, बंद, तारीख आणि वेळ: प्रारंभ-दुपारी १२.०० वाजता २५.०३.२०२६, बंद-दुपारी १२.४० वाजता २५.०३.२०२६. स्थानकांचे नाव: कलबुर्गी आणि बार्शी टाउन स्टेशनवरील एमपीएस स्टॉलचा ई-लिलाव. पद्धत: आयरेप्स-ई-लिलाव (लीज मॉड्यूल) द्वारे ई-लिलाव. निविदेचा कालावधी: वार्षिक परवाना शुल्क आणि चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी १०% वाढीसह ५ वर्षे. वेबसाइट पत्ता:- सर्व ई-लिलाव तपशील, संबंधित माहिती आणि कागदपत्रे मध्य रेल्वे/भारतीय रेल्वे पोर्टल :http://www.ireps.gov.in वर उपलब्ध आहेत. सहभागींनी अर्ज करण्यापूर्वी वेबसाइटला भेट द्यावी अशी विनंती आहे.

EXP-12

तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
**SRM E-Tender Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No 7000039259 E-Tender No. EE/400kV/R.S/DN/LBT/E-Tender:06/2025-26, Particulars:** Work of AMC for attending emergency breakdown & maintenance work of 400kV Lamboti Substation. **Estimated cost:** Rs. 15,00,000/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost): Rs** 15,000/- **Tender cost in Rs.** 500.00+ GST, **Sale period:** 11.03.2026 to 28.03.2026, **Last Date of Submission:** 28.03.2026 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 29.03.2026 at 12:00 Hrs (If possible). **Contact person:** Executive Engineer -8554995014. For further details

**Subsequent call intimations (2nd/3rd calls, if any) will not be re-published in newspapers and will only be available on the e-tender portal: please visit.**

**1) https://srmetender.mahatransco.in. 2) https://mahatransco.in**

**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-enquiry (New) portal of MSETCL.

**Executive Engineer, 400 kV R.S. Div Lamboti**

## कामगारांच्या प्रश्नांवर चर्चा करून योग्य तो निर्णय घेणार : महापौर कोंड्याल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

महानगरपालिका कामगार संघटना कृती समिती व सोलापूर महानगरपालिका आरोग्य निरीक्षक संघटना यांच्या मागण्यांबाबत लवकरच महानगरपालिका आयुक्तांसोबत बैठक आयोजित करून कामगारांच्या प्रश्नांवर चर्चा करून योग्य तो निर्णय घेण्याचा प्रयत्न करणार असल्याची ग्वाही महापौर विनायक कोंड्याल यांनी दिली.

कामगार संघटना कृती समिती व आरोग्य निरीक्षक संघटना यांच्या वतीने आज नूतन महापौर विनायक दादा कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे , स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, गटनेते वाहिदाबनो शेख, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, नगरसेविका श्रीदेवी फुलारे, नगरसेवक गौतम कसबे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कामगार संघटना कृती समिती अध्यक्ष अशोक जानराव, आरोग्य निरीक्षक संघटनेचे अध्यक्ष शशिकांत शिरसट, अजय क्षीरसागर, लिंबराज जेटीथोर, बाळी



मेंडपु, बाबासाहेब क्षीरसागर, प्रदीप जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

**जमादार व आरोग्य निरीक्षकांच्या कामाच्या वेळेत दोन तास कपात करा**

यावेळी कर्मचाऱ्यांच्या मागण्या मांडण्यात आल्या. त्या याप्रमाणे : डॉ. आंबेडकर जयंतीपूर्वी थकीत महागाई भत्ता व पेन्शनसह सर्व कर्मचाऱ्यांना लागू करून राज्य कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता देऊन तफावत दूर करा, लाड कमिटीतील १९७५ पासून प्रलंबित पात्र वारसदारांचे सुमारे ६५० अर्ज, तसेच रोजंदारी बदल कामगार २४९ आणि जलशुद्धीकरण केंद्रातील, घंटागाडी व इतर विभागातील कंत्राटी तसेच मानधनावरील कामगारांना सेवेत कायम करा, आर.सी.एच. केडर लिंकवर्कर, नर्सेस, ए.एन.एम., पी.एच.एन. तसेच बालवाडी शिक्षिका सेविकांना सेवेत कायम करा, परिवहन उपक्रमातील अनुकंपा प्रकरणे निकाली काढा, विविध टप्प्यात रोजंदारी कामगार कायम होऊन सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना पेन्शन द्या, आरोग्य निरीक्षक व फिरते काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा वाहन भत्ता वाढवा, उन्हाचा पारा वाढल्याने स्वच्छता कामगार, जमादार व आरोग्य निरीक्षक यांच्या कामाच्या वेळेत दोन तासांची कपात करा, पिण्याच्या पाण्याची सोय करा.

**IDFC FIRST Bank Limited**
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेले आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 143932912 | मालमत्तेवर कर्ज | 1. बजरंग जगन्नाथ डोंगरे 2. उज्वला बजरंग डोंगरे | 07/02/2026 | INR 7,82,230.97/- |

**मालमत्तेचा पत्ता :** सोलापूर उपविभाग मोहोळ येथील मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल, ग्रामपंचायतीच्या हद्दीत, अधेगाव बेअरिंग ऑफ ग्रामपंचायत मिलकट क्रमांक ५५०, सोलापूर, महाराष्ट्र - ४१३२४८. एकूण जाहिरात-मापन क्षेत्र २१६० चौरस फूट आहे. आणि त्याची सीमा: उत्तर: भिकाजी अंबादास डोंगरे, दक्षिण: कॉमन रोड, पूर्व: कॉमन रोड, पश्चिम: कॉमन रोड.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 112617527 | मालमत्तेवर कर्ज | 1. ज्ञानेश्वर उत्तम यमदे 2. शकुंतला उत्तम यमदे | 07/02/2026 | INR 5,98,074.81/- |

**मालमत्तेचा पत्ता :** बग्रामपंचायत मिलकट क्रमांक ९५ चा संपूर्ण तुकडा आणि पार्सल, एकूण ११४० चौ. फूट, कवठे गावात स्थित, ग्रामपंचायत कवठेच्या हद्दीत, तालुका: उत्तर सोलापूर, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३००२, आणि पूर्व: रस्ता, पश्चिम: वसंत देशपांडे, उत्तर: बबन बिरू कोळेकर, दक्षिण: रस्ता.

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

दिनांक : **13/03/2026**
स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि.कि.अ.नं. १२-१२०२६
पुढील नेमली ता. ६/४/२०२६

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठस्तर यांचे न्यायालयात**

(आर.पी.बागडे) नि. ५

१) विजया उर्फ राजश्री राजकुमार आंधळकर, वय ४९ वर्ष, धंदा-घरकाम, रा. बालाजी कॉलनी, सोलापूर रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) देवांग राजकुमार आंधळकर, वय २२ वर्षे, धंदा-शिक्षण, रा.सदर -- **अर्जदार**
३) विराज राजकुमार आंधळकर, वय १९ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. सदर
४) मीना विलास आंधळकर, वय ६९ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सदर

विरुध्द

**कोणी नाही** -- **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार नं.१ चे पती, अर्जदार नं. २,३ चे वडिल व अर्जदार नं.४ चा मुलगा राजकुमार विलास आंधळकर होता. सदर राजकुमार विलास आंधळकर हे दि. १६/१०/२०२५ रोजी बार्शी येथे मयत झाले आहेत. मयत राजकुमार विलास आंधळकर यांचे वडिल यापुर्वीच मयत आहेत. अर्जदार हेच मयत राजकुमार विलास आंधळकर यांचे कायदेशीर वारस असून अर्जदारा शिवाय मयतास कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदाराना त्यांचे शासकीय, निमशासकीय व कायदेशीर अडचणीचे निवारणाकरीता वारस हेअरशिप प्रमाणपत्राची गरज गरज भासलेली आहे सदर वारस / हेअरशिप अर्जदाराकडे नसलेने अर्जदारास अनेक कायदेशीर अडचणीस सामोरे जावे लागत आहे असे कथन करुन अर्जदारानी ते मयत राजकुमार विलास आंधळकर याचे कायदेशीर वारस असलेबाबत हेअरशिप/वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, वा अन्य कोणाचे कांही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमले मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे तारीखः १२/३/२०२६

**सही/- वरिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी**
शिक्का
**सही/- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### भारतीय मुष्टियोद्ध्यांची दमदार कामगिरी



**बँकॉक** : येथे आयोजित जागतिक मुष्टियुद्ध फ्युचर्स चषक स्पर्धेत भारतीय युवा मुष्टियुद्ध संघाने दमदार कामगिरी करत स्पर्धेचा पाचवा दिवस गाजविला. गुंजन, राधामणी लोंगजाम आणि चंद्रिका पुजारीने आपापल्या लढतींमध्ये विजय मिळवले. गुंजनने (४८ किलो) पोलंडवर ५-० असा एकमताने निर्णयात्मक विजय मिळवला. राधामणी लोंगजामने (५७ किलो) प्रभावी प्रदर्शन केले आणि पहिल्या फेरीत रेफरी स्टॉप्ड कॉन्टेस्ट (आरएससी) द्वारे इक्वाडोरच्या तिच्या प्रतिस्पर्ध्याला पराभूत केले. तथापि, प्राचीला (६० किलो) स्लोवाकियाच्या प्रतिस्पर्ध्याकडून ५-० असा पराभव पत्करावा लागला, तर प्रियांश सेहरावतला (७० किलो) ला पुरुष विभागात मोरोक्कोच्या मुष्टियोद्ध्याकडून ५-० असा पराभव पत्करावा लागला. चंद्रिका पुजारीने (५० किलो) अमेरिकेच्या मुष्टियोद्ध्यावर ५-० अशी मात करून भारताच्या गुणतालिकेत आणखी एक विजय मिळवला.

### इराणची फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतून माघार

**नवी दिल्ली** : मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाच्या पृष्ठभूमीवर इराणने आपला राष्ट्रीय फुटबॉल संघ २०२६ च्या फिफा विश्वचषकात सहभागी होणार नसल्याचे जाहीर केले आहे. इराणच्या निर्णयामुळे फिफासाठी परिस्थितीही गुंतागुंतीची झाली आहे. २०२६ चा फिफा विश्वचषक पुढील वर्षी अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिकोमध्ये होणार आहे. सध्याच्या परिस्थितीत त्यांच्या संघाला खेळण्यासाठी अमेरिकेत जाणे अशक्य आहे. आम्ही विश्वचषकात सहभागी होणार नाही, असे इराणचे क्रीडा मंत्री अहमद डोंजमाली यांनी सांगितले. इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनी यांच्या हत्येनंतर देशाच्या सरकारने ही कठोर भूमिका घेतली आहे. या भ्रष्ट सरकारने आमच्या नेत्याची हत्या केल्यामुळे, विश्वचषकात सहभागी होण्याचा आमचा कोणताही हेतू नाही, असे ते म्हणाले. गत काही महिन्यांत इराणवर मोठे हल्ले करण्यात आले आहेत असा आरोपही मंत्र्यांनी केला. गत ८-९ महिन्यांत देशावर दोन युद्धे लादण्यात आली आहेत व त्यामुळे हजारो नागरिकांचे प्राण गेले आहेत.

### विश्व पॅरा ॲथ्लेटिक्स ग्रांप्री पहिल्या दिवशी भारताचे वर्चस्व

**नवी दिल्ली** : जागतिक पॅरा ॲथ्लेटिक्स ग्रांप्री स्पर्धेच्या पहिल्या दिवशी भारतीय खेळाडूंनी प्रभावी कामगिरी केली व सुवर्णपदकांसह अनेक पदकांची लयलूट केली. पुरुषांच्या उंच उडी ४२ स्पर्धेत शैलेश कुमारने १.८४ मीटर अंतर पार करून सुवर्णपदक जिंकले. रामसिंगभाई गोव पढियारने १.६५ मीटर उडी मारून रौप्यपदक जिंकले, तर लोकेश मंत्राने १.६० मीटर उडी मारून कांस्यपदक जिंकले. पुरुषांच्या उंच उडी ४४ स्पर्धेतही प्रवीण कुमारने १.९६ मीटर उडी मारून सुवर्णपदक जिंकले, त्यानंतर उन्नी रेणूने १.८६ मीटर उडी मारून रौप्यपदक जिंकले. बंतीने १.८३ मीटर उडी मारून कांस्यपदक जिंकले. महिलांच्या १०० मीटर टी/टी स्पर्धेत भारताच्या प्रीती पालने १४.४६ सेकंदांसह सुवर्णपदक जिंकले. रशियाच्या मार्गारीटा माटेवाने १६.२५ सेकंदांसह दुसरे स्थान पटकावले, तर करिना माचुल्स्कायाने १७.३८ सेकंदांसह कांस्यपदक जिंकले.

### गतविजेत्या ड्रेपरची जोकोविचवर मात



**इंडियन वेल्स** : गतविजेत्या जॅक ड्रॅपरने सर्बियाचा स्टार नोवाक जोकोविचला ४-६, ६-४, ७-६ (७/५) असा पराभवाचा धक्का देत इंडियन वेल्स टेनिस स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. आता ब्रिटनच्या ड्रॅपरचा दोन वेळा अंतिम फेरी गाठणाऱ्या रशियाच्या डॅनिल मेदवेदेवविरुद्ध उपांत्यपूर्व फेरीत सामना होणार आहे. मेदवेदेवने अमेरिकेच्या ॲलेक्स मिशेलसेनचा ६-२, ६-४ असा पराभव केला. ड्रॅपरने हे काम कठोरपणे केले, ३८ वर्षीय जोकोविचला तिसऱ्या सेटमध्ये पराभूत केले आणि २०१६ मध्ये पाचवे इंडियन वेल्स जेतेपद जिंकल्यानंतर सर्बियन सुपरस्टारला पहिल्यांदाच उपांत्यपूर्व फेरीत परतण्यास रोखले. माझे सर्वोत्तम प्रयत्न आणि उत्तम वृत्ती याद्वारे मी हा सामना जिंकला, असे ड्रॅपर म्हणाला.

# भारतीय महिला हॉकी संघाचे लक्ष्य विजेतेपद

## एफआयएच हॉकी विश्वचषक पात्रता फेरी

◆ **हैदराबाद, १२ मार्च**

विश्वचषक पात्रता फेरीत भारताचे लक्ष्य विजेतेपदाचे असेल. भारत शुक्रवारी येथे इटलीविरुद्धच्या उपांत्य फेरीत विजय मिळवून एफआयएच महिला हॉकी विश्वचषक पात्रता फेरीत विजेत्याच्या करंडकाचे लक्ष्य ठेवेल व त्या दिशेने एक पाऊल पुढे टाकेल.

भारतीय महिला हॉकी संघ तीन सामन्यांतून सात गुणांसह गट ब मध्ये अव्वल स्थानावर राहिला. स्कॉटलंडनेही तेवढेच गुण मिळवले, परंतु भारताच्या गोल फरकामुळे गटात दुसरे स्थान मिळविले. यजमान भारतीय संघाने गट साखळी फेरीत दोन विजय व एक बरोबरी नोंदवली.

एक विजय, एक बरोबरी आणि एक पराभव नोंदवून इटलीने गट अ मध्ये चार गुणांसह दुसरे स्थान मिळवले. यामुळे उपांत्य फेरीपूर्वी यजमान संघाला थोडी मानसिक आघाडी मिळाली.

भारत सध्या चार गोलसह स्पर्धेतील संयुक्त सर्वाधिक गोल करणाऱ्या फॉरवर्ड नवनीत कौरच्या प्रभावी फॉर्मवर भर देण्याचा प्रयत्न करेल. तिने वेल्सविरुद्धच्या शेवटच्या पूल सामन्यात उत्कृष्ट कामगिरी केली व गट साखळी फेरीत शानदार हॅट्ट्रिक केली.



उपांत्य फेरीसाठी भारतीय महिला हॉकी संघ सज्ज

दरम्यान, इटलीला फेडेरिका कार्टावर अवलंबून राहावे लागेल. त्यांचा प्रमुख आक्रमक धोका आहे व तिने स्पर्धेत आतापर्यंत तीन गोल केले आहेत.

**भारताचे पारडे जड**

कागदावर आणि फॉर्मवर भारताचे इटलीविरुद्ध पारडे जड आहे. भारत आणि इटली २०१२ पासून सात वेळा एकमेकांसमोर आले आहेत. भारताने त्यापैकी पाच सामने जिंकले आहेत, तर इटलीने एक विजय नोंदवला आहे व एक सामना बरोबरीत सुटला आहे, यामुळे यजमान संघाला थोडी मानसिक आघाडी मिळाली आहे.

टोकियो ऑलिम्पिकनंतर पुन्हा नेतृत्व करणाऱ्या भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक शोएर्ड मारिज्ने यांनी या कामगिरीला एक महत्त्वाचा टप्पा म्हटले आहे.

महिला हॉकी विश्वचषक २०२६ साठी पात्रता मिळवणे हा या गटासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे व खेळाडूंनी आतापर्यंत स्पर्धेत ज्या पद्धतीने कामगिरी केली आहे त्यासाठी त्यांना खूप श्रेय द्यावे लागेल, असे ते म्हणाले.

भारतीय संघाने संपूर्ण गट साखळी फेरीत चांगली शिस्त, संयम आणि आक्रमक हेतू दाखवला आहे.

आमची मानसिकता अगदी स्पष्ट आहे. आम्ही येथे केवळ पात्रता मिळवण्यासाठी आलो नाही आहोत. आम्हाला प्रत्येक सामन्यात सुधारणा करत राहायचे आहे आणि स्पर्धा जिंकण्याचे ध्येय आहे. उपांत्य फेरी हे आणखी एक मोठे आव्हान आहे आणि आम्ही पूर्ण लक्ष आणि तीव्रतेने त्यावर पोहोचू, असेही ते म्हणाले.

तथापि, इटलीच्या संघाला कमी लेखू नका अशा सूचना प्रशिक्षकांनी भारतीय महिला हॉकीपटूंना दिला आहे.

इटली हा एक स्पर्धात्मक संघ आहे व त्यांनी या स्पर्धेत दाखवून दिले आहे की ते मजबूत संघांना त्रास देऊ शकतात. आमच्यासाठी, आमच्या योजना चांगल्या प्रकारे अंमलात आणण्यावर, आमची रचना राखण्यावर आणि त्याच उर्जेने आणि आत्मविश्वासाने खेळणे सुरू ठेवण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल, असे ते म्हणाले.

१५ ते ३० ऑगस्ट दरम्यान नेदरलॅण्ड व बेल्जियम संयुक्तपणे आयोजित होणाऱ्या पुरुषांच्या स्पर्धेसोबत एफआयएच महिला विश्वचषक खेळला जाईल.

◂(वृत्तसंस्था)

# युकी भाम्बरी-गोरान उपांत्य फेरीत

## इंडियन वेल्स एटीपी मास्टर्स



युकी भाम्बरी व गोरान गोरान्सन

◆ **इंडियन वेल्स, १२ मार्च**

भारताच्या युकी भाम्बरीने गोरान गोरान्सनच्या साथीने इंडियन वेल्समध्ये ॲलेक्झांडर एर्लर आणि आंद्रे वावसोरी या जोडीला सरळ सेटमध्ये हरवून एटीपी मास्टर्स १००० टेनिस स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

३३ वर्षीय भारतीय खेळाडूने यापूर्वी मास्टर्स १००० स्तरावर दुहेरीच्या उपांत्य फेरीत दोनदा प्रवेश केला होता, यात गत वर्षी इंडियन वेल्सचाही समावेश आहे.

भाम्बरी व गोरन्सन या जोडीने एक तास ३० मिनिटांपेक्षा जास्त काळ चाललेल्या उपांत्यपूर्व सामन्यात ऑस्ट्रियन-इटालियन जोडीला ६-३, ७-६ असे पराभूत केले.

इंडो-स्वीडिश जोडीने त्यांच्या पहिल्या सर्व्हिसवर वर्चस्व गाजवले व ८३ टक्के गुण (२९/३५) जिंकले. हे गुण दुसऱ्या सेटच्या टायब्रेकमध्ये व सामन्याच्या शेवटी महत्त्वपूर्ण ठरले.

शुक्रवारी उपांत्य फेरीत त्यांचा सामना फ्रान्सच्या आर्थर रिंडरक्नेच आणि मोनॅकोच्या व्हॅलेंटाईन वाचेरोटशी होईल.

रिंडरक्नेच आणि वाचेरोटने आपल्या उपांत्यपूर्व सामन्यात आंद्रे रुबलेव्ह व करेन खाचानोव्ह या रशियन जोडीचा ६-३, ६-४ असा पराभव केला. ◂(वृत्तसंस्था)

# गिल वर्षातील सर्वोत्तम क्रिकेटपटू

## राहुल द्रविड जीवनगौरवने सन्मानित होणार





◆ **नवी दिल्ली, १२ मार्च**

आगामी १५ मार्च रोजी येथे होणाऱ्या बीसीसीआयच्या वार्षिक पुरस्कार वितरण सोहळ्यात भारताचा कसोटी व वन-डे संघ कर्णधार शुभमन गिलला वर्षातील सर्वोत्तम क्रिकेटपटू म्हणून गौरविण्यात येणार आहे.

गत महिन्यात विश्वचषक जिंकणाऱ्या टी-२० संघात निवड न झालेल्या २६ वर्षीय खेळाडूने इतर दोन्ही प्रकारांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. त्याने कसोटीत ९८३ धावा केल्या, यात २०२५ मध्ये इंग्लंडविरुद्धच्या अनिर्णीत मालिकेत ७० पेक्षा जास्त सरासरीने ७५४ धावा केल्या. त्याच्या एकदिवसीय धावांची संख्या ४९० इतकी होती, यात भारताच्या विजेत्या चॅम्पियन्स ट्रॉफी मोहिमेदरम्यान १८८ धावा होत्या.एकूणच, गिलने ४९ च्या सरासरीने १,७६४ धावा केल्या, यात सात शतके व तीन अर्धशतकांचा समावेश आहे.

जरी त्याचा टी-२० आंतरराष्ट्रीय फॉर्म विशेष प्रभावी नव्हता, तरी आयपीएल दरम्यान तो जबरदस्त फॉर्ममध्ये होता, त्याने गुजरात टायटन्ससाठी ५० च्या सरासरीने ६५० धावा केल्या.

**राहुल द्रविडला जीवनगौरव**

भारतीय संघाचे माजी मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडला भारतीय क्रिकेटमधील त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल कर्नल सीके नायडू जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. २०२४ च्या टी-२० विश्वचषक विजेतेपदासाठी संघाचे मार्गदर्शन करण्यात त्यांनी योगदान दिले आहे.

**एमसीए सर्वोत्तम संघटना**

मुंबई क्रिकेट संघटनेला (एमसीए) देशांतर्गत क्रिकेटमधील सर्वोत्तम संघटना म्हणून घोषित केले जाणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

## दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिजच्या खेळाडूंची शेवटची तुकडी मायदेशी रवाना

◆ **दुबई, १२ मार्च**

टी-२० विश्वचषकानंतर भारतात अडकलेल्या दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडीजच्या खेळाडूंची शेवटची तुकडी रवाना झाली आहे, अशी घोषणा आयसीसीने गुरुवारी केली. यामुळे पश्चिम आशियातील तीव्र संघर्षाच्या पृष्ठभूमीवर आखाती हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे निर्माण झालेल्या संकटाचा अंत झाला.

चालू युद्धामुळे विमान प्रवास योजना विस्कळीत झाल्या होत्या. दुबईसारख्या प्रमुख वाहतूक बिंदूवर हवाई क्षेत्र आणि विमानतळ बंद झाल्यामुळे दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडीज संघ कोलकातामध्ये अडकले.

वेस्ट इंडीज आणि दक्षिण आफ्रिकेने अनुक्रमे १ मार्च आणि ४ मार्च रोजी कोलकाता येथे त्यांचे शेवटचे टी विश्वचषक सामने खेळले. या आठवड्याच्या सुरुवातीला वेस्ट इंडीजचे नऊ खेळाडू रवाना झाले होते, तर उर्वरित १६ व्यावसायिक उड्डाणांवर बुक करण्यात आले होते. २९ सदस्यीय दक्षिण आफ्रिका संघही रवाना झाला आहे.

गत २४ तासांत दक्षिण आफ्रिकेचे उर्वरित २९ सदस्य आणि वेस्ट इंडिजचे शेवटचे १६ सदस्य त्यांच्या मायदेशी उड्डाणांनी रवाना झाले आहेत, यामुळे जागतिक प्रवासाच्या परिस्थितीत झालेल्या गुंतागुंतीच्या ऑपरेशनचा शेवट झाला आहे, असे आयसीसीने म्हटले आहे.

सर्व खेळाडू आणि कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित पुढील प्रवास सुनिश्चित करणे हे एकमेव उद्दिष्ट होते, असे आयसीसीने म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)

## खेळाडूंच्या तंदुरुस्ती चाचणीसाठी आचारसंहिता तयार करा : क्रीडा मंत्रालय

◆ **नवी दिल्ली, १२ मार्च**

भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडूंच्या वैद्यकीय मूल्यांकनाचे प्रमाणिकरण करण्यासाठी, क्रीडा मंत्रालयाने राष्ट्रीय क्रीडा विज्ञान आणि संशोधन केंद्राला (एनसीएसएसआर) नियतकालिक फिटनेस पुनरावलोकनांसाठी शिस्त-विशिष्ट आचारसंहिता तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. आचारसंहिता राष्ट्रीय क्रीडा भांडार प्रणालीवर अनिवार्यपणे अपलोड करावे लागतील.

भारतीय क्रीडा प्राधिकरण (एसएआय) संपूर्ण व्यायामाचे समन्वय साधेल, असे मंत्रालयाने भारतीय ऑलिम्पिक संघटना (आयओए) आणि राष्ट्रीय क्रीडा महासंघांना (एनएसएफ) लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)

# 'मिशन लक्ष्यवेध' अंतर्गत निपुणता केंद्राची प्रक्रिया सुरु

▸▸ **लातूर विभागात ॲथलेटिक्स व कुस्ती या खेळांचा समावेश**

▸▸ **पुणे विभागात ॲथलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, हॉकी, रायफल शूटींग, रोईंग, कुस्ती व टेबल टेनिस या खेळांचा समावेश; प्रत्येकी २० खेळाडू निवडणार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

राज्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासाकरिता मिशन लक्ष्यवेध हा महत्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आलेला असुन, या योजनेंतर्गत लातूर विभागास ॲथलेटिक्स व कुस्ती या दोन खेळांचे निवासी विभागीय क्रीडा निपुणता केंद्र सुरु करण्यास तर पुणे विभागात ॲथलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, हॉकी, रायफल शूटींग, रोईंग, कुस्ती व टेबल टेनिस या ८ खेळाच्या प्रत्येकी २० खेळाडूंची निवड करण्यास मान्यता मिळालेली आहे.

पुणे विभागाकरिता पात्र खेळाडूंनी आपले अर्ज विभागीय उपसंचालक पुणे विभाग पुणे, यांचे कार्यालय विभागीय क्रीडा संकुल, सर्व्हे नं. १९१, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, मोझे विद्यालयासमोर, येरवडा पुणे ४११००६ येथे प्रत्यक्ष अथवा deputypune@gmail.com या ई-मेल वर १७ मार्च पर्यंत करावेत, असे आवाहन क्रीडा व युवक सेवा, पुणे विभागाचे उपसंचालक युवराज नाईक यांनी केले आहे.

लातूर विभागाकरिता खालील निकषानुसार पात्र खेळाडुनी आपले अर्ज विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग,जिल्हा क्रीडा संकुल परिसर,औसा रोड लातूर येथे प्रत्यक्ष अथवा dyd.syslatur@rediffmail.com या ई मेलवर २० मार्चपर्यंत करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे. निवड झालेल्या खेळाडुना निवासी क्रीडा प्रशिक्षण, पायाभुत सुविधा व क्रीडा साहित्य, खेळाडुच्या सराव व मुल्यांकनाकरिता क्रीडा स्पर्धाचे आयोजन,स्पोर्टस सायन्स सेंटर, करियर मार्गदर्शन, देशी-विदेशी संस्थाच्या सहकार्याने क्षमता विकास कार्यक्रम ई. सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने मिशन लक्ष्यवेध ही निवासी विभागीय क्रीडा निपुणता योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. तसेच यामध्ये निवड झालेल्या खेळाडूंना निवास, भोजन, पुरक आहार खर्च, क्रीडा व प्रशिक्षण साहित्य, निवडलेल्या खेळाडूंचे देशांतर्गत/परदेशी प्रशिक्षण व देशांतर्गत/विदेशातील स्पर्धा सहभाग खर्च, खेळाडूंच्या वैद्यकीय चाचण्या, किरकोळ वैद्यकीय खर्च, विभागीय उपसंचालक क्रीडा व यवुक सेवा यांच्यामार्फत करण्यात येईल.

**पात्रता व अटी याप्रमाणे**

१ **वयोमर्यादा** - ३१ डिसेंबर २०२६ रोजी २५ वर्षाआतील मुले/मुली

२ **आवश्यक कागदपत्रे** - जन्मदाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र,आधार कार्ड, मागील २ वर्षातील क्रीडा विषयक कामगिरीचे प्रमाणपत्र,पासपोर्ट साईज ३ फोटोग्राफ, शाळा महाविद्यालय बोनाफाईड प्रमाणपत्र पालकांचे संमती पत्र

३ **अधिवास** - महाराष्ट्र राज्यातील खेळाडू असणे अधिवास प्रमाणपत्र आवश्यक

४ **क्रीडा कामगिरी** - राज्यस्तरावरील पदक प्राप्त खेळाडू किंवा राष्ट्रीय स्तरावील सहभागी खेळाडू (SGFI,AFI,Khelo India National only ) गत २ वर्षाच्या क्रीडा कामगिरीचे मुल्यमापन करण्यात येऊन क्रीडा कौशल्य व तंदुरुस्ती (Fitness) चाचण्यांमध्ये पात्र होणे आवश्यक

५ **वैद्यकीय तपासणी** - शासन मान्यताप्राप्त डॉक्टरांकडून दिलेले वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य

# इंडियन राऊंड प्रकारात पुण्यास दुहेरी मुकुट

## राज्य अजिंक्यपद धनुर्विद्या स्पर्धा : नाशिकचा पाटील व पुण्याची हरगुडे अजिंक्यपदाचे मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च -**

राज्य अजिंक्यपद धनुर्विद्या स्पर्धेत इंडियन राऊंड प्रकारात १० वर्षांखालील मुले व मुलींच्या गटात पुणे जिल्ह्याने विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. वैयक्तित गटात नाशिकचा मानस पाटील व मुलींच्या गटात पुण्याची श्राव्या हरगुडे हे अजिंक्यपदाचे मानकरी ठरले.

नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर १० व १३ वर्षांखालील गटाच्या स्पर्धेस गुरुवारपासून सुरूवात झाली. महाराष्ट्र धनुर्विद्या संघटना व सोलापूर जिल्हा धनुर्विद्या संघटना यांचे संयुक्त विद्यमाने या स्पर्धा चार दिवस चालणार आहेत. याचे उद्घाटन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी केले. यावेळी महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेचे उपाध्यक्ष हरिदास रणदिवे, सचिव प्रमोद चांदूरकर, सहसचिव सोनल बुंदेले, तुळजापूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी आणि राष्ट्रीय पदक विजेते खेळाडू अजिंक्य रणदिवे, वास्तुविशारद अमर नागमोडे, माजी तालुका क्रीडाधिकारी सत्येन जाधव आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सावता घाडगे यांनी केले. याप्रसंगी क्रीडा अधिकारी म्हणून निवड झालेले विठ्ठल भालेराव यांचा सत्कार डॉ. ओंबासे यांच्या हस्ते करण्यात आला.



**१० वर्षांखालील गट सांघिक**



**भारताचे नाव ऑलम्पिकमध्ये चमकेल**

सोलापूर जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्चरी वाढते आहे. आणि महाराष्ट्रातील एवढे खेळाडू गडचिरोली पासून ते रत्नागिरीपर्यंत आलेले सगळे खेळाडू अगदी सहा वर्षापासून ते दहा वर्षापर्यंतचे चांगले क्रीडा नैपुण्य या ठिकाणी दाखवित आहेत. यांचे कौशल्य बघून नक्की वाटते की येणाऱ्या काळामध्ये भारताचे नाव ऑलिंपिकच्या पथकावर कोरले जाईल.

**- डॉ. सचिन ओंबासे, आयुक्त सोलापूर महानगरपालिका**

**भारताच्या संघात ७०% महाराष्ट्राचे खेळाडू**

भारताच्या संघात ७०% महाराष्ट्राचे खेळाडू आहेत, हे महाराष्ट्रातल्या पालकांचे क्रीडा मार्गदर्शकांचे, सर्व जिल्हा संघटनांचे यश आहे. या स्पर्धे साठी महाराष्ट्रभरातून जवळपास साडेसातशे पेक्षा अधिक खेळाडू चार दिवस या ठिकाणी आपल्या क्रीडा कौशल्याचं प्रदर्शन करतील.

**-प्रमोद चांदूरकर, सचिव महाराष्ट्र धनुर्विद्या संघटना**

**निकाल (प्रथम तीन):** मुले : पुणे, नाशिक, मुंबई उपनगर. मुली : पुणे, नाशिक, मुंबई उपनगर.

**सोलापूरचे अर्जुनवीर माने-देशमुख, प्राजंल तळे महाराष्ट्र संघात**

दहा वर्षांखालील गटातून दहा जणाचा संघ गुंटूर (आंध्र) येथे २६ मार्च ते ७ एप्रिल दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणार आहेत. यात सोलापूरच्या अर्जुनवीर माने-देशमुख व प्रांजल तळे यांचा समावेश आहे.

**प्रथम दहा खेळाडू असे : मुले** : मानस पाटील (नाशिक), आयुष शेटे, पृथ्वी पाचपुते (पुणे), अव्यान साळुंके (मुंबई उपनगर), विवान खोरे (नाशिक), आरव चौधरी(पुणे), कैवान शहा (मुंबई उपनगर), अर्जुनवीर माने-देशमुख (सोलापूर), यशवर्धन घायके (पुणे), शिवम सोळंकी (मुंबई उपनगर).

**मुली** : श्राव्या हारगुडे (पुणे), मृणम्यी कदम (रायगड), दित्या धानखर (मुंबई), प्राजल तळे (सोलापूर), हुमैरा पठाण (सांगली), शिवकन्या तळेकर (पुणे), कानसु वग्गे (नाशिक), रुचल पाटील (जळगाव), स्वरा बर्डे (नाशिक), राजस्वी दिगोळे (पुणे).

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### सोजर इंग्लिश स्कूलमध्ये महिला दिन उत्साहात साजरा

**बार्शी, दि. १२ मार्च -**

यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सोजर इंग्लिश स्कूलच्यावतीने महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित सर्व महिला पालकांचे शाळेच्यावतीने फुलांची उधळण करुन स्वागत करण्यात आले. तसेच यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. रिटा नेटके यांनी आद्य शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १२९ व्या पुण्यतिथीनिमित्ताने प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. महिला दिनाच्यानिमित्ताने उपस्थित महिला पालकांसाठी म नोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले. या खेळामध्ये सर्व महिलांनी अत्यंत उत्साहाने सहभाग घेतला. यावेळी संस्थेच्या सचिवा कल्पनाताई बारबोले यांच्या विशेष उपस्थितीत स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद सर आणि भोसले सर यांनी केले. तर मुख्याध्यापिका सौ. रिटा नेटके यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक बंधु-भगिनी व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम संपन्न झाला.

### वैराग येथे रुग्णालयासाठी जागा देण्याचे दिले आदेश; प्रस्तावित उपोषण मागे

**वैराग, दि.१२ मार्च-**

ग्रामीण रुग्णालयासाठी शासनाने दिलेल्या जागेचा करारनामा करण्याबाबत तहसीलदारांच्या निष्काळजीपणामुळे होत असलेल्या दिरंगाईचा निषेध करत, सामाजिक कार्यकर्ते अमरराजे निंबाळकर यांनी ११ मार्च रोजी उपोषणाचा इशारा दिला होता. त्यानंतर प्रशासकीय हालचालींना वेग आला असून, वैराग येथे ३० खाटांच्या रुग्णालयासाठी शासनाच्या मालकीची जागा उपलब्ध करून देण्यास अधिकृत मान्यता देण्यात आली आहे. तहसील कार्यालय येथून यासंदर्भात अधिकृत आदेश जारी करण्यात आला आहे. तहसीलदार बार्शी यांच्या आदेशानुसार, मौजे वैराग येथील सर्वे नंबर ४२२/२ मधील एकूण ४ हेक्टर ४५ आर क्षेत्रापैकी २ हेक्टर ४५ आर इतकी जागा रुग्णालय उभारणीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या निर्णयाची माहिती वैराग पोलीस ठाण्याला देण्यात आली आहे. प्रशासनाने मागणी मान्य करून जागा उपलब्ध करून दिल्याने, अमरराजे निंबाळकर यांनी आपले प्रस्तावित उपोषण मागे घेतले आहे.

### कन्हेरगांव शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी पाटील; उपाध्यक्षपदी माने

**टेंभुर्णी,दि,१२ मार्च-**

कन्हेरगांव (ता. माढा) येथील शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी संजय पाटील तर उपाध्यक्षपदी सोनाली माने यांची बिनविरोध निवड करण्यात आली. माजी सरपंच लिंबाजी मोरे यांच्या अध्यक्षतेखाली हि निवड झाली. यावेळी नव्याने स्थापन झालेल्या शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांमध्ये रुपचंद कांबळे, अमृता ताटे, सागर धोत्रे, बालाजी मोरे, रेश्मा गिरी, सीमा लोखंडे, खंडू पोटरे, सोनाली चव्हाण, आश्विनी घाडगे, प्रकाश टिंगरे व सिद्धेश्वर ताटे यांची निवड करण्यात आली. शिक्षणप्रेमी सदस्य म्हणून अनिता माने, ग्रामपंचायत प्रतिनिधी म्हणून अर्चना जगताप, शिक्षक प्रतिनिधी तसेच विद्यार्थी प्रतिनिधी यांचाही समितीत समावेश करण्यात आला आहे. समितीचे सदस्य सचिव म्हणून महादेव जठार हे कार्य पाहणार आहेत. नूतन अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्यांचे ग्रामस्थ व पालकवर्गाकडून अभिनंदन करण्यात येत आहे.



### फेस्कॉम पुणे प्रादेशिक विभाग राज्यात सर्वोत्तम

**मोडनिंब,दि.१२ मार्च-**

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ फेस्कॉमचे ३५ वे राज्यस्तरीय अधिवेशन नाशिक येथे उत्साहात संपन्न झाले. यावेळी उत्कृष्ट वैयक्तिक आणि सांघिक पुरस्कार देण्यात आले. पुणे प्रादेशिक विभागास राज्यस्तरीय उत्कृष्ट प्रादेशिक विभाग म्हणून जाहीर करण्यात आले. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. सदरचा पुरस्कार फेस्कॉम पुणे प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष हनुमंत कुंभार, उपाध्यक्ष आयुब इनामदार, सचिव एकनाथ वाळुंज यांनी अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष पाटील ,फेस्कॉम महाराष्ट्राचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे माजी अध्यक्ष अरुण रोडे,मुख्यसचिव चंद्रकांत महामुनी , मुख्यालय उपाध्यक्ष विवेक देशपांडे, राज्य महिला आघाडी प्रमुख निर्मला कोरे, अधिवेशनाचे आयोजक नाशिक विभागाचे अध्यक्ष अशोकनाना होळकर, सचिव धनंजय चतुर व अन्य पदाधिका-यांच्या उपस्थितीत स्विकारला. मोफत होमिओपॅथिक दवाखाना,मोफत कायदेविषयक सल्ला केंद्र व समुपदेशन केंद्र, विरंगुळा केंद्र, विविध प्रकारची शिबिरे, सांस्कृतिक कार्यक्रम, राज्यस्तरीय व प्रादेशिक अधिवेशन, महिला मेळावा, कार्यशाळा, आरोग्य शिबीरे ,शासकीय लाभांच्या योजनांची प्रभावी कार्यवाही. प्रादेशिक वार्तापत्र, पेपरलेस कामकाज, पुस्तक विक्री व अन्य सामाजिक उपक्रम इत्यादी प्रभावी अंमलबजावणी केली जाते. सांघिक कामगिरीमुळे सलग दोन वेळा हा पुरस्कार मिळाल्याचे अध्यक्ष कुंभार व उपाध्यक्ष इनामदार यांनी सांगितले. पुरस्कार मिळाल्याबद्दल अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले.

## निधन वृत्त...

### शिवराया कलबुर्गी



**सोलापूर, दि. १२ मार्च-**


कोयना नगर देगाव येथील रहिवासी शिवराया भिमणा कलबुर्गी (वय १०२) यांचे मंगळवार दि.१० मार्च रोजी रात्री ११ वाजता निधन झाले. त्यांच्यावर बुधवारी दुपारी २ वाजता देगांव येथील कलबुर्गी यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुले, तीन मुली, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# भूमी अभिलेखच्या कामचुकार कर्मचाऱ्यांस अखेर कारणे दाखवा नोटीस

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.१२ मार्च-**

मंगळवेढा येथील भूमी अभिलेख कार्यालयातील परिक्षण भूमापक जफारउल्ला तांबोळी यांनी आपल्या कर्तव्यात कसूर करुन नियमाचे उल्लंघन केल्याप्रकरणी भूमी उपअधिक्षक विद्या तांगडे यांनी कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागविला आहे. दरम्यान या कारवाईमुळे येथील कार्यालयातील कामचुकार कर्मचाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

मंगळवेढा येथील भूमि अभिलेख कार्यालयात परिक्षण भूमापक तांबोळी हे कार्यरत असून त्यांच्याकडे जास्त प्रमाणात प्रलंबीत कामे असल्याचे दिसून येत आहे. प्रलंबीत प्रकरणाबाबत तक्रारदार शेतकरी व नागरिक यांनी कार्यालयात येवून वारंवार भेटी देवून अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या होत्या. दरम्यान यामध्ये प्रामुख्याने खरेदी नोंद, वारस नोंद, मृत्यूपत्र नोंद, बोजा नोंद कमी करणे तसेच मिळकतीमध्ये नावामध्ये, क्षेत्रामध्ये तांत्रीक दुरुस्ती करणे इत्यादी जास्त प्रमाणात शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त होत्या. यामध्ये सदर कर्मचार्यांनी काहीच कारवाई न करता प्रदीर्घ कालवधीपासून प्रलंबीत ठेवले असल्याचे दिलेल्या नोटीसमध्ये नमूद केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (श.प.)यांच्या कार्यकर्त्यांनी दि.२३/१/२०२६ रोजी समक्ष भेटून अधिकऱ्याला त्या कर्मचाऱ्याला तात्काळ निलंबन करण्याचे निवेदन देवून तीव्र नाराजी व्यक्त केली होती. दि.२७/१/२०२६ रोजी जिल्हाअधिक्षक भूमीअभिलेख सोलापूर




यांच्या कार्यालयाकडून प्रलंबीत कामाबाबत कारणे दाखवा नोटीस बजावली होती. अद्यापपर्यंत सदर कर्मचाऱ्यांनी एकाही नोटीसीचा खुलासा सादर केला नसल्याचे नोटीसीत म्हटले आहे.


कुठलाही रजेचा अर्ज न देता व परवानगी न घेता बारा दिवस कार्यालयात अनुपस्थित राहिले असल्याचेही नोटीसीत म्हटले आहे. या विविध कारणावरुन येथील भूमी अभिलेख कार्यालयातील उपअधिक्षक विद्या तांगडे यांनी महाराष्ट्र नागरी सेवा नुसार वेतन रोखण्याची शिक्षा देण्यात येत असल्याचे म्हटले आहे. दरम्यान मंगळवार दि.१० रोजी चक्क तो कर्मचारी कार्यालयात न येता घरी बसून राहिल्याने शेतकऱ्यांना कार्यालयाचे उंबरठे झिजवण्याची वेळ येवून तीव्र संताप व्यक्त केला. याबाबतची माहिती समजल्यावर सायंकाळी चार वाजता तो कर्मचारी कार्यालयात हजर झाल्याची माहिती सांगण्यात आली. शासकीय कार्यालयातील कोणत्याही कर्मचाऱ्यांनी घरात बसून कामकाज करावे असा नियम नसतानाही या कर्मचाऱ्याने कोरोना कालावधीतील आठवण करुन देत चक्क घरात बसून काम पाहिल्याची माहिती उघड झाली आहे. वरिष्ठ अधिकारी आता या कर्मचाऱ्याबाबत गंभीर दखल घेणार की? त्याच्या चुकावर पांघरुन घालणार ? याकडे तमाम मंगळवेढावासीयांचे लक्ष लागून राहिले आहे. यापुर्वीही त्या कर्मचाऱ्याच्या विरुध्द येथे आंदोलन करण्यात आले होते. मात्र कोणतीच कारवाई न केल्यामुळे काळ सोकावत गेल्याच्या तिखट प्रतिक्रीया नागरिकांनी यावेळी व्यक्त केल्या.

## घरगुती गॅसचा अवैध वापर रोखण्यासाठी पंढरपूरमध्ये धाड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१२ मार्च :**

सध्या जागतिक युद्धजन्य परिस्थितीमुळे भविष्यात इंधनाचा तुटवडा पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासन व सोलापूर जिल्हा प्रशासनाने घरगुती गॅस सिलेंडरचा अवैध वापर टाळण्यासाठी विशेष पथके स्थापन केली आहेत. जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांच्या आदेशानुसार प्रत्येक तालुक्यात पथक कार्यरत असून, पंढरपूर तालुक्यातील पथकाने तहसीलदार सचिन लंगोटे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई केली.

पथक प्रमुख पुरवठा निरीक्षक विजय बादल व पुरवठा सहाय्यक उमेश हिंगमिरे यांनी मिळालेल्या माहितीनुसार दिनांक ११ मार्च २०२६ रोजी रात्री साडेदहा वाजता सांगोला रोड, महाराज मठासमोर पंढरपूर येथे धाड टाकली. या ठिकाणी घरगुती गॅसचा अवैध वापर होत असल्याचे आढळून आले. कारवाईदरम्यान घरगुती




वापरातील आठ सिलेंडर टाक्या व व्यावसायिक पाच सिलेंडर टाक्या जप्त करण्यात आल्या. आरोपी गणेश राजू बोरीकर (वय २४, रा. पंढरपूर) याच्याविरुद्ध शहर पोलीस स्टेशन, पंढरपूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, मागणीप्रमाणे गॅस सिलेंडर उपलब्ध केले जाणार आहेत. तरीही युद्धजन्य परिस्थिती पाहता गॅस सिलेंडरचा काटकसरीने वापर करावा, कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये. तसेच शासनास सहकार्य करावे.

## बार्शीच्या कृषी महाविद्यालयात रॅगिंगविरोधी समिती गठीत

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१२ मार्च**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे कृषी महाविद्यालयात रॅगिंगविरोधी कृती समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. डी. बी. शिंदे आहेत. तर या समितीत तहसीलदार व पोलीस निरीक्षक या शासकीय अधिकाऱ्यांसह १४ सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

कृषी महाविद्यालय व परिसरात कोणत्याही प्रकारे रॅगिंगचा प्रकार घडू नये, यासाठी ही समिती नेमण्यात आली आहे. तहसीलदार एफ. आर. शेख, बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्यासह माध्यम प्रतिनिधी म्हणून पत्रकार उमेश पवार यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे. या समितीत डॉ. संदीप तांबारे, महाविद्यालयाचे प्रा. डॉ. संतोष शेंडे, प्रा. ए. आर आदलिंगे, टी. एस. मोरे यांची तर पालक प्रतिनिधी म्हणून एस. ए. मगर, पी. वाय. पाटील आणि विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून श्रेया पवार, प्रणव घळके, संध्याराणी घाडगे, आकाश शेलार यांची निवड श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आलेली आहे. कोणत्याही विद्यार्थ्यांनी कोणालाही रॅगिंग करण्याचा प्रयत्न करु नये म्हणून महाविद्यालयात पोलीस यांच्यासह अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन आणि व्याख्यान ठेवले जाणार असल्याचे यावेळी प्राचार्य शिंदे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे. या नियुक्तीबद्दल सर्वांचे अभिनंदन केले जात आहे..

## वैशाली दुधगी सोन्याच्या नथीच्या मानकरी

**वळसंगमध्ये टाटा पॉवरतर्फे होम मिनिस्टर स्पर्धा**

**वैशाली बनसोडे यांना पैठणी**

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, १२ मार्च-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथे टाटा व्हॉलिटरिंग वीकचे औचित्य साधून टाटा पॉवरचे कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय तसेच स्वामी समर्थ सेवा मंडळाने घेतलेल्या होम मिनिस्टर स्पर्धेत आशा वर्कर वैशाली दुधगी महाविजेत्या ठरल्या. त्यांना प्रतीक ज्वेलर्सकडून सोन्याची नथ देण्यात आली तर उपविजेत्या वैशाली बनसोडे यांना स्वामी समर्थ सेवा मंडळाकडून मानाची पैठणी देण्यात आली.



जागतिक महिला दिनानिमित्त महिलांचा सन्मान करण्यात आला. टाटा पॉवरचे सीएसआर विभाग अधिकारी विश्वास सोनवले यांनी प्रास्ताविकातून टाटा व्हॉलिटरिंग वीक चे महत्व सांगून अनोखा धागा ह्या महिला सबलीकरण उपक्रमाविषयी मार्गदर्शन केले. स्पर्धेतील सात स्पर्धकांना टाटा पॉवर कम्युनिटी डेव्हलपमेंट ट्रस्ट मुंबई यांच्याकडून मानाची साडी भेट देण्यात आली. यामध्ये श्रुती पिसे, पुनम सावंत, कलावती खैराटे, रेखा विधाते, अनुराधा पाटील, सुरूवाई धडुते, ऋतुजा कारभारी यांचा समावेश होता. सहभागी सर्व महिलांना स्वामी समर्थ सेवा मंडळाकडून ब्लाउज पीस व गुलाब पुष्प देण्यात आले. सर्व उपस्थित महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान टाटा पॉवर च्या अधिकाऱ्यांनी फेटा बांधून केला. यावेळी श्री.सोनवले, स्टेशन हेड दत्तात्रय बस्तापुरे व विजय पिसेसह इतर कर्मचारी वृंद, सरपंच जगदीश अंटद, सरपंच विश्रांती पाटील, स्वामी समर्थ सेवा मंडळाचे अध्यक्ष श्रीशैल दुधगी, कार्याध्यक्ष महादेव होटकर, सचिव सिध्दारुढ काळे, सन्मुख स्वामी उपस्थित होते. यशवंत गायकवाड, प्रतिभा दुधगी, दिनकर नारायणकर, अजय काळे यांनी परिश्रम घेतले. आकाशवाणी केंद्राच्या निवेदिका रश्मी मोहोळकर यांनी सूत्रसंचालन केले.

## ‘एआय’च्या उत्कृष्ट उसाला पुरस्कार देणार : डॉ. कुलकर्णी



**कारखाना कार्यस्थळावर कार्यशाळा संपन्न**

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.१२ मार्च-**

श्रीपूर (ता. माळशिरस) येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यातर्फे आधुनिक तंत्रज्ञानाचा (एआय) अवलंब करून दर्जेदार ऊस पिक घेणाऱ्या शेतकऱ्यास पुरस्कार देण्यात येणार असल्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी जाहीर केले.

कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी डॉ. कुलकर्णी बोलत होते. यावेळी शास्त्रज्ञ डॉ. समाधान सुरवसे, डॉ. तुषार शितोळे, एआय तज्ञ अजित वायसे, अरुण पडळ, महेश शिंदे, मुख्य शेती अधिकारी संतोष कुमठेकर, ऊस विकास अधिकारी सोम नाथ भालेराव उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. समाधान शितोळे यांनी सांगितले की, सद्य परिस्थितीत रासायनिक खते व मुबलक पाण्याच्या वापरामुळे शेतीची सुबकता कमी होऊन क्षारयुक्त शेती वाढत आहे. भविष्यात हा धोका मोठा असून शेती नापीक होण्याचा धोका आहे. यावर एआय तंत्रज्ञान प्रभावी माध्यम असून यात जमिनीला ज्यावेळी आवश्यक असणारे नत्र, पालाश, स्फुरद याची माहिती मिळून त्याप्रमाणे स्वयंचलित प्रणालीव्दारे डोस देता येणार आहेत. याबरोबरच हवामानातील बदल, सेंद्रीय व रासायनिक खतांची मात्रा याचीही अद्ययावत माहिती मिळणार असल्याने कमी पाण्यात, कमी खर्चात, कमी क्षेत्रात जास्तीचे उत्पादन मिळणार असल्याची माहिती देवून शेतकऱ्यांसाठी माहितीचे नवे दालन निर्माण होत असल्याचे सांगितले. काळाची गरज ओळखून सर्वांनी या तंत्रज्ञानाचा वापर करणेचे आवाहन केले. याप्रसंगी डॉ. तुषार शितोळे, अजित वायसे, अरुण पडळ, महेश शिंदे यांनीही एआय तंत्रज्ञानाचा वापर व त्याचे परिणाम यावर आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वैद्यकीय अधिकारी डॉ. सुधीर पोफळे यांनी केले. ऊस विकास अधिकारी सोमनाथ भालेकर यांनी आभार मानले.



## बार्शीच्या श्री शिवाजी महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागाचा पालक मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१२ मार्च-**

श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी येथे रसायनशास्त्र विभागाच्यावतीने बी.एस्सी. भाग ३ च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेला पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला. महाविद्यालयाचे प्राचार्य ए.बी. शेख यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी शिवाजी महाविद्यालय परंडा येथील प्राचार्य प्रो. टी.एन. लोखंडे आणि कला सम न्वक डॉ. बी.डी. पारसे हे उपस्थित होते.

कार्यक्रमात प्राचार्य ए.बी. शेख यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत पालकांचा महत्त्वपूर्ण वाटा अधोरेखित करताना सांगितले, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ महाविद्यालयीन शिक्षण पुरेसे नसून पालकांनी त्यांच्या अभ्यास आणि वर्तणुकीवर लक्ष ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. पालक आणि शिक्षक यांच्यातील सुसंवाद विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल करतो. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना रसायनशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रो. एस. एच. गायकवाड यांनी विभागाच्या उपक्रमांची माहिती दिली. पालक मनोगते प्रातिनिधिक स्वरुपात लोहार सर आणि खैरे सर यांनी व्यक्त केली. त्यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक शिस्त आणि उपक्रमांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बाबासाहेब सोनवणे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. प्रदीप काटे व डॉ. राहुल पालके यांनी मानले. सदरील मेळावा यशस्वी होण्यासाठी रसायनशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



## सांगोला विद्यामंदिरच्या १७३ विद्यार्थ्यांचे एनएमएमएस परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१२ मार्च -**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेतलेल्या एनएमएमएस परीक्षेत सांगोला विद्यामंदिर प्रशालेतील १७३ विद्यार्थ्यांनी दैदीप्यमान यश प्राप्त केले. या परीक्षेस एकूण २०२ विद्यार्थी बसले होते. यामध्ये १५० पेक्षा अधिक ३, १४० पेक्षा अधिक १८, १३० पेक्षा अधिक ३५, १२० पेक्षा अधिक ६३, ११० पेक्षा अधिक ९९ तर १०० पेक्षा अधिक गुण मिळवणारे १२८ विद्यार्थी आहेत. सुबोधिनी गुंडोपंत इंगवले हि १५६ गुण मिळवून प्रशालेत प्रथम आली. विद्यार्थ्यांना निलेश जंगम, नामदेव खंडागळे, सिताराम राऊत या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल विद्यार्थ्यांसह पालक व शिक्षकांचे संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, उपाध्यक्ष ॲड.विजयसिंह चव्हाण, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य शीलाकाकी झपके, विश्वेश झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदिप धुकटे, उत्तम सरगर, काकासाहेब नरुटे यांनी अभिनंदन केले. प्रशालेच्या परंपरेप्रमाणे प्रतिवर्षी विद्यार्थी या परीक्षेमधून जवळपास ५० लाखांच्या आसपास शासकीय शिष्यवृत्ती संपादन करत असतात.

## जमिनीच्या वादातून शेतकऱ्यावर कोयत्याने जीवघेणा हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१२ मार्च-**

तालुक्यातील आगळगाव येथे जमिनीच्या वादातून एका शेतकऱ्यावर कोयत्याने हल्ला करुन गंभीर जखमी केल्याची घटना घडली आहे. जखमी शेतकरी सध्या बार्शी येथील हिरेमठ रुग्णालयात उपचार घेत आहे.




याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, शशिकांत अर्जुन गुळमिरे (वय ४२, रा. आगळगाव, ता. बार्शी) हे आपल्या कुटुंबासह शेती करुन उदरनिर्वाह करतात. आगळगाव येथील गट क्रमांक ६१३ मधील शेतीवरुन त्यांचा नातेवाईकांशी दीर्घ काळापासून वाद सुरु असून, हा वाद न्यायालयात प्रलंबित आहे. या शेतातील त्यांच्या हिस्स्याच्या जमिनीत त्यांनी ऊस लागवड केली असून सध्या ऊस तोडणी सुरु होती. पंधरा दिवसांपूर्वी ऊस तोडणी सुरु असताना काही नातेवाईकांनी शेतात येऊन 'जमिनीचा दावा न्यायालयात सुरू आहे, त्यामुळे ऊस तोडू नये,' असे सांगितल्याने त्यांनी ऊस तोडणी थांबवली होती.

मात्र ८ मार्च रोजी पहाटेच्या सुमारास शशिकांत गुळमिरे हे शेतात काम करत असताना ऊस तोडण्याचा आवाज आल्याने त्यांनी पाहणी केली. त्यावेळी गावातील प्रवीण विष्णू गरड हा त्यांच्या शेतातील ऊस तोडत असल्याचे दिसून आले. याबाबत विचारणा केली असता त्याने काही नातेवाईकांनी ऊस तोडण्यास सांगितल्याचे सांगितले.

यानंतर त्याने आवाज देऊन सविता कुमार गुळमिरे, धीरज कुमार गुळमिरे, कुमार अर्जुन गुळमिरे व अमर सिद्धेश्वर खराडे यांना बोलावून घेतले. हे सर्वजण घटनास्थळी आल्यानंतर 'हा ऊस आमचा आहे, 'असे म्हणत शशिकांत गुळमिरे यांना शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, धीरज गुळमिरे याने तेथे असलेला कोयता घेऊन शशिकांत गुळमिरे यांच्या पाठीच्या डाव्या बाजूला वार केल्याने ते जखमी झाले. ते ओरडल्यावर त्यांची पत्नी मयुरी गुळमिरे घटनास्थळी धावून आल्या आणि भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पत्नीने मोबाईलवर घटनेचे चित्रीकरण करण्याचा प्रयत्न केला असता, सविता गुळमिरे हिने त्यांनाही मारहाण केल्याचा आरोप आहे. तसेच धीरज गुळमिरे याने त्यांच्या हातातील मोबाईल हिसकावून तो फोडल्याचेही सांगण्यात आले. या प्रकरणी शशिकांत गुळमिरे यांनी धीरज कुमार गुळमिरे, कुमार अर्जुन गुळमिरे, सवितां कुमार गुळमिरे, प्रवीण विष्णू गरड (सर्व रा. आगळगाव). तसेच अमर सिद्धेश्वर खराडे (रा. बार्शी) यांच्या विरोधात दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरु आहे.

# सांगोल्यात सत्तांतर; पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे ऑपरेशन लोटस यशस्वी



### मी आणि दीपकआबा एकत्र

गेल्या दीड वर्षापासून मी आणि दीपकआबा साळुंखे-पाटील एकमेकांपासून वेगळे होतो. परंतु आम्ही दोघे एकत्र असावे, असे सांगोला तालुक्यातील प्रत्येक कार्यकर्त्याला वाटायचे. कुठे ना कुठे आम्ही दोघे एकत्रच असावे, असे देवाला सुध्दा वाटत असेल म्हणूनच आज पंचायत समितीच्या सभापती आणि उपसभापती निवडीच्या निमित्ताने आम्ही पुन्हा एकत्र आलो आहोत, असे माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी सांगितले.

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१२ मार्च -**

शेतकरी कामगार पक्षाचा बालेकिल्ला अशी ओळख असणाऱ्या सांगोला पंचायत समितीच्या एकहाती सत्तेला भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना महायुतीने सुरुंग लावला. या निवडीच्या निमित्ताने जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगोल्यात राबविलेली ऑपरेशन लोटस ही मोहीम यशस्वी ठरली. सभापतीपदी भाजपच्या पुनम इंगवले तर उपसभापतीपदी शिवसेनेचे अजय सरगर यांची निवड करण्यात आली.

या निवडीत भाजपचे बाळासाहेब एरंडे आणि जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार यांची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली. महायुतीच्या कार्यकर्त्यांनी सांगोला पंचायत समिती परिसरात आणि संपूर्ण तालुक्यात गुलालाची उधळण व फटाक्यांची आतषबाजी करत एकच जल्लोष केला. माजी आमदारद्वय ॲड.शहाजीबापू पाटील, दीपकआबा साळुंखे-पाटील यांच्या संपर्क कार्यालयात दोघांचा सत्कार करण्यात आला.

निवडणुकीच्या काळात आघाडीत सोबत असलेल्या शेकापने कमालीचे क्रॉस वोटिंग करून आपल्याच उमेदवाराचा पराभव केल्याने पंचायत समितीवर असणारी शेकापची सत्ता उलथवून टाकण्याचा निर्धारच साळुंखे-पाटील यांच्या कार्यकर्त्यांनी केला होता. नुकत्याच पार पडलेल्या आढावा बैठकीत कार्यकर्त्यांनी साळुंखे पाटील यांना थेट भाजपमध्ये जाण्याचा आग्रह केला होता. त्यानुसार पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली आणि माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या उपस्थितीत साळुंखे पाटील यांच्या तिन्ही पंचायत समिती सदस्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला व शेकापच्या सत्तेला सुरुंग लावला.

### आपण शहाजीबापूंसोबत

सांगोला तालुक्यातील सामान्य जनतेचा विकास झाला पाहिजे हा माझा नेहमी आग्रह असतो. आगामी काळात जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या माध्यमातून सांगोला तालुक्याचा गतिशील विकास व्हावा ही माझी भूमिका आहे. विकासाच्या मुद्द्यावर आपण सदैव माजी आ.शहाजीबापू पाटील यांच्यासोबत राहू, असे माजी आमदार दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी सांगितले.



# बार्शीच्या सभापतीपदी भाजपच्या रोंगे; उपसभापतीपदी निंबाळकर बिनविरोध

## विक्रमी सर्व १२ जागांसह सलग पाचव्यांदा आली आहे राजेंद्र राऊत यांची सत्ता

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१२ मार्च-**

बार्शी पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती पदाच्या निवडी आज पार पडल्या. यात अपेक्षेप्रमाणे सभापतीपदी भाजपाच्या मीनाक्षी रोंगे तर उपसभापतीपदी संतोष निंबाळकर यांची बिनविरोध निवड पार पडली.

मीनाक्षी रोंगे यांच्या सूचक म्हणून किरण घुले यांनी तर संतोष निंबाळकर यांच्या सूचक म्हणून शरद बसवंत यांनी अनुमोदन दिले. निवडीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अमोलसिंह भोसले हे होते. यावेळी गटविकास अधिकारी विवेक जमदाडे व सदस्य उपस्थित होते. निवडीनंतर भोसले यांच्या हस्ते सभापती आणि उपसभापती यांचा प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

त्यानंतर पंचायत समितीच्या प्रांगणात माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते नूतन पदाधिकारी तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती विजयी उमेदवार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, उपनगराध्यक्ष रोहित पाटील, कविता राऊत, बाजार समिती सभापती विजय गरड, उपसभापती बाबा गायकवाड, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, भाजप तालुकाध्यक्ष बबन गडदे, मदन दराडे, शहराध्यक्ष महावीर कदम, जिल्हा उपाध्यक्ष केशव घोगरे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

**तालुक्याचा भौगोलिक समतोल साधला**

सभापती पदाची संधी ही राऊत यांनी त्यांचे जुने ज्येष्ठ सहकारी कै. विठ्ठल धस यांची मुलगी आणि माजी पंचायत समिती सदस्य हरिश्चंद्र धस यांची पुतणी मीनाक्षी रोंगे यांना तर उपसभापती देखील राऊत यांचे ज्येष्ठ मार्गदर्शक माजी आमदार चंद्रकांत निंबाळकर यांचे सुपुत्र संतोष निंबाळकर यांना संधी देत उतराई केली. तसेच एक पद उत्तर बार्शी तर एक वैराग भागाला देऊन समतोल साधला आहे.

उपसभापती संतोष निंबाळकर यांनी राजाभाऊची मान उंचावेल असे काम करु, असा शब्द दिला. तसेच खेळीमेळीत निवडी पार पडल्याबद्दल सर्व सदस्य आणि नेतेमंडळी यांचे आभार मानले. राजाभाऊ राऊत म्हणाले, सर्व सत्ता दिल्यामुळे मनापासून अभिमान वाटतो. सलग पाच टर्म सत्ता देणारा बार्शी हा एकमेव तालुका आहे. पार्टीतील एकसंघपणा व कुटुंबाप्रमाणे चालवतो

तालुक्यातील सिनियर नेत्यांनी आम्हाला सुरुवातीपासून सहकार्य केले. ज्येष्ठ सहकारी नेत्यांच्या मुलीला सभापती करण्याची संधी मिळाली याचा मोठा आनंद आहे. निष्ठा व प्रामाणिकपणा असेल तर संधी मिळते.जय पराजय होत असतात. विजयामुळे हुरळून जाऊ नये. जनतेशी बांधिलकी ठेऊन निष्ठेने काम करा. होणाऱ्या कामाचा शब्द द्या.कामधंदा पाहून राजकारण करा. नाही तर अडचणी येतात. पार्टीची शिस्त पाळा. पूर्वी काहीजणांनी कट कारस्थान केले. सुरात सूर मिसळले यामुळे धोका निर्माण झाला. फार मोठ्या अपेक्षेने तालुका पाहत आहे. कुणी कोणाची अवहेलना करु नये. पदाधिकाऱ्यावरही खोटे आरोप ही करु नका. अशा सूचना त्यांनी पदाधिकारी अन कार्यकर्ते यांना दिल्या. तालुका व राज्यातील सर्व सत्तास्थाने आपल्याकडे आहेत. मुख्यमंत्री यांना आपल्याकडून फार मोठ्या अपेक्षा आहेत. त्यांनी जी जबाबदारी दिली ती पार पाडली. सर्वांनी काळजीपूर्वक काम करा. झटलेल्या कार्यकर्त्यांचा मान सन्मान करा,असे आवाहन त्यांनी केले. सूत्रसंचालन संदीप मिरगणे यांनी केले तर आभार संजय भड यांनी मानले.

### यांचा केला सत्कार

मीनाक्षी रोंगे (सभापती), संतोष निंबाळकर(उपसभापती) सदस्य- संजय भड, राजेंद्र सुरवसे, भीमा गव्हाणे, शरद बसवंत, ऐश्वर्या महानवर, सुरेखा मुंडे, दीपक वैद्य, रेश्मा डोके, किरण घुले, भरती दराडे, नंदकुमार काळे, सुजाता डोईफोडे, विमल काटे, सोनाली बोधले, सविता साबळे, जयमाला जाधव या पंचायत समिती अन जिल्हा परिषद सदस्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच पडद्यामागे राहून पार्टीचे संघटनात्मक काम करणारे भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष रणवीर राऊत यांचा ही यावेळी विशेष सत्कार करण्यात आला.

# मोहोळच्या सभापतीपदी अस्लम चौधरी

## उपसभापतीपदी उल्का पाटील

**मोहोळ, दि.१२ मार्च-**

मोहोळ तालुका पंचायत समितीच्या सभापतीपदी भाजपचे अस्लम गफूर चौधरी (घोडेश्वर)यांची तर उपसभापतीपदी उल्का राजकुमार पाटील (नरखेड) यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.





नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत मोहोळ तालुक्यात भारतीय जनता पक्षाने १२ पैकी ७ जागा जिंकत सत्ता मिळविली आहे.अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे३, शिंदे सेनेला आणि शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसला प्रत्येकी १-१ जागा मिळाली आहे. मोहोळ पंचायत समितीचे सभापती पद इतरमागास प्रवर्गासाठी आरक्षित होते.घोडेश्वर गणातील असलम चौधरी, सावळेश्वर गणातील पार्वती गावडे आणि कामती गणातील कोमल अवताडे हे या पदासाठी इच्छुक होते.मात्र बाजार समितीच्या सभागृहात माजी आमदार राजन पाटील आणि यशवंत माने यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत अस्लम चौधरी आणि उल्का राजकुमार पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले.त्यानंतर दोघांनी निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन मुळीक यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल केले. विरोधकांनी उमेदवारी दाखल न करण्याची भूमिका घेतल्याने दोघांची बिनविरोध झाली.

# दिव्यांगांना मिळणार २५०० रुपये अर्थसहाय्य

## युडीआयडी व आधारकार्ड ३१ मार्चपूर्वी लिंक करा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय दिनांक १५ सप्टेंबर २०२५ अन्वये विशेष सहाय्य योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांना देण्यात येणारे मासिक अर्थसहाय्य रु.१५०० वरून रु.२५०० इतके वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार संबंधित दिव्यांग लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण डीबीटी पोर्टलद्वारे थेट लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात करण्यात येत आहे.

याअनुषंगाने राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार योजना, वृद्ध व्यक्तीसाठी श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना तसेच केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी दिव्यांग निवृत्तीवेतन योजना अंतर्गत लाभ घेणाऱ्या दिव्यांग लाभार्थ्यांचे णऊखऊ कार्ड व आधार कार्ड दिनांक ३१ मार्च २०२६ पूर्वी लिंक करणे बाबत सूचना प्राप्त झालेल्या आहेत.तरी सर्व संबंधित दिव्यांग लाभार्थ्यांनी शासनाच्या सूचनेनुसार आवश्यक कागदपत्रांसह दिनांक ३१ मार्च २०२६ पूर्वी कार्यालयाशी संपर्क साधून प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन संजय गांधी निराधार योजना शहर कार्यालयच्या तहसिलदार शिल्पा पाटील यांनी केले आहे.

तसेच संजय गांधी शहर शाखा कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील विशेष सहाय्य योजनेतील सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी दिनांक ३१ मार्च २०२६ पूर्वी आपले वैश्विक ओळखपत्र व आधार कार्ड संलग्न करणे आवश्यक आहे. यासाठी लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह संजय गांधी शहर शाखा कार्यालयाशी संपर्क साधावा.लाभार्थ्यांनी वैश्विक ओळखपत्र, आधार कार्ड, बँक पासबुक, अपंग प्रमाणपत्र, आधार लिंक असलेला मोबाईल क्रमांक कागदपत्रे बरोबर आणणे आवश्यक आहे. सदर कागदपत्रांसह संजय गांधी शहर शाखा कार्यालय, जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर येथे संपर्क साधल्यास दिव्यांग लाभार्थ्यांचे युडीआयडी व आधार कार्ड संलग्न करण्याची कार्यवाही करण्यात येईल

# अक्कलकोट पं.स.च्या सभापतिपदी हिप्परगी

## उपसभापतीपदी कल्याणशेट्टी

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट १२ मार्च -**

अक्कलकोट पंचायत समितीच्या सभापतीपदी भाजपाचे रश्मी हिप्परगी तर उपसभापतीपदी सागर कल्याणशेट्टी बिनविरोध निवड करण्यात आली. अध्यासी अधिकारी सुमित शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली.



या निवडीप्रसंगी पंचायत समितीचे सदस्य विनोद मोरे, अप्पासाहेब किवडे, आशा इंगळे, विमल गव्हाणे, उत्तम वाघमारे, वैष्णवी सलगरे, गणेश मोरे, शीतल म्हेत्रे, भीमण्णा सोलापुरे, संगीता पाटील आदी उपस्थित होते.

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते नूतन सभापती, उपसभापती यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, गटविकास अधिकारी शंकर कवितके, सिध्देश्वर कल्याणशेट्टी, चंद्रकांत दसले, अप्पासाहेब पाटील, प्रदीप पाटील, मल्लिकार्जून काटगाव, प्रकाश हिप्परगी, सागर हिप्परगी, ऋतुराज राठोड, महेश हिंडोळे, मोतीराम राठोड, मल्लिनाथ कल्याणशेट्टी आदी उपस्थित होते.

# आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल होत असल्यास पोलिसांशी संपर्क साधा

**सोलापूर, दि.१२ मार्च-**

उत्सव साजरा करताना बऱ्याचवेळी कायदेशीर बाबींचे उल्लंघन होत असते, कोणीही कायदा हातात घेऊ नये, सोशल मिडीयावर कोणीही आक्षेपार्ह मेसेजेस, फोटो, पोस्ट व्हायरल होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत त्वरीत पोलीस यंत्रणेस कळवावे, कोणताही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास पोलीसांशी संपर्क साधावा, शांतता समिती सदस्य व नागरीकांनी आपल्या परिसरातील बेकायेदशीर बाबींची माहिती पोलिसांना द्यावी, असे आवाहन पोलिस आयुक्त एम.राजकुमार यांनी केले. रमजान ईदच्या अनुषंगाने सोलापूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस आयुक्त कार्यालय येथे आयोजित केलेल्या शांतता समितीच्या बैठकीत ते बोलत होते. पोलिस उपायुक्त डॉ.अश्विनी पाटील यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी पोलिस उपायुक्त विजय कबाडे, सहाय्यक पोलिस आयुक्त प्रताप सोमण, दिलीप पवार, सुधीर खिराडकर, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त कारंजे, मीना बाजारचे अध्यक्ष कलीम तुळजापुरे यांच्यासह जिल्हाधिकारी, आरटीओ, महावितरण, अग्निशमन दलाचे अधिकारी-कर्मचारी व शांतता समितीचे सदस्य उपस्थित होते.

# आपलं सोलापूर-आपला अर्थसंकल्पसाठी मागविण्यात आल्या सूचना

## नागरिकांनी सूचना पाठवावेत : स्थायी समितीच्या सभापती रंजीता चाकोते

## सुपर टॅक्स संदर्भात सभेत निर्णय घेणार : महापौर विनायक कोंड्याल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ मार्च-**

स्वच्छ सोलापूर-सुंदर सोलापूर करण्यासाठी 'आपलं सोलापूर-आपला अर्थसंकल्प' या संकल्पनेच्या आधारावर शहरातील नागरिकांच्या सूचना मागविण्यात येत आहेत. दि. १३ ते १५ मार्च दरम्यान या सूचना महापालिकेतील सूचनापेटी,मोबाईल ॲप, ब्लॉग, क्यूआर कोडद्वारे सूचना मागविण्यात येत आहेत. नागरिकांनी सोलापूर शहर विकासासाठी आपल्या




सूचना पाठवाव्यात, असे आवाहन महापालिका स्थायी समितीच्या सभापती रंजीता चाकोते यांनी पत्रकार परिषदेत केले आहे.

सोलापूर महापालिकेच्या मिळकत कराची थकबाकी वसूल व्हावी यासाठी मिळकतकरातील शास्ती, दंड माफी करण्याचा विचार सुरू आहे. सुपर टॅक्स संदर्भातही येणाऱ्या महापालिका सभेत निर्णय घेण्यात येणार आहे. महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. सोलापूर शहरात ज्या ठिकाणी महापालिकेच्या जागा आहेत त्या ठिकाणी मिनी व मेजर गाळे बांधण्या संदर्भातही चर्चा करण्यात येणार आहे, असे महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले.

सोलापूर महापालिका अंदाजपत्रकाची तयारी सुरू आहे. या अंतर्गतच सोलापूरकरांच्या भावना या अंदाजपत्रकात समाविष्ट होणे आवश्यक आहे. त्यांची मते सूचना जाणून घेऊन हे अंदाजपत्रक तयार करण्यात येणार आहे. रस्ते, पाणी, स्वच्छता आणि इतर बाबतीत नागरिकांच्या सूचना अभिप्रेत आहेत. नागरिकांची मते आणि सूचना लक्षात घेऊन भाजपच्या वचनपूर्तीचे अंदाजपत्रक तयार करण्यात येणार आहे, असेही सांगण्यात आले. या पत्रकार परिषदेत उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, नगरसेवक गणेश वानकर, शिवाजी वाघमोडे, बिज्जू प्रधाने आदी उपस्थित होते.

### नळ नाही तिथे पाणीपट्टी आकारणी यावरही पुनर्विचार

ज्या ठिकाणी नळ नाही त्या ठिकाणी पाणीपट्टी आकारण्यात येते याबाबत नागरिकांमधून नाराजी आहे. त्या संदर्भातही चर्चा करून निर्णय घेण्यात येईल,. या संदर्भात बोर्डात चर्चा करण्यात येणार आहे. पनाश टॉवरप्रकरणी वापर परवाना रद्द करण्याचे आदेशही देण्यात येणार आहेत. सोलापूर महापालिकेचे अंदाजपत्रक हे सर्व समावेशक राहणार आहे. जमाखर्चाचा ताळमेळ लावून विकास कामे केली जातील, असे महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेजचे आंतरराष्ट्रीय परिषदेत लौकिकास्पद यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च :** चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर येथील एम. फार्म (फार्माकोलॉजी) द्वितीय वर्षाचा विद्यार्थी ऋषिकेश चौधरी याने इनोव्हेशन्स इन फार्मास्युटिकल, लाइफ अँड फॉरेन्सिक सायन्सेस: ब्रिजिंग क्लासिकल नॉलेज विथ मॉडर्न टेकनॉलॉजिजया दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत ओरल प्रेझेंटेशन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे.

ही परिषद दत्तकला कॉलेज ऑफ फार्मसी आणि दत्तकला इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्स अँड रिसर्च, भिगवण, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत उत्कृष्ट सादरीकरणासाठी ऋषिकेश चौधरीला रु. ३०००/- रोख पारितोषिक, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेला आणि संशोधनपर उपक्रमांना नवे बळ मिळाले असून विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या यशाबद्दल संस्थेचे सचिव श्री. भीमाशंकर देवणीकर, विश्वस्त श्री. विजयकुमार मठपती, श्री. अरुण हालकुडे, प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, डॉ. अविनाश टेकाडे, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. अनंत देशपांडे, डॉ. शिवराज नागोबा, डॉ. विवेक पंचभाई, डॉ. पद्मजा गिराम, डॉ. राम साखरे, डॉ. सुनील हिंडोळे, डॉ. शिवकुमार लद्दे, डॉ. नशीर शेख, प्रा. सारिका झिंगाडे, प्रा. रिशा वाले, प्रा. मोईन अत्तार, प्रा. महेश मानके, प्रा. अविनाश मठपती, प्रा. रोहित कोंबडे, शिवहार विभुते, सिद्धेश्वर स्वामी, प्रमोद स्वामी, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## विविध वृत्त...

### लातूर अर्बन बँकेचा स्वतंत्र IFSC कोड कार्यान्वित; RTGS, NEFT सेवांचा शुभारंभ

**लातूर :** लातूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. लातूर ने डिजिटल बँकिंग सेवांच्या दिशेने महत्वपूर्ण पाऊल टाकत स्वतःचा स्वतंत्र IFSC कोड (शाखानिहाय) कार्यान्वित केला असून त्या अंतर्गत RTGS व NEFT सेवांचा चा शुभारंभ नुकताच करण्यात आला. या सेवांचा शुभारंभ बँकेच्या लातूर येथील मुख्य कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमातून उद्घाटक ललितभाई शाह, प्रा. शिवराज मोटेगावकर सर व रमेश राठी यांच्या हस्ते करण्यात आला.

या प्रसंगी बँकेचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप राठी, अध्यक्ष आकाश राठी, उपाध्यक्ष सी.ए. लक्ष्मीरमण मालू, बँकेच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, रामबिलास लोया, दिलीप माने, व्यंकटराव गर्जे, प्रदीप बेद्रे, सी.ए. महेश तापडिया, चंद्रशेखर वडजे, श्रीमती रत्नमाला आंभोरे, सौ. शोभाजी वारद मॅडम, रमेश भुतडा, चांदकरण लड्डा यांच्या सह बँकेचे व्यवस्थापकीय संचालक नवनीत भंडारी, कार्यकारी संचालक सी.ए. नरेश सूर्यवंशी तसेच, महाव्यवस्थापक सत्यनारायण खटोड तसेच अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थापक अध्यक्ष प्रदीप राठी यांच्या दूरदृष्टीतून सुरू झालेली ही बँक आज १४ जिल्ह्यांमध्ये २४ शाखांद्वारे कार्यरत असून सुमारे १३४० कोटींचा व्यवसाय करत आहे. स्वतःचा स्वतंत्र शाखानिहाय IFSC कोड (LUCB0000001 Vo LUCB0000025) द्वारे मिळणाऱ्या या सेवेच्या माध्यमातून ग्राहकांना देशभरात त्वरित व सुरक्षित निधी हस्तांतरणाची सुविधा उपलब्ध होणार आहे. कार्यक्रमाच्या शेवटी उपाध्यक्ष सी.ए. लक्ष्मीरमण मालू यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### 'जागेवरच निवड संधी' या मोहिमेअंतर्गत रोजगाराची संधी

**लातूर :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडीत दीनदयाल उपाध्याय जागेवरच निवड संधी (प्लेसमेंट ड्राईव्ह)चे शुक्रवार, १३ मार्च, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथे आयोजित करण्यात आले आहे.या रोजगार मेळाव्यात नामांकित आस्थापना, उद्योजक सहभागी होणार आहेत. या आस्थापनेमध्ये दहावी, बारावी, कोणतीही पदवी, पदव्युत्तर पदवी, आय.टी.आय., डिप्लोमा, तसेच इतर शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवारांना सहभागी होता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी शुक्रवार, १३ मार्च, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तंत्र प्रशाला केंद्र, जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालया समोर, लातूर येथे स्वखर्चाने मुलाखती करीता आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे, स्वत:चा रिझ्युम, बायोडाटा, पासपोर्ट फोटो इ. (तीन प्रती) सह उपस्थित रहावे, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, लातूर यांनी केले आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेवानिवृत्त जयंती समितीच्या अध्यक्षपदी बलभीमराव कोथिंबीरे यांची निवड

**लातूर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर सेवानिवृत्त जयंती समितीच्या अध्यक्षपदी संस्था चालक तथा सेवानिवृत्त संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष प्रा, बलभीमराव कोथिंबीरे यांची निवड करण्यात आली, डॉ,बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघ लातूर ची बैठक संपन्न झाली याच बैठकीत वरील निवड करण्यात आली.



बैठकीच्या अध्यक्षस्थानी बी, बी, गायकवाड हे होते, जयंती कार्यकारिणी खालील प्रमाणे निवडण्यात आली, अध्यक्ष प्रा, बलभीमराव कोथिंबीरे, उपाध्यक्ष प्रा, शंकर सोनवणे, माणिकराव पवार, विनायक बोरीकर, मोहन कांबळे सेलूकर, प्रा,डॉ, बाळासाहेब झरीकर, सचिव प्रा, एस, टी, मस्के, सह सचिव प्रा, डी, टी, सूर्यवंशी, बी, बी, गायकवाड, प्रा, देविदास शिंदे, अंकुश रोडे, रमेश श्रृंगारे, संघटक प्रा, विजयकुमार श्रृंगारे, सह संघटक एस, एस, धसवाडीकर, ए, बी, कांबळे, रमेश हणमंते, डी, एन, कांबळे, कोषाध्यक्ष लक्ष्मण धोत्रे, सह कोषाध्यक्ष एम, एम, माकणीकर, देगलूरकर, प्रमुख सल्लागार प्रा, अनंत लांडगे, डॉ, सुधाकर गुळवे, पी, एस, कांबळे, इंजि, ए, आर, लामतुरे, एन, डी, गायकवाड, अभिमन्यू सवई, डी, एस, साठे, प्रा, एस, टी, मस्के यांनी आभार मानल्या नंतर बैठक संपली.

# मनपा काँग्रेसच्या ताब्यात देऊन चुकलो की काय?

## मनपाच्या पहिल्या सर्वसाधारण सभेतील प्रकार पाहून लातूरचा सुजाण मतदार संभ्रमात..!





**तभा वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**

**लातूर, दि. १२ मार्च : लातूर शहर महानगरपालिकेच्या पहिल्या वहिल्या सर्वसाधारण सभेत एकंदर जे काही घडले, ते समस्त लातूरकरांपर्यंत पोहोचलेही . दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्यावरील अतीव प्रेमापोटी मतदारांनी राज्यात आणि देशात भाजपाची सत्ता असतानाही मनपाच्या सत्तेच्या चाव्या आ. अमित देशमुखांच्या अर्थात काँग्रेसच्या ताब्यात दिल्या. परंतु प्रदीर्घ कालखंडानंतर होणाऱ्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत घडलेल्या प्रकारांवरून लातूरचा सुजाण मतदार या बाबतीतील आपला निर्णय चुकला की काय ? या संभ्रमात असल्याचे निदर्शनास येत आहे. पुढील पाच वर्षात लातुरात काय होणार आहे ? याची शितावरून भाताची परीक्षाही केली गेल्याचे स्पष्ट दिसून आले.**

कधीकाळी लातूरने राज्याला - देशाला दिशा देणारे नेतृत्व प्रदान केले आहे. त्याच लातूरमधील राजकीय वातावरण आजमितीस पूर्णतः गचाळ झाल्याचे पावलोपावली पाहावयास मिळते. तत्वाचे राजकारण आता जवळपास कालबाह्य झाले असून त्याची जागा आता ' कमिशन' - 'टक्केवारी' ने घेतल्याचे बोलले जात आहे. कधीकाळी अशा गोष्टी झाल्या तरीही त्याची वाच्यता करण्याचे धाडस फारसे कोणी करत नसत. ज्या गोष्टींशी आपला संबंधच नाही, त्यावर चर्चा करण्याचे टाळले जात असे. आज सामान्य नागरिक उघड उघड एखाद्या नेत्याबद्दल - राजकीय पदाधिकाऱ्याबद्दल यासंदर्भात जाहीर तथा खाजगीत बोलताना आढळून येतात. आता सोशल मिडीयाच्या नावाखाली काहीही केले जात असल्याचे दुर्दैवाने पाहण्याची वेळ येऊन ठेपली आहे. नको त्या गोष्टींना महत्व दिले जात असल्यानेही सध्यस्थितीत तसे घडत असावे, अशी चर्चाही केली जाते.

नुकत्याच पार पडलेल्या लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत राज्यात सगळीकडे भाजपने आघाडी घेतलेली असतानाही लातूरमध्ये भाजपला अनपेक्षित पराभवाचा सामना करावा लागला. लातूर मनपात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळाले. लातुरात भाजपासाठी वातावरण अगदी अनुकूल असतानाही काही कारणांमुळे त्यात बदल झाला. थोडक्यात, मनपा निवडणुकीपूर्वी पूर्ण बहुमताच्या जवळ असलेली भाजप अचानकपणे बॅकफूटवर गेली. याकामी काहींनी झारीतील शुक्राचार्यांची भूमिकाही अगदी प्रामाणिकपणे बजावल्याचे सर्वज्ञात आहे. तो विषय तूर्तास याठिकाणी चर्चिला जाणे अपेक्षित नाही. लोकांनी आ. अमित देशमुख यांच्यावर आपले जीवापाड प्रेम आहे, म्हणूनही काँग्रेसच्या हाती मनपाची सूत्रे दिलेली नाहीत, हेही वास्तव आहे. यामध्ये एक बाब निश्र्चितच मान्य करावी लागेल की, मनपा निवडणुकीच्या विजयासाठी भाजपचे स्थानिक तसेच प्रदेश पातळीवरील अनेक नेते लातुरात येऊन गेले. भाजपच्या तुलनेत काँग्रेसचे फार कमी नेते प्रचाराला आले. काँग्रेसच्या प्रचाराची धुरा एकट्या अमित देशमुखांनी सक्षमपणे पेलली. त्यामुळे एकंदर राजकीय परिस्थितीत त्यांच्याकडे मजबूत नेतृत्व देण्याची क्षमता आहे, हे पुनःश्च एकदा अधोरेखित झाले आहे.

मनपात स्पष्ट बहुमत मिळाल्याने येथील सर्व पदाधिकारी निवडण्याचे सर्वाधिकार अर्थातच काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाने आ. अमित देशमुख यांना दिले होते. त्याप्रमाणे त्यांनी पदाधिकारी निवडलेही. मनपा पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ आता कुठे सुरु झाला आहे. मनपाची पहिली सर्वसाधारण सभा मंगळवारी पार पडली. ही सभा कामकाजापेक्षा अन्य कारणांनीच अधिक गाजली. मनपातील काँग्रेसच्या सत्ताधारी सदस्यांनी लातुरात चालू असलेल्या विकास कामांना खीळ घालण्याचा प्रयत्न सुरु केल्याचे एकंदर परिस्थितीवरून निदर्शनास येते. चालू असलेल्या विकास कामांसाठी भाजपच्या पालकमंत्र्यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधींसह सर्व सोपस्कार पूर्ण केले असून कामांनाही सुरुवात झाली आहे. या विकास कामांमध्ये खोडा घातल्याने त्याचे दूरगामी परिणाम मनपाच्या विकास कामावर होणार आहेत. परिणामतः त्याबाबत आ. अमित देशमुख यांनाच जबाबदार धरले जाऊ शकते , हेही खरे आहे. त्यामुळे आ. अमित देशमुखानीच आता आपल्या नगरसेवकांना कोणत्या मुद्द्याला , कधी कशा पद्धतीने विरोध करायचा याचे प्रशिक्षण देणे गरजेचे वाटत आहे. आपला नावलौकिक आणि लातूर मनपाची प्रतिष्ठा कायम ठेवून भाजप सरकारशी, पदाधिकाऱ्यांशी कसे जुळवून घ्यायचे ? याचीही शिकवण नवख्या काँग्रेस नगरसेवकांना देणे आवश्यक असल्याचे दृष्टिपथास येत आहे. काँग्रेस नगरसेवकांना 'अर्थ'प्राप्ती बाबत आत्तापासूनच आक्रमक न होण्याची सूचनाही वेगळ्या भाषेत देणे आवश्यक आहे. कारण हा सर्व प्रकार त्यांना मिळालेय, आम्हाला का नाही ? यावरून सुरु असल्याचे न कळण्याएवढे लातूरकर मुळीच दुधखुळे नाहीत.

कोणत्याही कामाची चांगली सुरुवात अर्धे यश मिळवून देत असते, असे म्हणतात. त्यामुळे लातूर मनपाची पहिली सर्वसाधारण अपयशी झाल्यात जमा आहे. म्हणजे पहिले इंप्रेशन फेल गेले आहे. त्यावरून लातूरच्या सुजाण मतदारांना आपण काँग्रेसच्या हातात मनपाची सत्ता देऊन चुकलो की काय ? अशी शंका वाटताना दिसतेय. लातूरचा सुजाण मतदार त्यामुळे संभ्रमावस्थेत असल्याचे दिसून येत आहे. मतदारांच्या मनातील हा संभ्रम लवकरात लवकर दूर करण्याचे काम आता काँग्रेसला करावे लागणार आहे. लातूरच्या विकासाला कोणत्याही बाबतीत खीळ बसणार नाही, राज्यात - केंद्रात जरी भाजपचे सरकार असले तरी ते सरकार विकास कामाच्या बाबतीत कदापि दुजाभाव करणार नाही याचा आपल्याला विश्र्वास असल्याचे आ. देशमुख यांनी आपल्या मनपा पदाधिकाऱ्यांना पटवून देणे अगत्याचे बनले आहे. अन्यथा मतदारांच्या मनातली हा संभ्रम काही केल्या कमी होणार नाही. पाहू या, मनपाच्या पुढील सभेपर्यंत परिस्थितीत काय बदल होतोय ते.. !

## महिलांसाठी मोफत कर्करोग तपासणी शिबीराची सांगता





**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च :** आंतर राष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने माझे आरोग्य - माझी जबाबदारी या संकल्पनेतून सहकार भारती च्या पुढाकाराने आणि विवेकानंद मेडिकल फाऊंडेशन ड रिसर्च सेंटर; नारीयारी ग्रामभारती; लातूर अर्बन को ऑपरेटिव्ह बॅक लि . यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी आरोग्य जनजाग्रती तसेच मोफत कर्करोग तपासणी शिबीर अष्टविनायक मंदिरातील गणेश हॉल येथे आयोजित करण्यात आले होते.

या शिबीरात एकूण२४४ महिलांनी नोंदणी केले होती पण प्रत्यक्षात१०२ महिलांनी तपासणी करून घेतली. शिबिरासाठी अत्याधुनिक तपासणी सुविधा असलेली व्हॅन उपलब्ध करून देण्यात आली होती.

हे शिबीर यशस्वी करण्यासाठी सहकार भारतीचे जिल्हाध्यक्ष नवनीत भंडारी, महामंत्री नितीन शेटे, संघटन प्रमुख गणेश कवठेकर, सुनील कदम, शाम कापसे, ग्राम भारती च्या वर्षा शेटे, सहकार भारती च्या महिला सह प्रमुख ॲड. मीरा कुलकर्णी, नारीयारी ग्रामभारती. डॉ. मनीषा राऊत, वर्षा शेटे, नगरसेविका शोभा पाटील, संगीता मिरचे, प्रा. कल्पना भटटड, अनुराधा वडवले यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमासाठी नागपूर येथील अंजली मुळे - सहकार भारती चे प्रदेश सहप्रमुख. उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. ऐश्वर्या कुलकर्णी यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन शेटे यांनी तर उपस्थितांचे आभार ॲड. मीरा कुलकर्णी यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी महिला मोठ्या संख्येनी उपस्थित होत्या.

## लातूरचा सुपुत्र वेदांत सास्तुरकर भारतीय सैन्यात 'लेफ्टनंट'पदी विराजमान

### आई पल्लवी आणि वडील किशोर सास्तुरकर यांच्या कष्टाचे चीज

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च :** जिद्द, चिकाटी आणि देशसेवेची ओढ असेल तर यशाला नक्कीच गवसणी घालता येते हे लातूरच्या वेदांत सास्तुरकर याने सिद्ध करून दाखवले आहे. बिहारमधील गया येथील प्रतिष्ठित 'ऑफिसर्स ट्रेनिंग अकादमी' मधून आपले खडतर लष्करी प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून वेदांत भारतीय सैन्य दलात 'लेफ्टनंट' पदी विराजमान झाला आहे. या यशानंतर प्रथमच राघवेंद्र कॉलनी,लातूर मध्ये आगमन झालेल्या वेदांतचे कुटुंबीयांनी आणि कॉलनीतील रहिवासी यांनी अत्यंत उत्साहात आणि भव्य मिरवणुकीने स्वागत केले.



#### आई-वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू

वेदांतचे वडील श्री. किशोर सास्तुरकर आणि आई सौ. पल्लवी सास्तुरकर यांनी आपल्या मुलाच्या या यशासाठी घेतलेल्या कष्टाचे आज चीज झाले. गया (बिहार) येथील दीक्षांत संचलन सोहळ्यात खांद्यावर मानाचे 'स्टार्स' लागल्यानंतर वेदांत जेव्हा आपल्या लातूर शहरात परतला, तेव्हा पालकांनी त्याचे औक्षण करून आणि मिठी मारून स्वागत केले. हा क्षण उपस्थित असलेल्या प्रत्येक लातूरकरासाठी अभिमानाचा ठरला.

वेदांत सास्तुरकर यांचे राघवेंद्र कॉलनी मध्ये आगमन झाल्यानंतर पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजराने परिसर दुमदुमून गेला होता. 'भारत माता की जय' आणि 'वंदे मातरम'च्या घोषणांनी तरुणांमध्ये नवचैतन्य पसरले होते. ठिकठिकाणी रांगोळ्या काढून आणि फुलांचा वर्षाव करून या वीर सुपुत्राचे स्वागत करण्यात आले.

#### OTA गया येथील खडतर प्रवास

भारतीय सैन्यातील अधिकारी होण्यासाठी आवश्यक असणारे शारीरिक आणि मानसिक प्रशिक्षण वेदांतने गया येथील अकादमीत पूर्ण केले. अत्यंत कठीण शिस्त आणि प्रशिक्षणातून निघाल्यानंतर तो आता देशसेवेसाठी सज्ज झाला आहे. माझ्या आई-वडिलांनी दिलेले संस्कार आणि लातूरच्या मातीने दिलेली जिद्द यामुळेच मी इथपर्यंत पोहोचू शकलो, अशा भावना वेदांतने यावेळी व्यक्त केल्या.

## वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाययोजनेसाठी 'पायलट प्रोजेक्ट' चा प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च :** लातूर शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाय योजना करण्यासाठी लातूर जिल्हा पोलीस दल व महानगरपालिका प्रशासनाच्या समन्वयाने गुरुवारपासून 'पायलट प्रोजेक्ट' चा प्रारंभ करण्यात आला आहे.

लातूर शहरात वाढत्या वाहनसंख्येमुळे प्रमुख चौकांमध्ये वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत असून नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. या पार्श्र्वभूमीवर शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुटसुटीत, सुरक्षित व शिस्तबद्ध करण्याच्या उद्देशाने लातूर जिल्हा पोलीस दलाने महानगरपालिका प्रशासन व इतर संबंधित विभागांच्या समन्वयाने वाहतूक कोंडीच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

या अनुषंगाने पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवार दि. १ मार्च २०२६ रोजी लातूर महानगरपालिकेच्या मीटिंग हॉलमध्ये वाहतूक समस्येबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस महानगरपालिका आयुक्त सौ. मानसी मीना, महापौर सौ. जयश्री सोनकांबळे, उपमहापौर डॉ. स्नेहल उटगे, विरोधी पक्षनेते देविदास काळे, प्रादेशिक परिवहनचे विनोद चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) समीरसिंह साळवे, वाहतूक शाखेचे प्रभारी मनोज जिरगे तसेच महानगरपालिका बांधकाम विभाग, आरटीओ कार्यालय, राज्य परिवहन विभाग, अतिक्रमण विभाग व इतर संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान लातूर शहरातील प्रमुख चौकांमध्ये निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीची कारणे, अनियमित पार्किंग, अतिक्रमण, चौकांची रचना, वाहतुकीचा वाढता ताण तसेच वाहतूक व्यवस्थापनातील अडचणी याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी काही प्रमुख चौकांवर पायलट प्रोजेक्ट राबवून सुधारित वाहतूक नियोजनाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सदर निर्णयाच्या अनुषंगाने गुरुवारी सकाळी नऊ वाजता पोलीस व महानगरपालिका प्रशासनाच्या संयुक्त पथकाने पीव्हीआर चौक व छत्रपती शिवाजी चौक येथे प्रत्यक्ष भेट देऊन वाहतूक व्यवस्थेची पाहणी केली. यावेळी चौकातील वाहतुकीचा प्रवाह, वाहनांची



गर्दी होण्याची कारणे, रस्त्यांची रचना, अतिक्रमण, पार्किंग व्यवस्था तसेच सिग्नल व्यवस्थेची आवश्यकता याबाबत सविस्तर निरीक्षण करण्यात आले.

या पाहणीदरम्यान संबंधित विभागांना आवश्यक त्या सुधारणा तातडीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून आजपासूनच पायलट प्रोजेक्टच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीस प्रारंभ करण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत चौकांचे सुयोग्य नियोजन, वाहतूक प्रवाह सुलभ करणे, अतिक्रमणावर नियंत्रण, योग्य पार्किंग व्यवस्था तसेच वाहतुकीचा सुरळीत व सुरक्षित प्रवाह निर्माण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येणार आहेत.

## संक्षिप्त...

### युवा नेते अ‍ॅड. परीक्षित अभिमन्यू पवार यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा




**औसा :** क्रिएटिव्ह फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा औसा मतदारसंघातील युवा नेतृत्व परीक्षित अभिमन्यू पवार यांच्या वाढदिवसानिमित्त अभिमन्यू पवार युवा मित्र मंडळाच्या वतीने वाघुलेवस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व पाणी बॉटल वाटप करुन वाढदिवस साजरा करण्यात आला.

या उपक्रमातून व सामाजिक कार्यातून अनोख्या पद्धतीने आपल्या आवडत्या नेतृत्वाला शुभेच्छा देण्यात आल्या. अभिमन्यू पवार मित्र मंडळाचे अध्यक्ष पंकज धन्वे, केंद्रीय मुख्याध्यापक रमेश गाडे , केंद्रीय विशेष शिक्षक पंढरीनाथ नवले , विकास जानवे, विक्रम वाघुले तथा मित्रमंडळाचे सदस्य ऋषी थोरात, माऊली धन्वे, प्रणव हजारे, टिल्लू वीर, आकाश अवचार उपस्थित होते.तर शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती मंगल येवले यांनी व शाळेतील विद्यार्थ्यांनी परीक्षित पवार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन अभिमन्यू पवार मित्र मंडळाचे आभार मानले .

### सैनिकी शाळा प्रवेश पूर्व परीक्षेत संत ज्ञानेश्वर विद्यालयाचे यश




**अहमदपूर :** येथील संत ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यालयाचे अखिल भारतीय सैनिकी शाळा प्रवेश पूर्व परीक्षेत १६ विद्यार्थी सहावी वर्गाच्या प्रवेशासाठी पात्र झाले आहेत. नॅशनल टेस्टींग एजन्सीच्या वतीने नुकताच निकाल जाहीर करण्यात आला आहे. अत्यंत अवघड मानल्या जाणाऱ्या परीक्षेत ही शाळेच्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग भरारी घेतली आहे.

त्यामध्ये वरद महालिंग ढगे २८२ गुण, श्लोक सचिन बुजारे २६८, राज रमेश पवार २५५, वैदेही प्रशांत तांदळे २५३, यश रमेश पवार २५०, नरेंद्र बालाजी केंद्रे २४८, वेद लक्ष्मण ब्यागलवार २४५, अस्मिता श्रीकृष्ण तांदळे २४५, अफीफा आशिफ पठाण २४१, समर्थ महालिंग धुळे २१०, जिजाऊ संदीप ढोकाडे २०७, विराज तुकाराम सूर्यवंशी २०५, स्वराज संतोष कदम १९९, राजाऊ संदीप ढोकाडे, सत्यम ज्ञानोबा कदम, शिवानी ज्ञानोबा कदम यांनी उत्तम यश मिळवले आहे.सदरील विद्यार्थ्यांना शबाना शेख,भानूदास माने,त्रिगुणा मोरगे,मीर सय्यद, जहांगीर मंगरूळे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थाध्यक्ष मा.गणेश दादा हाके पाटील, संस्था सचिव प्राचार्या रेखाताई हाके-तरडे, उपाध्यक्ष एडवोकेट मानसी हाके, मुख्याध्यापक आशा रोडगे, मुख्याध्यापक मीना तोवर सह पालक सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन व कौतुक केले आहे.

### टीव्ही व मोबाईल हे दोन मानवाचे मोठे राक्षस आहेत : डॉ. सुनिता ताई कामदार



**शिरूर अनंतपाळ :** येथील ग्रामदैवत श्री अनंतपाळ मंदिरात आठ मार्च रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शिरूर अनंतपाळ येथे महिला दिन उत्साहात साजरा झाला हक्क महादेवी मंडळाच्या प्रमुख श्रीमती शिवाबाई शिवने कार्यक्रमाच्या अध्यक्ष होत्या. २०२६ हे वर्ष Give to Gain असून या देशातील महिला सक्षम आणि विकसित झाल्या पाहिजेत. महिलांची शारीरिक, मानसिक, भावनिक, आर्थिक वृद्धी करावयाचा असा या उपक्रमाचा उद्देश आहे. असे मत महिला समन्वय विभागाच्या संयोजिका डॉ. कामदार मॅडमनी व्यक्त केल्या.तसेच समिती विभाग प्रचारक कल्याणी ताई पाठक यांनी पंचीकरण हा विषय घेऊन 'स्वबोध' यामध्ये सात 'स्व 'ची ओळख सखोलपणे करून दिली. हिंदू धर्म व हिंदू म्हणून राहायचे याचा नागरिकांनी विचार करावा अशा भावना व्यक्त केल्या. सौ जगदेवी सुगावे ताई यांनी आचरण, कृती, संस्कार, कुटुंब यावर आपले मत व्यक्त केले. तेजस्वी सुगावे यांनी स्त्री शिकली पाहिजे, स्त्रीचा समाजात सन्मान व्हावा, स्वतः परिवर्तन करावे असे मत मांडले. प्रस्तावना श्रीमती सुरेखा उस्तुर्गे यांनी केल्या. प्रस्तावनेमध्ये हा कार्यक्रम आयोजित करण्या पाठीमागची भूमिका व महिला दिनाचे महत्त्व विशद केल्या. सुत्रसंचलन श्रीमती कंदले साधनाताईंनी केल्या तर आभार श्रीमती विजयाताई पारशेट्टे यांनी केल्या. सौ. सुनीता सांगवे, हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ. माधुरी बिराजदार यांचे खूप सहकार्य लाभले. या कार्यक्रमासाठी असंख्य महिलांची उपस्थिती दिसून आली.

# दोन दशकापासून बंद असलेला नळेगावचा 'जय जवान जय किसान' साखर कारखाना सुरू करा

## जय जवान जय किसान साखर कारखाना सुरु करण्याची शेतकऱ्यांची मागणी, आमदार अभिमन्यू पवार यांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. १२ मार्च :** चाकुर तालुक्यातील नळेगाव येथील गेल्या वीस वर्षापासून बंद असलेला जय जवान जय किसान सहकारी साखर कारखाना तात्काळ सुरू करण्यात यावा,अशी मागणी शेतर्कयांनी आमदार अभिमन्यू पवार यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे केली आहे.

चाकुर तालुक्यातील नळेगाव येथील सहकारी साखर कारखाना अहमदपूर, चाकूर, शिरूर अनंतपाळ आणि उदगीर या परिसराच्या मध्यभागी असून या भागातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या कारखान्याचे दहा हजारांहून अधिक सभासद असून हजारो शेतकरी व कामगारांचे जीवन या कारखान्यावर अवलंबून आहे. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून कारखाना बंद असल्यामुळे या भागातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

कारखाना परिसराच्या चारही बाजूंनी पाण्याचे स्त्रोत उपलब्ध असल्यामुळे या भागात मोठ्या प्रमाणात ऊस उत्पादन घेतले जाते. लाखो टन ऊस उपलब्ध असतानाही साखर कारखाना बंद असल्यामुळे या परिसरातील शेतकऱ्यांना हद्दीबाहेरच्या कारखान्याला ऊस पाठवावा लागत आहे. त्यामुळे वाहतूक खर्च वाढत असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याची भावना यावेळी शेतर्कयांनी व्यक्त केली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कारखाना पुन्हा सुरू करण्याबाबत सकारात्मक भूमिका घेत शब्द दिला असल्याचे शेतकरी प्रतिनिधींनी सांगितले. त्या अनुषंगाने शासनस्तरावर तात्काळ पाठपुरावा करून कारखाना सुरू करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

चंद्रशेखर तांदळे, तुकाराम पारवे, सूर्यकांत चव्हाण, मदन गायकवाड, दयानंद काळे, शिवाजी पाटील, कमलाकर सूर्यवंशी, रामकिसन कातपुरे, तुकाराम नरवाडे, श्रीमंत शेळके यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी सभासद यावेळी उपस्थित होते.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत स्वयंशासन दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. १२ मार्च :** तालुक्यातील सत्तर धरवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत काल स्वयंशासन दिन साजरा करण्यात आला.

या शाळेत आनंद पुंड हे मुख्याध्यापक म्हणून रुजू झाल्यापासून ग्रामीण भागातील या शाळेत विविध उपक्रम साजरे करण्यात येतात हे विशेष हा दिन साजरा करताना विद्यार्थ्यांना एक दिवस जबाबदारी काय असते शिवाय शाळा व्यवस्थापन समिती मुख्याध्यापक. विद्यार्थी आणि पालक यांच्या शी समन्वय कसा साधला जातो हे समजते. या एका दिवसाचा प्रत्यक्ष अनुभव पुढे आयुष्यभर त्यांच्या कामाला येतो म्हणून शाळेत स्वयंशासन दिन साजरा केला जातो

यादिवशी मुख्याध्यापक म्हणून कुमारी आरती अशोक ढगे, उप मुख्याध्यापक म्हणून कुमारी दीक्षा कुंदन भालेराव, यांनी कामकाज पाहिले तर वैष्णवी कांबळे, देवयानी बंडगर, प्राजक्ता बंडगर, शंतनू राठोड यांनी शिक्षकाची भूमिका पार पाडली.

मध्यंतरामध्ये स्वादिष्ट भोजनाचा आनंद विद्यार्थ्यांनी लुटला. एक दिवस शाळ ताब्यात घेऊन कामकाज बघितल्या बद्दल विद्यार्थ्यांनी आपले शाळेविषयी . शिक्षकांविषय मनोगत व्यक्त केले. सात वर्षापासून ते शाळेविषयीचे नाते व शिक्षका विषयीचे प्रेम विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक आनंद पुंड सर, प्रशांत शिंदे सर, सिद्राम खामकर सर, श्रीमती मंजुषा राठोड मॅडम इत्यादी उपस्थित होते. यादिवशी गावातील नागरिकांनी आपले एक दिवसाचे शिक्षक कामकाज कसे करत आहेत हे बघण्यासाठी शाळेत भेटी दिल्या.

### यशवंतराव चव्हाण हे राजकारणातील सुसंस्कृत व्यक्तिमत्व होते -प्राचार्य रामकिशन मांजरे

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. १२ मार्च :** छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. या उपक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. रामकिशन मांजरे होते. यांनी यशवंतराव चव्हाणांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. डॉ. मांजरे यांनी यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकताना म्हटले की, ते स्वतंत्र महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार होते. यांनी संयुक्त महाराष्ट्राचा पाया रचला. सहकार, कृषीक्षेत्र, शिक्षण, रोजगार या क्षेत्रात यांनी भरीव कार्य केले. पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास साधला. यांनी भारताच्या राजकारणात संरक्षणमंत्री, गृहमंत्री, विदेशमंत्री उपपंतप्रधान, वित्त आयोगाचे अध्यक्ष अशी पदे भूषविली. ते उत्तम साहित्यिक व रसिक देखील होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयंती समिती प्रमुख तथा मराठी विभागप्रमुख डॉ. सुरेश शिंदे यांनी केले. आभार डॉ. व्ही. के. भालेराव यांनी मानले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक वृंद, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम जयंती समितीच्या वतीने घेण्यात आला.

## सम्राट चंद्रगुप्त मौर्य स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. १२ मार्च :** सम्राट चंद्रगुप्त मौर्य इंटरनॅशनल स्कूल, रुद्धा ता. अहमदपूर येथे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरा झाले. या कार्यक्रमासाठी श्री.गणेश शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष गणेश दादा हाके पाटील हे संमेलनाचे अध्यक्ष होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मंडळाच्या सचिव रेखाताई हाके तसेच अहमदपूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष अ‍ॅड. स्वप्निल व्हते, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त दत्ता गलाले, संत ज्ञानेश्र्वर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आशाताई रोडगे, किलबिल स्कूलचे संचालक ज्ञानोबा भोसले, नगरसेवक निखिल कासनाळे, नगरसेविका उषाताई देवकते, हनमंत देवकत्ते, नाथराव केंद्रे, राम तत्तापुरे व सम्राट चंद्रगुप्त मौर्य स्कूल चे संचालक कुलदीप हाके पाटील व संचालिका सौ. शिवालिका कुलदीप हाके पाटील उपस्थित होत्या.

मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाचा श्री गणेशा झाला. मान्यवरांचा सन्माना करण्यात आला. संचालक कुलदीप हाके पाटील यांनी प्रस्ताविक केले. मान्यवरांच्या मनोगता नंतर अध्यक्षीय समारोप गणेशदादा हाके पाटील यांनी केला. यानंतर शालेय क्रीडा स्पर्धा व वविध स्पर्धा परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला.

विद्यार्थ्यानी विविध सांस्कृतिक नृत्यांची मेजवानी, देखावे, थोर पुरुषांच्या जीवनातील विविध प्रसंग मंचावरती कल्पकतेने सादर केले. पालकांनी या सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद घेतला. या कार्यक्रमामध्ये विविधतेने नटलेल्या भारतीय संस्कृतीचे दर्शन पालकांना घडले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन गणेश कोईलवाड यांनी केले व आभार शाळेचे मुख्याध्यपक आर. हरीदास यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचेही मोलाचे योगदान लाभले.

## जागतिक महिला दिनानिमित्त सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक व कामगार क्षेत्रातील महिलांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा**

**जळकोट, दि. १२ मार्च :** महाराष्ट्र दलित तरुण संघटना महाराष्ट्र राज्य शाखा अतनूर जळकोट तालुका वतीने व वसुंधरा महिला मंडळ, जिजामाता महिला मंडळ अतनूर, बसवेश्वर व गंगामाता महिला बचत गट अतनूर, महाराष्ट्र प्रदेश असंघटित कामगार व कर्मचारी काँग्रेस महाराष्ट्र राज्याचे वतीने, राष्ट्रीय कामगार तथा राष्ट्रीय मजदूर संघ, बहुजन कामगार संस्था आणि महिला कामगार मजदूर संस्थेच्या, महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा अतनूर यांच्या वतीने रविवार दि. ८ मार्च २०२६ रविवार व ९ मार्च २०२६ सोमवार रोजी श्री.काशी विश्वनाथ महादेव मंदिर अतनूरच्या सभागृहात दुपारी ३ वाजता बचतगट, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कामगार कल्याणकारी मंडळ तालुका अधिकारी व महिला बचत गट, महसूल विभाग, शासकीय व निमशासकीय कार्यालये राजकीय क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात अतनूर येथील आजोळच्या कार्यतत्पर, अतिउत्कृष्ट कर्तुत्वान महिला तहसीलदार सौ.मनिषा बाबूराव भगत ( गायकवाड), महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सहाय्यक कामगार आयुक्त मंगेश रा. झोले, सरकारी कामगार अधिकारी अविनाश अ. देशमुख, जळकोट कामगार अधिकारी व दुकाने निरीक्षक श्रेणी-१ च्या अमरावती येथून बदली वर आलेल्या नवनियुक्त सौ.अर्चनाताई कांबळे याचा सत्कार सोहळाही पार पडला. ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय असंघटित कामगार व कर्मचारी काँग्रेस महाराष्ट्र राज्याचे प्रदेश उपाध्यक्ष एस.जी.शिंदे-पाटील अतनूरकर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे क्षेत्रीय व्अयवस्थापक अधिकारी वानखेडे, अतनूर शाखेचे शाखाधिकारी महेश प्रकाशराव ढेकाळे, बँक अधिकारी राहुल राजेंद्र चव्हाण, रोखपाल अक्षयकुमार बागडी, शासननियुक्त ग्राहक संरक्षण परिषदेचे अशासकीय सदस्य बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ.मायाताई पाटील, जिजामाता महिला मंडळ अतनूरच्या अध्यक्षा श्रीमती शकुंतला बाबर, वसुंधरा महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ.रूक्मिणी पांडुरंग सोमवंशी, सचिव सौ.संध्या बालासाहेब शिंदे अतनूरकर, बँक कर्मचारी हाणमंत कापडे, बसवेश्वर महिला बचत गटाच्या नागीण स्वामी, गंगामाता महिला बचत गटाच्या बबिता बाबर उपस्थित होते.

### लाल बहादुर शास्त्री प्राथमिक शाळेत यशवंतराव चव्हाण जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. १२ मार्च :** येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई द्वारा संचलित लाल बहादुर शास्त्री प्राथमिक विद्यालयात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे,प्रमुख मार्गदर्शक म्हणून माधव केंद्रे तर,प्रमुख पाहुणे म्हणून विभाग प्रमुख सुधाकर पोलावार व श्रीमती सुरेखाबाई कुलकर्णी उपस्थित होते.सर्व मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलन करण्यात आले.सर्व मान्यवरांचे पुष्प देऊन शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक माधव केंद्रे यांनी यशवंतराव चव्हाण हे दूरदृष्टीचे,कर्तबगार आणि लोकाभिमुख नेते होते.त्यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी शिक्षण, शेती, उद्योग आणि सहकार क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांच्या नेतृत्वामुळे महाराष्ट्र प्रगतीच्या मार्गावर पुढे गेला.अध्यक्षीय समारोपपर भाषणात मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे यांनी विद्यार्थ्यांना यशवंतराव चव्हाण यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन प्रामाणिकपणे शिक्षण घ्यावे, समाजासाठी उपयुक्त नागरिक बनावे आणि देशाच्या विकासासाठी योगदान द्यावे असे आवाहन केले.

## मनुष्याच्या हृदयातील मळ दोष काढून भक्तीची ज्योत प्रज्वलित करण्याकरिता हा नाथांचा उत्सव : ह.भ.प. श्री. बन गुरुजी

**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. १२ मार्च :**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील मौजे तळेगाव (बोरी) येथे नाथ षष्ठी निमित्ताने किर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. मनुष्याच्या हृदयातील मळ दोष काढून भक्तीची ज्योत प्रज्वलित करण्याकरिता हा नाथांचा उत्सव आहे औसेकर घराण्याची परंपरा आणि ऊर्जा एवढी महान आहे की त्यांची कृपा झाल्यास सामान्य मुका मानुसही वेद म्हणू शकेल असे उद्गार ह.भ.प. श्री. बन गुरुजी यांनी काढले.

श्री तुकाराम बीज दिवशी रात्रीच्या कीर्तनात तळेगाव (बोरी)येथील नाथ मंदिरात ते बोलत होते.

साडेसातशे वर्षा नंतर देखील ज्याला अवाक्षर कळत नाही निरक्षर आहे त्याच्या तोंडी तुकोबांचा गाथा मुखद्गत आहे. तर संतश्रेष्ठ माऊलींनी रेड्यावर कृपा केली.

त्याचा उद्धार केला त्याच्या मुखातून वेद बोलविले आज त्याची समाधी गावात आहे अन्न जसे खाल्लयाशिवाय त्याची चव कळत नाही तसेच सद्गुरूंच्या सानिध्यात आल्याशिवाय त्यांचे महात्म्य समजत नाही दास्यत्व एकनिष्ठ भक्तीला महत्त्व आहे ज्यांनी परस्त्री मातेसमान आणि संपत्ती सोने नाणे माती समान मानले त्यांनाच संत म्हणावे ज्यांच्या ताब्यात इंद्रिय आहेत ते संत व जे इंद्रियांच्या अधिन आहेत ते प्रापंचिक असे विवेचन करून उगाच नाही तर प्रचिती लागते, तशी अनुभूती या घराण्यात सत्पुरुषांनी दिली आहे. पंढरपुरामध्ये परमात्मा विठ्ठलाच्या शेल्यास आग लागली आणि आयुष्याच्या नाथ मंदिरात




मल्लिनाथ यांनी आपले हात जोडून ती विझवली हे सामर्थ्य केवळ संतांचे अशा परंपरेचा हा उत्सव व त्याचे सानिध्य याकरता आपले भाग्य आणि पुण्याई मोलाची ठरते उत्सव महोत्सव नामसंकीर्तन भजन चक्रीभजन आणि गुरु संगतीने जीवाला शिवत्व प्राप्त होते. असे सुंदर निरूपण श्री बनगुरुजी यांनी केले.

किर्तन पूर्ण झाल्यानंतर बन गुरुजी यांनी अत्यंत भक्तीने भावनिक होऊन सद्गुरु श्री गुरुबाबा महाराज औसेकर आणि सद्गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर या दोघांनाही साष्टांग लोटांगण घालून आपल्या आनंदाश्रूंना वाट मोकळी करून दिली. समाजाची विस्कटलेली घडी आणि मनाची अस्थिरता घालून त्याच्या जीवनात सुख समाधान प्रस्थापित करण्याचे सामर्थ्य या सद्गुरुहृदयात आहे त्यांच्यामुळे आम्ही संप्रदायात सेवा करतो अशी स्पष्ट कबुली बन गुरुजींनी दिली.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ग्रा.पं. भ्रष्टाचाराची तक्रार केल्याचा रागातून एकास मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मार्च -**

ग्रामपंचायतीतील कथित भ्रष्टाचाराबाबत तक्रार केल्याच्या कारणावरून एका नागरिकाला शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी व काठीने मारहाण केल्याची घटना वाघोली येथे घडली. या प्रकरणी धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि.२ मार्च रोजी सकाळी सुमारे १०.४५ वाजता वाघोली ते सांजा रोडलगत वाघोली येथे फिर्यादी अनिल हरिबा धुमाळ (वय ५६, रा. वाघोली ता. जि. धाराशिव) यांना ग्रामपंचायतीच्या भ्रष्टाचाराबाबत तक्रार का करता, या कारणावरून काही जणांनी एकत्र येत शिवीगाळ केली. यावेळी आरोपींनी लाथाबुक्यांनी तसेच स्प्रिंकलरचा पाईप व काठीने मारहाण करून त्यांना जखमी केले. तसेच त्यांच्या मोटारसायकलवर दगड मारून नुकसान केले आणि जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी अमरचंद नानासाहेब खडके, रोहीत बालाजी मगर, मनोज घमाजी शेंडगे, अर्जुन बब्रुवान खडके, प्रदीप बब्रुवान खडके आणि सुलभा संजय खडके (सर्व रा. वाघोली, ता. जि. धाराशिव) यांच्याविरुद्ध धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### दिल्लीतील हत्याकांडाच्या निषेधार्थ नळदुर्गमध्ये निवेदन

**नळदुर्ग, दि.१२ मार्च -**

दिल्ली येथील उत्तमनगर परिसरात होळीच्या दिवशी हिंदू खाटीक समाजातील तरुण बुटोलिया याची निर्घृण हत्या झाल्याच्या घटनेचा निषेध करत नळदुर्ग शहर सकल हिंदू समाजाच्या वतीने अप्पर तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, या घटनेमुळे देशभरातील हिंदू समाजामध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून अशा घटनांमुळे समाजात असुरक्षिततेची भावना वाढत आहे. त्यामुळे या हत्याकांडातील सर्व आरोपींवर तातडीने व कठोर कारवाई करून पीडित कुटुंबाला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर गणेश मोरडे, विजय ठाकुर, रवी पिस्के यांच्यासह सकल हिंदू समाजातील अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनाची प्रत नळदुर्ग पोलिस ठाण्यातही देण्यात आली आहे.



### एकनाथ षष्ठीनिमित्त तुळजापूरात प्रवचन

**तुळजापूर, दि.१२ मार्च -**

लोखंडाला सोने करण्याची क्षमता जशी परिसामध्ये असते, त्याचप्रमाणे कलियुगातील बद्ध जीवांचा उद्धार करण्याची क्षमता फक्त हरिनामामध्येच असल्याचे प्रतिपादन श्रीमान प्रजापती विष्णुदास (इस्कॉन, धाराशिव) यांनी केले. जिजामाता नगर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात एकनाथ षष्ठीनिमित्त आयोजित प्रवचनात ते बोलत होते. यावेळी त्यांनी संत एकनाथ महाराजांच्या जीवनातील प्रसंग सांगत भक्ती, शांतता आणि हरिनामाचे महत्त्व स्पष्ट केले. एकनाथ महाराज ज्ञानी असूनही अत्यंत शांत स्वभावाचे होते. त्यांच्या अंगावर एका इसमाने १०८ वेळा थुंकले तरी त्यांनी राग न करता संयम ठेवला. शेवटी त्या व्यक्तीने लाजून महाराजांची क्षमा मागितली. त्यामुळेच त्यांना 'शांतीब्रह्म' असे संबोधले जाते, असे त्यांनी सांगितले. या प्रवचनाला सुमारे १०० ते १२५ भाविक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी संकीर्तन व महाप्रसादाने सांगता करण्यात आली.



### बोरी येथे राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षण उपक्रम

**तुळजापूर, दि.१२ मार्च -**

तालुक्यातील बोरी येथे राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षण उपक्रमांतर्गत जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) धाराशिवच्या उपप्राचार्य श्रीमती शोभा मिसाळ यांनी विद्यार्थिनी व महिलांना आत्मरक्षणाबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते तथा वंचित बहुजन आघाडीचे नेते मिलिंद रोकडे यांनीही मनोगत व्यक्त केले. शिक्षणाधिकारी रविंद्र खंदारे यांच्या सूचनेनुसार कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाला सरपंच श्रीकांत हावळे, उपसरपंच नारायण जानराव, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष नागेश जानराव, श्रीकांत जाधव, जीवन कदम यांसह ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक चव्हाण यांनी केले.



### कानेगाव जि.प. शाळेत 'स्वयंशासन दिन'

**लोहारा, दि.१२ मार्च -**

लोहारा तालुक्यातील कानेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नुकताच 'स्वयंशासन दिन' उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी एक दिवसासाठी शिक्षक व प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळत नेतृत्वगुणांचे दर्शन घडवले. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी परिपाठाने झाली. या दिवशी शाळेच्या मुख्याध्यापकपदाची धुरा यश मोरे यांनी सांभाळली. पर्यवेक्षक म्हणून सिद्धी कदम, केंद्रप्रमुख म्हणून श्रद्धा कदम, विस्तार अधिकारी म्हणून प्रगती महानवर, शिक्षणाधिकारी म्हणून श्रवण शित्रे तर परिचर म्हणून कैलास गोरे यांनी काम पाहिले.

### २०४ प्रकरणांत १.७८ लाख दंड वसूल

**धाराशिव, दि.१२ मार्च -**

धाराशिव शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांकडून शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध विशेष कारवाई करण्यात आली. दि. ११ मार्च रोजी करण्यात आलेल्या या मोहिमेत एकूण २०४ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली असून, त्यांच्याकडून १,७८,५०० इतके तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र गडकोट विकास महामंडळ स्थापन करा

## तुळजापूरात या मागणीसाठी किसन चव्हाण यांचे आमरण उपोषण...

## आठव्या दिवशीही प्रशासनाचे दुर्लक्ष...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मार्च -**

गडकोट विकास महामंडळ स्थापन करावे या प्रमुख मागणीसाठी जागर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किसन चव्हाण यांनी ५ मार्चपासून तुळजापूर येथील तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाचा आठवा दिवस उलटूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस दखल घेण्यात आलेली नसल्याने शिवप्रेमींमध्ये तीव्र संतापाची लाट पसरली आहे.

महाराष्ट्राची भूमी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली आहे. छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज तसेच असंख्य मावळ्यांनी शौर्य गाजवत स्वराज्य उभे केले आणि राष्ट्राला स्वाभिमान दिला. त्यांच्या पराक्रमाचे प्रतीक असलेले गडकिल्ले आज दुर्लक्षामुळे शेवटच्या घटका मोजत असल्याची भावना शिवप्रेमींमध्ये व्यक्त होत आहे. गडकिल्ल्यांचे जतन आणि संवर्धन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे. जागर प्रतिष्ठानच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून गडकिल्ले संवर्धन मोहीम राबवून दुर्गसंवर्धनाचे कार्य केले जात आहे. मात्र शासनाच्या पातळीवर ठोस धोरण आणि स्वतंत्र यंत्रणा नसल्याने हे कार्य प्रभावीपणे होत नसल्याचे सांगितले जात आहे.

त्यामुळे स्वराज्यातील गडकिल्ले, मावळ्यांच्या समाध्या, जन्मस्थळे, ऐतिहासिक घटनांची साक्ष देणारी ठिकाणे आणि गढ्या यांच्या संवर्धनासाठी राज्य सरकारने गडकोट विकास महामंडळ स्थापन करावे, अशी मागणी जागर प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी विविध लोकप्रतिनिधींमार्फत तसेच निवेदनांच्या माध्यमातून शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे.

याच पार्श्वभूमीवर गडकिल्ल्यांवरील अतिक्रमणे तात्काळ हटवावीत, प्रत्येक गडावर कायमस्वरूपी भगवा ध्वज फडकवण्यात यावा, छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनी प्रत्येक गडावर शासकीय पातळीवर स्वराज्य ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात यावे, तसेच वाईन शॉप, बिअर बार किंवा दारूच्या दुकानांना गडकिल्ले व महापुरुषांची नावे वापरण्यास बंदी घालून आधीपासून असलेली नावे बदलण्यात यावीत, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. या सर्व मागण्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराजांचा मावळा म्हणून गडकिल्ले वाचवण्याच्या उद्देशाने किसन चव्हाण यांनी ५ मार्च २०२६ पासून श्रीक्षेत्र तुळजापूर येथे आमरण उपोषण सुरू केले असून, प्रशासनाने तात्काळ दखल घ्यावी अशी मागणी शिवप्रेमींकडून केली जात आहे.

महाराष्ट्र राज्यात छत्रपती शिवाजी महाराज यांना मानणारे सरकार जर सत्तेवर असेल तर त्यांनी तात्काळ गडकोट विकास महामंडळ स्थापन करायलाच हवे अशी भावना शिवभक्त अजय साळूंके यांनी व्यक्त केली.

### जिल्हाधिकारी कार्यालयात आत्मदहनाचा प्रयत्न; पोलिसांच्या सतर्कतेमुळे अनर्थ टळला

महाराष्ट्रातील ऐतिहासिक गड-कोट किल्ल्यांच्या संवर्धनासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याच्या मागणीसाठी 'जागर प्रतिष्ठान'च्या कार्यकर्त्यांचे आमरण उपोषण सुरू आहे. या आंदोलनादरम्यान बुधवारी एका कार्यकर्त्याने जिल्हाधिकारी कार्यालयातच अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केल्याने एकच खळबळ उडाली. 'जागर प्रतिष्ठान'चे पदाधिकारी आणि कार्यकर्ते गेल्या सात दिवसांपासून उपोषणाला बसले असूनही जिल्हाधिकारी प्रशासनाकडून त्यांच्या मागण्यांची दखल घेतली जात नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. यामुळे संतप्त झालेल्या एका कार्यकर्त्याने कार्यालयातच अंगावर पेट्रोल ओतून काडीपेटी काढत आत्मदहनाचा प्रयत्न केला. मात्र तेथे तैनात असलेल्या पोलिसांनी व उपस्थित नागरिकांनी वेळीच झडप घालत त्याला रोखल्याने मोठा अनर्थ टळला. या घटनेनंतर जिल्हाधिकारी कार्यालयात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, या घटनेमुळे जिल्हाभरात खळबळ उडाली असून गड-कोट किल्ल्यांच्या संवर्धनासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याच्या मागणीबाबत शासन आणि प्रशासन आता कोणता निर्णय घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### अवैध गावठी दारूसह महिलेला अटक

**धाराशिव, दि.१२ मार्च -**

आनंदनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध गावठी दारू विक्रीप्रकरणी पोलिसांनी एका महिलेविरुद्ध गुन्हा नोंदवून २४ लिटर दारू जप्त केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बायडाबाई छगन काळे (वय ६२, रा. इंदिरानगर, धाराशिव, सध्या राहणार काकानगर, सांजा ता. जि. धाराशिव) या दि.११ मार्च रोजी सायंकाळी काकानगर, सांजा येथे अवैध विक्रीच्या उद्देशाने अंदाजे २,४०० रुपये किंमतीची २४ लिटर गावठी दारू जवळ बाळगत असल्याचे आढळून आले.

## विकसित राष्ट्र घडविण्यासाठी प्रत्येकाचे योगदान महत्त्वाचे : देविदास पाठक



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१२ मार्च -**

भारत एक दिवस नक्कीच महासत्ता बनेल, मात्र त्यासाठी देशातील लोकसंख्येची गुणवत्ता वाढणे आवश्यक आहे. विकसित राष्ट्र घडविण्यासाठी प्रत्येकाचे योगदान महत्त्वाचे आहे, असे मत सिनेट सदस्य देविदास पाठक यांनी व्यक्त केले.

तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर येथे गुरुवारी (दि.१२) वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पाठक बोलत होते. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ. मंत्री आडे यांनी प्रास्ताविक केले.

तसेच अर्जुन जाधव यांनी सध्याच्या परिस्थितीत विविध महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या कमी होत असल्याबाबत चिंता व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रा. ज्योतिर्लिंग क्षीरसागर यांनी केले, तर आभार प्रा. क्रांती कदम यांनी मानले.

यावेळी महाविद्यालयाचे एल.एम.सी. सदस्य प्रा. धनंजय लोंढे, आप्पासाहेब पाटील, तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनी व कर्मचारी उपस्थित होते.

## नळदुर्ग न.पा. प्रशासकीय काळातील कामांची चौकशी करा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१२ मार्च -**

नळदुर्ग नगरपालिकेत प्रशासकीय काळात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप नगरपालिकेतील काँग्रेसच्या नगरसेवकांनी केला असून, याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देत सखोल चौकशीची मागणी करण्यात आली आहे. या काळातील कामांची निष्पक्ष चौकशी करण्यासाठी स्वतंत्र विशेष समिती नेमावी, अशी मागणीही करण्यात येत आहे.

नळदुर्ग नगरपालिकेवर जवळपास तीन ते चार वर्षे प्रशासकीय राजवट होती. सध्या नगरपालिकेत लोकनियुक्त नगराध्यक्ष व नगरसेवक कामकाज पाहत आहेत. दरम्यान, काँग्रेसच्या नगरसेवकांनी प्रशासकीय कालावधीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार, मनमानी आणि कामकाजात अनियमितता झाल्याचा आरोप केला आहे. या संदर्भात अनेक गंभीर मुद्दे उपस्थित करण्यात आले असून, धाराशिव हरीत अभियानांतर्गत नगरपालिकेच्या वतीने करण्यात आलेल्या ३० हजार वृक्ष लागवडीचाही यात समावेश असल्याचे सांगितले जात आहे.

तसेच प्रशासकीय कालावधीत विविध विकासकामांमध्ये अनियमितता, नियमभंग तसेच निधीच्या वापरात गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी नागरिकांकडूनही मोठ्या प्रमाणात होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. जर या कालावधीत निधीचा अपव्यय किंवा गैरवापर झाला असेल, तर तो जनतेच्या विश्वासाला तडा देणारा प्रकार ठरेल, अशी भावना व्यक्त होत आहे.

त्यामुळे प्रशासकीय काळात झालेली सर्व विकासकामे, आर्थिक व्यवहार, निविदा प्रक्रिया, खर्चाच्या नोंदी तसेच प्रशासकीय निर्णयांची सखोल चौकशी व्हावी, यासाठी स्वतंत्र व निष्पक्ष विशेष चौकशी समिती नेमावी, अशी मागणी करण्यात येत आहे. या प्रकरणात केवळ काँग्रेसच नव्हे तर नगरपालिकेत सत्तेत असलेल्या भाजपच्या नगरसेवकांनीही पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे. पक्षीय राजकारण बाजूला ठेवून शहराच्या हितासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज असल्याचेही सांगितले जात आहे.

प्रशासकीय कालावधीत उपजिल्हाधिकारी तसेच तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांनी नगरपालिकेचे कामकाज पाहिले होते. या कालावधीत भ्रष्टाचार किंवा कामांमध्ये अनियमितता झाली की नाही, हे स्पष्ट होण्यासाठी निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. चौकशी समितीमार्फत सत्य समोर आल्यास निराधार आरोपांनाही पूर्णविराम मिळेल आणि नगरपालिकेचा कारभार सुरळीत सुरू राहून शहरातील विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## श्री भैरवनाथ निसर्ग मंडळ कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये महिला दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मार्च -**

श्री भैरवनाथ निसर्ग मंडळ कॉलेज ऑफ डी. फार्मसी अँड बी. फार्मसी येथे जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. संस्थेचे संस्थाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमांतर्गत महिला सक्षमीकरण, आरोग्य जागरूकता आणि समाजातील महिलांचे योगदान या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरज ननवरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष नेहा काकडे, डॉ. दिपाली इंगळे तसेच सामाजिक कार्यकर्त्या भाग्यश्री मते यांची उपस्थिती होती. यावेळी महाविद्यालयातील महिला प्राध्यापकांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील महिला प्रतिनिधी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

सूत्रसंचालन प्रा. पठाण फिजा यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. राजेंद्र नागरगोजे यांनी केले.

### तेरणा इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये 'टेकोत्सव - टेक डायजेस्ट' मॅगझिनचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मार्च -**

तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचालित तेरणा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, धाराशिव येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाच्या वतीने 'टेकोत्सव - टेक डायजेस्ट (नोव्हेंबर २०२५ ते मार्च २०२६)' या तंत्रज्ञान विषयक मॅगझिनचे प्रकाशन करण्यात आले.

या मॅगझिनचे प्रकाशन ट्रस्टच्या मानव संसाधन अधिकारी अनुराधा देशपांडे यांच्या हस्ते झाले. यावेळी सर्टिफाईड पॉश ट्रेनर ऋता पंडित, कॉलेजचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने व विभागप्रमुख डॉ. प्रशांत कोल्हे, प्रा. शिंदे, प्रा. अघोर, प्रा. भोसले, उपस्थित होते.

## प्रशाला आरळी बु. येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१२ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील प्रशाला आरळी बु. येथे एनएमएमएस परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा तसेच छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षेत मिळवलेल्या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांच्या वतीने हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. एनएमएमएस परीक्षेत शर्वरी प्रशांत पाटील (१०९ गुण), आस्था जितेंद्र पारवे (१०४ गुण), गायत्री बालाजी कचरे (९८ गुण) व प्रगती नामदेव व्हरकट (७६ गुण) यांनी कोणत्याही खाजगी शिकवणीशिवाय नियमित अभ्यास व योग्य नियोजनाच्या जोरावर उल्लेखनीय यश मिळवले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त इ. १ ली ते ९ वी विद्यार्थ्यांसाठी चार गटांत घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांचाही सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मकरंद बामनकर, रामेश्वर तानवडे, किरण गायकवाड, मिनाक्षी भोसले, माजी सरपंच गोविंद पारवे यांच्यासह ग्रामस्थ, पालक व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब घेवारे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रमोद चौधरी यांनी मानले.

## कामेगाव येथे महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मार्च -**

जागतिक महिला दिनानिमित्त तालुक्यातील कामेगाव येथे महिलांसाठी मोफत सर्वरोग निदान तपासणी व उपचार आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. रुपामाता फाऊंडेशन व शेतकरी सेना यांच्या संयुक्त विद्यमाने प्राथमिक आरोग्य केंद्र, कामेगाव येथे मंगळवार (दि.१० मार्च) रोजी हे शिबिर पार पडले.

या शिबिरात एकूण १९८ महिलांची आरोग्य तपासणी करून आवश्यक औषधोपचार करण्यात आले. तसेच ३८ कुटुंबांना आयुष्मान कार्ड काढून देण्यात आले. तपासणीदरम्यान काही महिलांमध्ये विविध आजारांचे निदान झाले असून त्यांच्या पुढील उपचारासाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर व महिलांनी कामाच्या धावपळीत आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ नये आणि त्यांच्यामध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. हे शिबिर प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव यांच्या सहकार्याने पार पडले. कार्यक्रमाचे उद्घाटन धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी व्हाईस चेअरमन व विद्यमान संचालक संजय देशमुख यांच्या हस्ते झाले. यावेळी ॲड. अजित गुंड पाटील, ॲड. अंजली



व्यंकट गुंड पाटील, दीपक येवते, हनुमंत कदम, अनंत भक्ते, ज्ञानेश्वर कदम, नितीन शेवाळे, प्रमोद कदम, विशाल झोरे, शिवाजी कापसे, मनोज मोरे, गजानन पाटील, राहुल यादव आदी उपस्थित होते.

तसेच जिल्हा रुग्णालयातील डॉ. युक्ता खन्ना, डॉ. सागर जगताप, डॉ. किरण पाटील, विश्वजीत जगदाळे, अक्षय व्हाटकर, अजय कदम, महारुद्र नक्षे, नर्स व आरोग्य कर्मचारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण भागात अशा आरोग्य शिबिरांची गरज असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

CMYK

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## आवाडशिरपुरा येथ घरफोडी; ७० हजारांचे सोन्याचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मार्च -**

कळंब तालुक्यातील आवाडशिरपुरा येथे अज्ञात चोरट्याने घरफोडी करून सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी शशिकांत व्यंकटराव निगुट (वय ५०, रा. आवाडशिरपुरा, ता. कळंब, जि. धाराशिव) यांच्या राहत्या घराच्या गेटचे कुलूप अज्ञात व्यक्तीने ११ मार्च २०२६ रोजी पहाटे सुमारे २ वाजण्याच्या सुमारास तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाटात ठेवलेले सुमारे १९ ग्रॅम वजनाचे अंदाजे ७० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले.



या प्रकरणी शशिकांत निगुट यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### निवृत्त लेफ्टनंट कर्नल मनोजकुमार सिन्हा यांनी घेतले तुळजाभवानी देवीचे दर्शन

**तुळजापूर, दि.१२ मार्च -**

निवृत्त लेफ्टनंट कर्नल मनोजकुमार सिन्हा यांनी श्री तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतले. यानंतर मंदिर समितीचे पब्लिक रिलेशन ऑफिसर अभिजीत तेरखेडकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. काश्मीरमध्ये दहशतवाद्यांविरुद्ध लढताना त्यांच्या मानेतून गोळी आरपार गेली होती. यावेळी पुजारी मंडळाचे माजी अध्यक्ष किशोर गंगणे, हिंदू जनजागृती समितीचे समन्वयक राजन बुणगे तसेच चेतन देशमाने उपस्थित होते.



### सुप्रिया माळवदकर यांना 'पोस्ट ऑफ द मंथ' तालुकास्तरीय पुरस्कार

**लोहारा, दि.१२ मार्च -**

लोहारा तालुक्यातील आरणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सहशिक्षिका सुप्रिया माळवदकर यांना विनोबा पमार्फत दिला जाणारा 'पोस्ट ऑफ द मंथ' हा तालुकास्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार, केंद्रीय मुख्याध्यापक दत्तात्रय फावडे आणि विनोबा तज्ञ सोमनाथ स्वामी यांच्या हस्ते देण्यात आला. या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय पांचाळ, शिक्षक मेघराज कदम, बाबासाहेब कदम, विकास घोडके, केंद्रप्रमुख मोहन शेवाळे, केंद्रीय मुख्याध्यापक सुदर्शन जावळे तसेच शिक्षकवृंद व शाळा व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सुप्रिया माळवदकर यांचे अभिनंदन केले आहे.



### मुंबई पोलीस दलातील बलभीम वाघमारे यांचा सत्कार

**इटकळ, दि.१२ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील खानापूर येथील रहिवासी व सध्या मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेले बलभीम वाघमारे यांची सहाय्यक फौजदार (एएसआय) पदावर नुकतीच निवड झाल्याबद्दल इटकळ ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. या उल्लेखनीय यशाबद्दल इटकळ ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन तसेच पेढा भरवून त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी पोलीस पाटील अमोल हिप्परगे, शंकर वाघमोडे, दिनेश सलगरे, नामदेव गायकवाड, लियाकत खुदादे, बालाजी गायकवाड, चांद शेख यांच्यासह वाघमारे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### कदमवाडी शाळेत विद्यार्थ्यांचा 'स्वयंशासन दिन' साजरा

**तुळजापूर, दि.१२ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील कदमवाडी (मा.) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मंगळवार, दि.१० मार्च रोजी इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा 'स्वयंशासन दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी एक दिवसासाठी शाळेचे संपूर्ण कामकाज सांभाळत जबाबदारीची जाणीव अनुभवली. यावेळी शिवम लोहार, चेतन मोरे, आराध्या शिंदे, आरती गिरी, स्वरा फंड आणि श्रावणी शिंदे यांनी शिक्षकांची भूमिका निभावत इयत्ता पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांना विविध विषयांचे अध्यापन केले. उपक्रमात रुद्र पांडुरंग शिंदे यांनी मुख्याध्यापकाची तर सोहम बागल यांनी उपमुख्याध्यापकाची भूमिका पार पाडली. शाळेचे मुख्याध्यापक घोडके डी.टी. यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तर भुतेकर एस.आर. यांनी आभार मानले.

### शेतीतील ७५ हजारांची तार चोरी

**वाशी, दि.१२ मार्च -**

वाशी तालुक्यातील कवडेवाडी शिवारात शेतीच्या लाईनवर ओढलेली अंदाजे ७५ हजार रुपये किमतीची तार अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. याबाबत सुरज फुलचंद तांदळे (वय ३०, रा. फक्राबाद ता. वाशी जि. धाराशिव) यांनी वाशी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या शेतातील लाईनवर ओढलेली अंदाजे २,४०० मीटर लांबीची जर्मन बनावटीची ५५ एमएमची तार अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

# झेडपीच्या अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीकडे जिल्ह्याच्या नजरा!

### ▶▶ अर्चनाताई पाटील अध्यक्षपदासाठी आघाडीवर...

### ▶▶ निवडणूक बिनविरोध होणार की मतदानद्वारे हा ट्विस्ट कायम...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मार्च -**

जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडीसाठी आजचा दिवस महत्वाचा असून संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष या निवडीकडे लागले आहे. महायुतीत असलेल्या पक्षांमधील अंतर्गत समीकरणे आणि संभाव्य राजकीय तडजोडीमुळे निवड बिनविरोध होणार की मतदानाद्वारे होणार, याबाबत शेवटच्या क्षणापर्यंत उत्सुकता कायम आहे. अध्यक्षपदासाठी भाजपकडून माजी उपाध्यक्षा अर्चनाताई राणाजगजितसिंह पाटील यांचे नाव जवळपास निश्चित मानले जात आहे.

जिल्हा परिषदेत सत्तास्थापनेसाठी भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यातील समन्वय अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि शिवसेनेचे आमदार तानाजी सावंत यांच्यातील राजकीय समन्वयातून सत्ता स्थापनेचे सूत्र ठरणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. अध्यक्ष-उपाध्यक्ष पदांसह विविध सभापती पदांचे वाटप कोणत्या पक्षाला मिळणार याकडेही लक्ष लागले आहे. भाजपकडून





अध्यक्षपदासाठी अर्चनाताई राणाजगजितसिंह पाटील इच्छुक आहेत, तर शिवसेना (शिंदे गट) कडून उषाताई रवींद्र गायकवाड यांचे नावही चर्चेत आहे. त्यामुळे महायुतीतील दोन्ही पक्षांमध्ये समन्वय होऊन निवड बिनविरोध पार पडते की वैचारिक मतभेदांमुळे निवडणूक मतदानाद्वारे होते, याबाबत राजकीय उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

धाराशिव जिल्हा परिषदेत यावेळी तब्बल ६४ वर्षांनंतर भाजपला मोठे यश मिळाले असून कमळ फुलले आहे. भाजप सर्वाधिक १९ सदस्यांसह पहिल्या क्रमांकावर आहे. शिवसेनेत फूट पडल्यामुळे जिल्ह्यात दोन शिवसेना समोरासमोर लढल्या होत्या. त्यामध्ये शिवसेना (शिंदे गट) धनुष्यबाण चिन्हावर १५ जागा जिंकण्यात यशस्वी ठरली, तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) मशाल चिन्हावर ७ जागा जिंकत आपली उपस्थिती दाखवून दिली. महायुतीत भाजपसोबत शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी सोबत असल्यामुळे सत्ता स्थापनेसाठी परस्पर तडजोड अपरिहार्य असल्याचे राजकीय चित्र दिसून येत आहे. गेल्या महिनाभरापासून अध्यक्ष-उपाध्यक्ष पदांच्या निवडीवरून विविध राजकीय चर्चांना उधाण आले होते. काही ठिकाणी विरोधी सदस्यांना सोबत घेऊनही सत्ता स्थापन होऊ शकते, अशा शक्यताही व्यक्त केल्या जात होत्या.

जिल्ह्यातील महायुतीचे प्रमुख नेते आतापर्यंत एकत्र येऊन हा अंतर्गत पेच सोडवण्याचा ठोस प्रयत्न करताना दिसले नाहीत. त्यामुळे हा प्रश्न राजकीय कुरघोडीचे साधन ठरत असल्याची चर्चा सुरू होती. अखेर मुंबई येथे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याशी संवाद साधल्यानंतरच आजच्या निवडीत अंतिम निर्णय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राज्यातील पक्षश्रेष्ठींच्या आदेशानुसारच अंतिम समीकरण ठरणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष निवड प्रक्रियेत महायुतीतील राजकीय गणिते आणि नेतृत्वातील समन्वय किती प्रभावी ठरतो, यावर आजच्या निकालाची दिशा ठरणार आहे. आज जिल्ह्यातील प्रमुख नेते व पालकमंत्री एकत्र येऊन अंतिम निर्णय जाहीर करतात की आणखी एखादा नवीन युती फॉर्म्युला समोर येतो, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली आहे.

**जिल्हा परिषदेत पक्षीय बलाबल ...**

महायुतीत भाजपाचे १९ सदस्य, शिवसेना (शिंदे गट) १५ सदस्य, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे ६ सदस्य निवडून आले आहेत. महाविकास आघाडी शिवसेना (ठाकरे गट) चे ७ सदस्य, काँग्रेसचे ३ सदस्य निवडून आले. याशिवाय ४ अपक्ष आणि १ समाजवादी पक्षाचा सदस्य निवडून आला असून जिल्हा परिषदेत एकूण ५५ सदस्य आहेत. सत्तास्थापनेसाठी किमान २८ सदस्यांची आवश्यकता आहे.

**अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीचा कार्यक्रम...**

- सकाळी १० ते १२ दोन्ही पदांसाठी नामनिर्देशनपत्र स्वीकारणे
- दुपारी २ सभेस सुरुवात
- दुपारी २ ते २.१५ नामनिर्देशनपत्रांची तपासणी व छाननी
- दुपारी २.१५ वैध उमेदवारांची नावे जाहीर
- दुपारी २.१५ ते २.३० उमेदवारी मागे घेण्याची मुदत
- दुपारी २.३५ माघार घेतलेल्या उमेदवारांची नावे जाहीर
- दुपारी २.४० अंतिम उमेदवारांची घोषणा
- दुपारी २.४९ पासून आवश्यक असल्यास मतदान

## उन्हाची तीव्रता वाढताच कलिंगड-खरबूजांना मागणी

### बाजारात हंगामी फळांची रेलचेल...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१२ मार्च -**

उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांचा कल थंडावा देणाऱ्या हंगामी फळांकडे वाढताना दिसत आहे. शहरातील मुख्य रस्ते, चौक आणि बाजारपेठ परिसरात सध्या कलिंगड आणि खरबूज विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात हातगाड्या दिसत आहेत.



रस्त्याच्या कडेला आकर्षक पद्धतीने रचलेली कलिंगडे व खरबुजे ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

कडक उन्हामुळे शरीरात पाण्याची कमतरता जाणवू लागते.

त्यामुळे पाण्याचे प्रमाण जास्त असलेल्या फळांकडे नागरिकांचा कल वाढत आहे. दरम्यान, यावर्षी या हंगामी फळांच्या दरात किंचित वाढ झाली आहे. सध्या बाजारात कलिंगडाचे दर आकार व वजनानुसार प्रति नग सुमारे ४० ते १०० रुपये आहेत.

तर खरबूज ८० ते १०० रुपये प्रतिकिलो दराने विक्री होत आहे.

गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा फळांच्या दरात सुमारे पाच टक्क्यांनी वाढ झाल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, उन्हाळ्यात शरीरातील पाण्याची पातळी संतुलित ठेवण्यासाठी कलिंगड व खरबूज खाणे फायदेशीर ठरते.

या फळांमध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने शरीराला थंडावा मिळतो आणि थकवा कमी होण्यास मदत होते.

## जुन्या वादातून तरुणावर हल्ला; दोन दुचाकींची तोडफोड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मार्च -**

कळंब-येरमाळा रोडवरील हासेगाव शिवारातील पाटील धाब्यावर जुन्या वादातून एका तरुणावर मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरज काळदाते, सुमित काळदाते, संतोष काळदाते (सर्व रा. पुनर्वसन सावरगाव, ता. कळंब) व इतर १५ जणांनी दि.८ मार्च रोजी कळंब-येरमाळा रोडवरील पाटील धाबा, हासेगाव शिवार येथे गोविंद संजय काळदाते (रा. भवानी चौक, देवी रोड, कळंब) यांना जुन्या भांडणाच्या कारणावरून शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी तसेच लोखंडी पाईप, लोखंडी रॉड व दगडाने मारहाण केली. हल्ल्यात गोविंद काळदाते गंभीर जखमी झाले. तसेच आरोपींनी त्यांच्या घरासमोरील दोन मोटरसायकलींची तोडफोड करून नुकसान केल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

## अणदूरचा पैलवान राहुल मुळे यांची महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१२ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील होतकरू पैलवान राहुल मुळे यांची सासवड येथे होणाऱ्या प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ग्रामीण भागातून मेहनतीच्या जोरावर पुढे आलेल्या राहुलच्या या यशामुळे अणदूर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

राहुल मुळे हा जय हनुमान तालीम संघ, अणदूर येथील पैलवान असून लहानपणापासूनच त्याला कुस्तीची आवड आहे. नियमित सराव, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर त्याने अनेक स्कूल कुस्ती स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत आपली छाप पाडली आहे. त्याच्या उत्कृष्ट खेळाची दखल घेत त्याची सासवड येथे होणाऱ्या राज्यातील मानाच्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

राहुलच्या या निवडीमुळे अणदूर गावासह परिसरातील कुस्तीप्रेमींमध्ये समाधान व्यक्त होत आहे. गावातील क्रीडाप्रेमी, ज्येष्ठ नागरिक तसेच जय हनुमान तालीम संघाचे पदाधिकारी व ग्रामस्थांनी राहुलचे कौतुक केले. या निमित्ताने खडकाळी मॉर्निंग ग्रुपच्या वतीने त्याचा भव्य सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

## तुळजापूरातील भाजी मंडईतून दुचाकी लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मार्च -**

तुळजापूर शहरातील भाजी मंडई परिसरातून अंदाजे २५ हजार रुपये किमतीची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे.

फिर्यादी दत्ता मुरलीधर देशमुख (वय ४०, रा. हंगरगा तुळ पाटी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी तुळजापूर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांची होंडा शाईन (क्र. एमएच १३ सीझेड १५९५) ही मोटरसायकल दि.१० मार्च रोजी दुपारी २ ते रात्रीच्या दरम्यान सोमेश्वर गणपती मंदिराच्या पाठीमागील भाजी मंडई परिसरातून अज्ञात व्यक्तीने चोरून नेली.

या प्रकरणी दत्ता देशमुख यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## एलपीजी गॅस पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी जिल्हा प्रशासनाची बैठक; वितरणात पारदर्शकता ठेवण्याच्या सूचना

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मार्च -**

जिल्ह्यात एलपीजी गॅसचा पुरवठा सुरळीत राहावा आणि ग्राहकांना वेळेत गॅस सिलेंडर उपलब्ध व्हावेत यासाठी जिल्हा प्रशासनाकडून आज १२ मार्च रोजी महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. ही बैठक जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

बैठकीस सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी निकिता साकळे, गॅस एजन्सींचे जिल्हा नोडल अधिकारी रिजवान पटेल तसेच धाराशिव जिल्ह्यातील सर्व गॅस एजन्सीधारक उपस्थित होते.

या बैठकीत जिल्ह्यातील गॅस स्टॉक आणि वितरण व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच एलपीजी गॅसचा पुरवठा




सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली.

ग्राहकांना विहीत वेळेत गॅस सिलेंडर उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला. यावेळी जिल्हा नोडल अधिकाऱ्यांनी गॅस पुरवठा आणि वितरण प्रक्रियेत आवश्यक समन्वय राखण्याच्या सूचना दिल्या.

तसेच गॅस एजन्सींनी वितरण प्रक्रिया पारदर्शक आणि नियमानुसार ठेवावी, असेही स्पष्ट करण्यात आले. शासनाने ठरवून दिलेल्या निर्देशांनुसारच गॅस सिलेंडरचे वाटप करावे. ग्राहकांकडून अतिरिक्त रक्कम आकारल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशाराही बैठकीत देण्यात आला.

प्रशासनाच्या या सूचनांमुळे जिल्ह्यातील एलपीजी गॅस वितरण अधिक शिस्तबद्ध व ग्राहकाभिमुख होण्यास मदत होणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## लातूर-येडशी-बार्शी-टेंभुर्णी मार्ग उन्नतीकरणाला २०५.२३ कोटींची मंजुरी

### खा. ओमराजे निंबाळकर यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मार्च -**

धाराशिव, लातूर आणि बार्शी परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या लातूर-मुरुड-ढोकी-येडशी-बार्शी-टेंभुर्णी या प्रमुख मार्गाच्या उन्नतीकरणासाठी केंद्र सरकारकडून २०५.२३ कोटी रुपयांची प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी मिळाली आहे. या निर्णयामुळे येडशी बायपाससह या मार्गावरील उर्वरित प्रलंबित कामांना गती मिळणार असल्याची माहिती खासदार ओम राजे निंबाळकर यांनी दिली.

या मार्गाच्या कामांसाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता. त्या पाठपुराव्याला यश मिळाल्याने आता रस्त्याच्या उन्नतीकरणाचे काम वेगाने होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकल्पामुळे येडशी बायपासचे काम तसेच इतर प्रलंबित कामे पूर्ण होण्यास मदत होणार आहे.



परिणामी या परिसरातील वाहतूक अधिक सुरक्षित, वेगवान आणि सोयीस्कर होणार आहे.

खासदार ओमराजे निंबाळकर यांनी सांगितले की, यापूर्वीही केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून या मार्गाच्या चौपदरीकरणासाठी ४३८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेण्यात यश आले होते.

या निधीमुळे या महत्त्वाच्या मार्गाच्या विकासाला मोठी गती मिळाली आहे.

या मार्गाच्या विकासामुळे स्थानिक नागरिकांचा प्रवास अधिक सोयीस्कर होणार असून व्यापार, उद्योग आणि वाहतूक व्यवस्थेलाही मोठी चालना मिळणार आहे.

या प्रकल्पामुळे ग्रामीण भागातील संपर्क सुधारण्याबरोबरच कृषी मालाच्या वाहतुकीलाही गती मिळणार असल्याने स्थानिक अर्थव्यवस्थेला देखील मोठा फायदा होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. तसेच येडशी बायपास पूर्ण झाल्यानंतर शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यासही मदत होणार आहे.

**जाहीरनामा**
**तुळजापूर येथील मा. सह दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर, यांचे कोर्टात.**

**कि.अ.नं.२४७/२०२६** **नि.नं. ७**

ज्यापेक्षा **कै. मधुकर रामकृष्ण पाटील** हे वृध्दापकाळामुळे **दि.२७/१२/२०१५** रोजी कसबे तुळजापूर, ता. तुळजापूर येथे मयत झाले आहेत, त्यांचे पश्चात अर्जदार क्रे. (१) ज्योती अरुण महाजन, रा.३२४, वकील नगर जवळ, दिनानाथ मंगेशकर हॉस्पीटल, एरंडवणे, पुणे, ता. जि. पुणे, (२) मेघना दिलीप भेडसुरकर, रा. भेडसुर, ता. भेडसुर, जि. कलबुर्गी (कर्नाटक) (३) सुभाष मधुकरराव पाटील, रा. बिल्डींग नं. ३, फ्लॅट नं. २४, वकील नगर, दिनानाथ मंगेशकर हॉस्पीटल जवळ, एरंडवणे, पुणे, ता. जि. पुणे, (४) स्वाती विकास महाजन, रा. फ्लॅट नं. ३०१. अजमेरा हॉसींग कॉम्प्लेक्स, अजमेरा शाळा जवळ, पिंपरी, पुणे शहर, पुणे, (५) मंजुषा रविंद्र पाटील, रा. मंगळवार पेठ, तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव, (६) अथर्व रविंद्र पाटील, रा. आरळी (खुर्द), ता. तुळजापूर, ह. मु. जिजामाता नगर, नवीन बागे शेजारी, विजय पॅथोलॉजी समोर, तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव, (७) आदित्य रविंद्र पाटील, रा. आरळी (खुर्द), ता. तुळजापूर, ह. मु. तुळजापूर, ता. तुळजापूर, हे मयताचे वारस असून, अर्जदार यांनी मयताच्या नांवे असलेले कसबे तुळजापूर, ता. तुळजापूर येथील सिटी सव्हे नं. ३१९५, ज्याचा नगर परिषद मिळकत क्रं. ९४१/४ या जागेच्या सिटी सर्व्हे रेकॉर्डला (पी. आर. कार्डवर) व इतर रेकॉर्डला अर्जदारांचे नांव वारस म्हणून लावण्यांकरीता वारसांचे प्रमाणपत्र मिळण्यांसाठी अर्ज केला आहे.

त्यापेक्षा अर्जदार क्रं. १ ते ७ हे सदरहू मयताचे वारसदार नव्हे असे कोणास कळविण्यांचे असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्यांचे आंत त्यांनी हया न्यायालयात हजर होवून, आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यांत येते की, सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना **कै. मधुकर रामकृष्ण पाटील** यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यांत येईल.

**पु.ने.ता. ३०/०४/२०२६**
**आज दिनांक : १२/०३/२०२६**

**स्वाक्षरित/-** **स्वाक्षरित/-**
**कनिष्ठ लिपीक** **सहा.अधिक्षक**

**सह दिवाणी न्यायालय क. स्तर, तुळजापूर (आदेशावरुन)**